फेब्रुवारी २०१८, अंक २, पृष्ठे ५२

# कृषिजल

## मोठ्याभाऊंच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन



# श्रमातून झिरपणाऱ्या आत्मानंदासाठी श्रमू या!



## संस्था मूल्य अधिष्ठान

### जीवन-लक्ष्य
सार्थक करूया जन्माचे। रूप पालटू वसुंधरेचे।।

### भविष्य-वेध
देशी विदेशी जे जे करू। तयामध्ये अग्रगण्यता संपादू।।

### श्रद्धा-भाव
न सोडी जो जिद्द कार्याची। तया नसे जाण तणावाची।।
उदात्तपणा बाळगी अंगाशी। पाही पहाट तो यशाची।।

### ध्येय-धोरण
दर्जेदार उत्पादनाची निर्मिती करून माफक किंमतीत त्याची विक्री करावयाची, जेणेकरून ग्राहकाचे समाधान, आधारस्तंभांना न्याय्य लाभ मिळू शकेल व नाविन्याची कास धरून सातत्याने विकास साधता येईल.

### मार्गदर्शक-सूत्र
संस्था मूल्य अधिष्ठानाला मूर्तस्वरूप देण्याकरिता समाजाची बांधिलकी मानून व पर्यावरणाची जाण ठेवून आम्ही सहकारी, साधनसामग्री आणि संपत्ती यांचा कार्यक्षमतेने व अत्यंत काटकसरीने वापर करू.

### गुणवत्ता तत्त्व
गुणवत्तेचा परिपाठ कृतिशीलपणे अंगिकारू.

### कार्यसंस्कृती
कर्म हेच जीवन! जीवन हेच कर्म!

## गुणवत्ता व पर्यावरण धोरण

### मार्गदर्शक तत्त्वे
- ग्राहकाच्या संपूर्ण समाधानासाठी वचनबद्ध व कटीबद्ध राहू.
- बाजारपेठेत नेतृत्वाची बांधणी करू व नेतृत्व कायम अग्रेसर ठेवू.

### गुणवत्ता प्रामाण्य
- गुणवत्ता साधू व सर्वार्थाने गुणवत्तेची कास बाळगून गुणवत्तेचे सातत्याने संवर्धन करू.

### सुरक्षा आणि आरोग्य
- सहका-यांच्या आणि अन्य मालमत्तेच्या सुरक्षिततेची तसेच देखभालीची काळजी वाहू.

### पर्यावरण आणि समाज
- पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करून विकास साधू.
- समाज आणि पर्यावरण यांच्या सृजनशील सहयोगाची गुंफण करत एकात्मिकता व ऋणानुबंध हृदयात जोपासू

### इतर भागिदारांचा विकास
- निरंतर विकासासाठी सातत्याने कामकाजात पारदर्शकता आणि सचोटी बाळगू.

**भवरलालजी हिरालालजी जैन**
१९३७–२०१६

अध्यक्षीय




**अशोक जैन**

अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.


**भारतीय संस्कृतीत मातापित्यांच्या ऋणाचे महत्त्व असामान्य आहे. मातापिता हे केवळ जन्मदाते नसतात. ते मानवी जीवनाच्या वाटचालीचे दीपस्तंभ असतात. त्यांच्या आशीर्वादाने माणसाचे कर्तृत्व फुलते. माणूस त्याच्या जीवनात जे काही मिळवितो ते त्यांच्या पुण्याईनेच. भवरलालजी म्हणजे आमचे वडील. त्यांनी आमच्यापुढे आणि समाजापुढे कर्मयोगाचा जो आदर्श ठेवला त्यामुळे सगळ्या वाटचालीला कृतार्थता आली. ती शब्दात सांगता येत नाही. त्यासाठी शब्दही कमी पडतात. म्हणून पुण्यस्मरणातून ती आपापल्या परीने व्यक्त करायची असते. ते केवळ स्मरण नसते. मानवी कर्तृत्वाच्या वाटचालीचे ते एक अक्षय अंगण असते. भाऊंची वाटचाल आजही समाजाला भूषणावह ठरलेली आहे. त्यांनी अनेक सुंदर वाटा निर्माण केलेल्या आहेत. म्हणूनच सामाजिक बांधिलकीला पडलेले एक सुंदर संगमरवरी स्वप्न म्हणजे भाऊंचे जीवन आहे.**

# भाऊंचा सत्याचा वसा अखंडपणे जपू या

सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रम्हचर्य हा महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा गाभा होता. हा गाभा आमचे वडील म्हणजे परमपूज्य भाऊ (भवरलालजी जैन) यांनी समजून घेऊन प्रयत्नपूर्वक तो कृतीत उतरविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला. गांधीजींच्या तत्त्वज्ञानावरती भाऊंची नितांत श्रद्धा होती. तेच त्यांच्या जीवनाचा आदर्श होते. महात्मा गांधींना प्रत्यक्ष भेटण्याचे सद्‌भाग्य भाऊंना लाभले नाही. परंतु गांधींच्या विचारांनी भाऊंना जी मोहिनी घातली त्यातून ते कधीच बाहेर आले नाहीत. गांधींचे तत्त्वज्ञान स्वत:च्या जीवनात अंगीकारुन ते अखंडपणाने गांधी विचारांचा वारसा चालवित राहिले. इतकेच नव्हे तर जळगावच्या जैन हिल्सवर गांधीतीर्थाची उभारणी करुन हा वारसा शतकानुशतके पुढे कायम चालत राहिल अशी व्यवस्था त्यांनी करुन ठेवली. भाऊंच्या मनात एक आणि ओठात एक असे कधीच नव्हते. त्यांच्या विचारांमध्ये फार स्पष्टता होती आणि व्यापक जनकल्याणाचे भान होते. कोणताही उद्योग उभा करतांना मी जास्तीत जास्त हातांना काम व रोजगार कसा देऊ शकेल याचाच त्यांनी विचार केला. माणसे कामासाठी फारशी न लागणारी स्वयंचलित यंत्रसामग्री व ॲटोमेशनचे तंत्रज्ञान जगभर उपलब्ध असतांनाही भाऊंनी मानवी हातांना अधिक मोल व प्राधान्य दिले. त्यातून हजारो-लाखो लोकांचे संसार उभे करणे हाच ध्यास होता. तोच विचारांचा केंद्रबिंदू होता. भाऊंनी कायम सत्याची कास धरुन खोटेपणाशी कधीही संग केला नाही. सत्याला खूप त्रास होतो. तावून-सुलाखून निघावे लागते. सत्य हे सूर्यप्रकाशाइतके सुस्पष्ट आणि अग्निसारखे दिव्य असते. 'सत्य' कोणताही अंगरखा घालणे पसंत करीत नाही, मुळातच पारदर्शकता गुण अंगभूत असल्याने 'सत्य' आहे त्या स्वरूपासह साकार होते. सत्याचे आत्मपरीक्षण पाण्यात प्रतिबिंब ठळकपणे पाहून घ्यावे इतके विचारणीय असते. सत्याच्या आराधनेतून घडणारे वैचारिक-भावनिक शिल्प जगासाठी आदरणीय आणि कुटुंबातील सदस्यांसाठी वंदनीय आणि अनुकरणीय ठरते. मोठ्याभाऊंनी सातत्याने सत्याशी नाते जपले; भाऊंच्या आयुष्याच्या वाटचालीत अनेकदा संकटे आली, संघर्ष आला मात्र, त्यांच्या अंत:करणातील सत्याची शक्तिशाली ऊर्जा प्रचंड प्रकाशदायी राहिली. भाऊ सकारात्मक मनाने परिस्थितीवर मात करीत राहिले. भाऊंच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या निमित्ताने याची प्रकर्षाने आठवण झाली. सत्याचा हा वसा व ठेवा जो भाऊंनी आपल्या सर्वांना दिलेला आहे त्याची जीवनापेक्षाही अधिक बारकाईने जपणूक करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी आपल्याला प्रामाणिकपणे भरपूर मेहनत करावी लागेल. प्रसंगी त्यागही सोसावा लागेल. पण शेवटी आपल्या हाती गोड मधुर फळे येतील यावर श्रद्धा ठेवा. हाच भाऊंचा संदेश आहे. त्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने आपल्या सर्वांच्या वतीने त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

## संपादकीय



डॉ. सुधीर भोंगळे

**माननीय भवरलालजींच्या आयुष्याला अनेकविध पदर आहेत. ते आजही अत्यंत उपयुक्त आहेत. भवरलालजींची योग्यता शब्दातीत आहे. त्यांनी कर्मनिष्ठेच्या प्रेरणा सातत्याने जपल्या. महात्मा गांधींजींच्या व्रताचे त्यांनी केलेले आचरण आजही आदर्शभूत आहे. शेतीतील त्यांची दृष्टी आज शेतीतला मानदंड ठरली आहे. ते केवळ प्रयोग करुन थांबले नाहीत. त्यांनी त्या प्रयोगातून पुढल्या अनेक प्रयोगांच्या दिशा स्पष्ट केल्या. मनापासून कष्ट केले. आवडीने त्याग केला. कितीतरी शेतकरी कुटुंबांचे पालक झाले. जैन हिल्सवरील गांधीतीर्थ हे मानवतीर्थ झाले. जैन कुटुंब या साऱ्यांची आजही जपणूक करते आहे हे भवरलाल भाऊ आणि कांताबाईंचे फार मोठे यश आहे असे मानले पाहिजे.**

# ।। तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हां घडो।।

सकारात्मक विचारांची शेती करणारे भवरलाल जैन म्हणजे चालते बोलते कृषी विद्यापीठ होते. माणसाला नेमके काय हवे असते हे कळायला त्याच्याजवळ स्वत:ची दृष्टी लागते. ती जर असेल तर तो पुढे जाऊ शकतो. एकूणच भाऊंचे (भवरलालजींना सगळे जण आदराने मोठे भाऊ असेच म्हणत) जीवन म्हणजे शिस्त, कष्ट आणि जिद्द यांचा त्रिवेणी संगम आहे. आयुष्याच्या वाटचालीत भाऊंनी निसर्गाकडून जसे काही संस्कार घेतले, तसे काही संस्कार घराकडून घेतले तर काही संस्कार त्यांना मातीत राबता राबता मिळाले. याच्याच जोडीला चांगल्या पुस्तकांच्या वाचनाची सवय त्यांनी आपल्याला सहज लावून घेतली. साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक वाचतांना भाऊंचे डोळे भरुन आले. वि.स. खांडेकरांचा ध्येयवाद भाऊंना जसा आवडला तसा ना.सी.फडके यांचा कलावादही त्यांना आवडला. जे जे काही चांगले आहे ते ते आपल्या कामाशी भाऊंनी एकरुप केले आणि त्यातून संस्कार घडला. एक नवा वेगळा प्रकाश भाऊंनी निर्माण केला. सर्वसाधारण परिस्थितीतून भाऊंनी चोखाळलेल्या ध्येयाच्या वाटा विलक्षण आहेत. भाऊंनी आपल्या डोळ्यांसमोर प्रामाणिक कामाचा वसा घेतला आणि त्यातून व्यक्तिमत्त्व विकासाचे नवे स्वतंत्र दालन निर्माण केले. कितीही लक्ष्मी मिळू दे, परंतु लक्ष्मीपेक्षा सरस्वती श्रेष्ठ आहे हे भाऊंना मनोमन पटले होते. त्यामुळे आयुष्यभर त्यांनी सरस्वती उपासकांबद्दल आदरभाव बाळगला व त्यांच्याशी मैत्री आणि सलोख्याचे संबंध कायम ठेवले. बुद्धिमत्ता असणे आणि नव्या कल्पना सुचणे हे सरस्वतीचे वरदान आहे असे ते मानीत. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान याच्या मुळाशी जी बुद्धीमत्ता आहे ती सरस्वती आहे अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे सरस्वती पूजकांना मदत करण्यास ते सदैव तयार असत.

भाऊंची धारणा अशी होती की आजच्या पिढीत प्रचंड क्षमता आहे. अशा नव्या पिढीला परिश्रमाची सवय जर लावली आणि त्यांनी जर जीव ओतून काम केले तर क्रांतीचा नवा सूर्य आपल्याला लवकरच दिसेल. युवकांच्या मनाला नव्या पैलूंचा आकार देणारा एक समर्थ आचार्य म्हणून भाऊंचे नाव कायम राहील. सर्व शास्त्रांचे ज्ञान मिळवून जो आपल्या विद्यार्थी व सहकाऱ्यांना देतो आणि त्या ज्ञानाला अनुसरुन जो स्वत: वर्तन करतो तोच गृहस्थ आचार्य या पदवीला प्राप्त ठरतो. या न्यायाने भाऊ हे 'जैन गुरुकुलाचे' महाआचार्य होते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना त्यांनी रोज अन्नदानाप्रमाणे भरभरुन ज्ञानदानही केले. भाऊ हे ज्ञानाचा सागरच होते. सर्व विषयात त्यांना गती होती. ज्ञानसंपादनासाठी कोणताही विषय वर्ज्य नव्हता. खोलात जाऊन प्रत्येक विषयाची माहिती ते जगभरातून गोळा करीत. मग त्यासाठी कितीही खर्च आला तरी तो करण्याची त्यांची तयारी असे. यामागील त्यांचे सूत्र एकच होते ते म्हणजे ज्ञानाची सत्ता सर्वश्रेष्ठ असते आणि प्रत्येक ज्ञानोपासकाने आयुष्यभर जिज्ञासू विद्यार्थी म्हणून राहिले पाहिजे.

भाऊ कधीही संकटांना घाबरले नाहीत. त्यांनाही त्यांच्या आयुष्यात अनेक मोठमोठ्या संकटांचा व त्रासदायक प्रसंगांचा सामना करावा लागला. एकदा तर त्यांनी आर्थिक संकटात सापडल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भागधारकांची जाहीर माफी मागितली. परंतु भाऊंचा संयम आणि आत्मविश्वास यांनी भाऊंची

वाटचाल यशस्वी झाली. कारण भाऊंनी जगण्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले. शेती हे भाऊंचे मंदिर होते. वृक्षाची निगा राखणे हीच त्यांची पूजा होती. मातीच्या सृजनशीलतेतून नवे नवे अंकुर निर्माण होतांना भाऊंची एकाग्रता पाहण्यासारखी होती. त्यातूनच शेती असो, सहकार असो, प्रक्रिया असो, स्वत:ची कंपनी असो किंवा विविध प्रकारची उत्पादने असो, या सगळ्यांकडे त्यांनी कधी व्यापार म्हणून पाहिले नाही. भाऊ त्यांना एकाग्रतेचे गुरु मानीत. त्यांची भक्ती ही अनुभूती आणि प्रामाणिक निष्ठेवर होती. भाऊंचा प्रत्येक श्वास सार्थ होता. आयुष्यात यशस्वी होणे आणि मुबलक धनसंपदा गोळा करणे हेच केवळ भाऊंचे ध्येय नव्हते. आयुष्यात प्रत्येक गोष्टीतून व प्रसंगांमधून भाऊ काही ना काही शिकले. निसर्ग हा भाऊंचा सर्वात मोठा गुरु होता. शिक्षणातून गुरुजनांविषयीचा कृतज्ञ भाव ही त्यांची शिदोरी होती. संस्कारीत जीवनमूल्यांनी भाऊंच्या जगण्याला जो आकार प्राप्त झाला त्यातून भाऊंची जडणघडण अपूर्व झाली. भाऊंच्या आईने घरात तिच्या पेटीला कधी कुलूप लावले नाही. ते भाऊंनी बघितले आणि त्यांनी ठरविले की आपण आपल्या डोक्याला कधी कुलूप लावायचे नाही. प्रत्येक चांगल्या गोष्टीचे स्वागत करायचे. आपण जगात एकटे काम करतो असे नाही. अनेक माणसे चांगल्या प्रकारची कामे शांतरितीने व निरपेक्षपणाने करतात. यासाठी आयुष्यात विविध ज्ञानाच्या शाखांमध्ये भाऊंनी संचार केला. वेगवेगळे देश पाहिले. त्यांच्या संशोधनाच्या दिशा कोणत्या आहेत ते ही पाहिले. भाऊंच्या दृष्टीने, एवढे मोठे देशाटन करुनही त्यांनी शेती हा आपल्या जगण्यातला अत्यंत महत्त्वाचा घटक आहे याच दृष्टिकोनातून प्राधान्याने शेतीकडे पाहिले. त्यामुळे त्यांनी केलेले शेतीतले काम आणि महात्मा गांधींनी सांगितलेली कृषी संस्कृतीची संकल्पना यांचा उत्तम मिलाफ झाला. गांधीजींचे शेतीचे स्वप्न भाऊंनी प्रत्यक्षात आणले. जैन हिल्स हे त्याचेच प्रारुप आहे.

महात्मा गांधीजींचे सद्‌गुण, त्यांचे विचार, त्यांचे आचरण सारेच पारदर्शक होते. त्यांच्या सत्याच्या प्रयोगातून त्यांचे जगणे भाऊंच्या मनाला भिडले. जीवन कसे असावे हे जर पाहायचे असेल तर महात्मा गांधींच्या जीवनाकडे पाहावे असे भाऊ नेहमीच म्हणत. भाऊंच्या दृष्टीने अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकान्त सिद्धांत हे जैन तत्त्वज्ञानाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. या तत्वांना कृतीत आणण्याचे काम गांधीजींनी आयुष्यभर केले. भगवान महावीरांचे रूप जर आजच्या काळात कुठे बघायचे असेल तर ते महात्मा गांधीजींच्या रूपातून पाहावे. गांधीजींचा अनुभव अलौकिक आणि प्रकाशवाटा दाखविणारा आहे असे भाऊंचे ठाम मत होते. या साऱ्यातून भाऊंची जडणघडण वेगळी झाली. त्यांचे शेतीप्रेम, त्यांनी केलेले शेतीतले प्रयोग, अहोरात्र परिश्रमाची तयारी आणि एखादा घेतलेला ध्यास यांनी भाऊंचे व्यक्तिमत्त्व आजही हवेहवेसे वाटते.

शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना भाऊंनी मनापासून, विचारपूर्वक व मोठ्या धाडसाने राबविल्या. सर्व राज्यकर्ते, धोरणकर्ते, विचारवंत व शेतकऱ्यांनी त्यांचे भरभरुन स्वागत केले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही सर्व पक्षांचे नेते जळगावच्या जैन हिल्सवर येतात. तेथील कृषी संशोधन व शेतीतले निरनिराळे प्रयोग पाहतात. अनुभूती स्कूलला भेट देतात आणि गांधीतीर्थ पाहून थक्क होतात. याचे कारण भाऊंच्या कामाने सर्व माणसांना सामावून घेतले आहे.





भाऊंनी कोणताही पूर्वग्रह ठेवला नाही. कोणत्याही पक्षाचा चष्मा घातला नाही. प्रत्येकातील चांगल्या गोष्टींसाठी भाऊंनी आपला हात सदैव पुढे ठेवला आणि तोंडभरून कौतुक करण्यात ते कधी मागे पडले नाहीत. आपण आपल्या जगण्याशी आणि व्यवसायाशी प्रामाणिक राहिलो तर आपण जे निर्माण करु ते सर्वोत्तमच असते. लोक त्याचा गौरव करतात. त्यातली साधनशुचिता जर पारदर्शक असेल तर अशा माणसाचा समाज सत्कार करतो हे भाऊंच्या जीवनातून सिद्ध झाले आहे आणि तोच आपल्यासाठी भाऊंच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या निमित्ताने धडा आहे.

भाऊ हा मानवी निरोगी मनाचा श्वास आहे. जगण्यातल्या सर्व जाणीवा त्यांनी सूक्ष्मपणे तपासल्या. देहाला अभ्यासाची खोली दिली. यातली चिंतनशीलता त्यांच्या कर्मयोगाचा अथांग सागर झाली. ज्ञानेंद्रियांची सार्थ कल्पना गिरणेने दिली. भाऊंचे अवघे जीवन जळगावमय झाले. येथूनच जगभरच्या कंपन्या चालवायच्या हा निदिध्यास त्यांनी यशस्वीपणे कृतीत उतरवून दाखविला. आलेला सर्व अनुभव त्यांनी भाषणे, ग्रंथ, मुलाखती, लेखन यातून पुढील पिढ्यांसाठी चिरंतन ठेवा म्हणून दिला. त्यांचा एकेक ग्रंथ म्हणजे विद्यापीठांची विद्यापीठे आहेत. यासाठी कोणत्याही रांगेत उभे राहून रस्ते अडवून सामान्यांना त्रास देत बाजारु गुरुंच्या गर्दीत उभे राहण्याची गरज नाही. भव्य मैदानातल्या सत्संगात आणि गर्दीतही माझे मीपण पुसले जात नाही. दिखाऊपणात आपण आपल्यावर प्रलय ओढवून घेतो. याऐवजी भाऊंच्या ग्रंथांच्या अभ्यासात रमलो व प्रामाणिकपणे कष्ट करत राहिलो आणि त्याला सामाजिक कल्याणाची जोड असेल तर कर्तृत्वाला धार येऊन कळसाचे शिखर कसे गाठता येते व जीवनाची गाथा कशी यशस्वी होते हे अनुभवता येते. गाथा म्हणजे अथ गा. तू तुझ्या आत्मस्वराने गायला आरंभ कर. कुणाचीही नकलींची वस्त्रे अंगावर न मिरविता आपण आपले होत होत गाणे. प्रत्येक जण मनाशी काही ना काही गुणगुणतोच. गुणगुणतांना मनाच्या सबोध आणि अबोध पातळ्या प्रकट होतात. त्या आपल्या अस्सल भाववृत्ती विकसित करतात. यातून जो



## भाऊंची कार्यशैली

माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे यांच्या समवेत भवरलाल जैन सुरेश जैन व श्री. लेसली हॉल

भाऊंचे आयुष्य म्हणजे एक वेगळा ग्रंथ आहे. एकदा भाऊ एका पेट्रोलपंपावर उभे असतांना एक स्कॉटीश ड्रिलींगरींग गाडी डीझेल भरायला आली. त्या गाडीवर एक वाक्य लिहीले होते, ते म्हणजे 'ॲग्रीकल्चर इज द प्रोफेशन विथ फ्युचर.' म्हणजे शेती हा उज्वल भवितव्य असलेला व्यवसाय आहे. या वाक्याने भाऊंच्या मनावर परिणाम केला. यातून कृषिक्षेत्रामध्ये आपल्याला काय काय करता येईल याचा भाऊ विचार करू लागले. विविध प्रकारचे शेतीतील प्रयोग त्यांनी पाहिले. विविध ठिकाणी होणाऱ्या प्रकल्पांचे भाऊंनी मनापासून कौतुक केले. यातून प्रेरणा घेऊन भाऊंनी स्वत नवनवीन प्रयोग व प्रकल्प सुरू केले. त्यामुळे त्यांचे स्वतंत्र कार्य उभे राहीले. म्हणून केंद्रात १५ वर्ष कृषी राज्यमंत्री राहीलेले डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी भाऊंबद्दल असे उद्‌गार काढले की, 'भवरलालजीं सारखी १०० माणसे घडणार असतील तर या देशाचे भवितव्य नक्कीच उज्वल आहे.' हे उद्‌गार भाऊंनी खरे व सार्थ करून दाखविले. भाऊंनी मातीशी जो संवाद केला त्यातून त्यांनी एक नवे विश्व निर्माण केले. सोबत विविध प्रकारचे सहकारी मिळविले. याचे कारण आचार, विचार आणि उच्चार यांची त्रिवेणी भाऊंनी उत्तमरित्या साधली. सोशिकतेचा हा एक वेगळा आनंद होता. तो त्यांनी आयुष्यभर जपला. म्हणूनच भाऊंच्या आयुष्यात नव्या सूर्याचा उदय झाला. त्यातून एक वेगळी सृष्टी निर्माण झाली. जैन पाईप, जैन ठिबक जैन टिश्यूकल्चर आणि फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग हा शेती क्षेत्रातला महत्त्वाचा संवाद ठरला.



# कठोर परिश्रमांचा साक्षात्कार

भाऊंनी उद्योग व्यवसाय प्रामाणिकपणे व नेकीने नक्कीच केला. त्यातून समाजासाठी आपण काही केले पाहिजे याचे भान भाऊंनी ठेवले. मी जे काही मिळवितो आहे त्यातला काही वाटा समाजासाठी खर्च करायला पाहिजे ही जाणीव ठेवून ते आयुष्यभर वागत राहीले. भाऊंचे पूर्वज राजस्थानातून आले. अजिंठ्याच्या परिसरात त्यांचे बालपण घडले. वाकोदच्या भूमीत ते लहानाचे मोठे झाले. कठोर परिश्रमांनी, सद्गुणांनी आणि प्रामाणिकतेने काम केल्याने भाऊ महाराष्ट्राचे भूमिपुत्र ठरले. जळगावसारख्या गावात राहून भाऊंनी या गावाचे नाव जगाच्या नकाशावर आणले. भाऊंना आणखीन असे वाटत होते की आपण जर शेती क्षेत्रात आलो नसतो तर साहित्यिक झालो असतो, नामवंत वकील झालो असतो, पत्रकार झालो असतो किंवा उत्तम प्रशासकीय अधिकारी झालो असतो. कारण त्यांना या विविध क्षेत्रांची आवड होती. राजकारणात रस नव्हता. कारण भाऊंचे स्वच्छ मत असे होती की, महात्मा गांधींजींनंतर राजकारणाचा धंदा झाला आहे. शेतकऱ्यांच्या कुटुंबातला आनंद हा भाऊंना दिवाळीपेक्षा प्रिय होता. या देशातला शेतकरी सुखी झालाच पाहिजे हे भाऊंचे महास्वप्न होते. भारतातल्या प्रत्येक प्रांतामध्ये हे व्हावे यासाठी लोकांनी आपला वेळ द्यावा. उजाड माळरानावर जिथे भाऊंनी नंदनवन निर्माण केले त्याला भेट देण्यासाठी आज जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक येतात हा भाऊंच्या कठोर परिश्रमांचा साक्षात्कार आहे. जैन ठिबक सिंचन आज जगात नावाजलेले झाले आहे. यामध्ये भाऊंचे अहोरात्र राबलेले हात आहेत. हे तंत्रज्ञान देऊन त्यांनी सर्व लोकांना आपलेसे केले आहे. विज्ञाननिष्ठ नागरिक जन्माला घालणे आणि त्यांना डोळस विचार करायला लावणे ही फार मोठी ताकद भाऊंच्या व्यक्तीमत्त्वात होती. म्हणून भाऊ व्यवसायातले देव ठरले.


मूलभूत विचार प्रकटतो तो गाथा होतो. हाच जगण्याचा मूलमंत्र आहे. हा कोणत्याही गुरुच्या अनुग्रह मंत्रापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण त्यात वर्तमानाच्या समर्थ स्पंदांचे आत्मभान आहे. खरे तर हाच मोबाईल आहे. यात फक्त अभ्यासाचे नि समंजस भानाचे सिमकार्ड टाकावे लागते. ते कार्ड 'ती आणि मी' हा भाऊंचा ग्रंथ आहे. ते कळले तर माणूस कोणत्याही आपत्तीला आपत्ती न मानता तो आव्हानाचा नैवेद्य मानेल. माणसातला आत्मस्वर आकळला की तो त्याचा 'त्याचा' होतो. नि मग त्याचे त्याला कळते.

भाऊंना तुकाराम महाराज आणि त्यांची गाथा बरोबर कळली होती. 'अणुरेणू या थोकडा। तुका आकाशाएवढा' ।। याचे मर्म समजून ती जीवनात उतरविण्याचा भाऊंनी प्रयत्न केला व शेवटपर्यंत याच विचाराची कास त्यांनी धरली. अणुचे सामर्थ्य आजच्या जगाला सांगायची गरज नाही. अणुतली विधायक आणि विघातक ताकद विलक्षण आहे. तितकीच आकाशाची ताकद व्यापक आहे. या दोहोतला द्वंद्वसमास माणूस हा आहे. माणसाला हे दोन्हीही होता आले पाहिजे. त्याला अणुइतके लहान होऊन विश्वाचा अंकुर होता आले पाहिजे आणि आकाशाइतके व्यापक होता आले पाहिजे. दोघात सामर्थ्य आहे. दोघांचा श्वास समृद्ध आहे. अणूपणातली समृद्ध जाणीव आकाशाला तोलते, नि आकाशातली व्यापक जाणीव अणूला मानते. अणूपासून आकाशापर्यंतचा प्रवास हेच उपकाराचे आयुष्य आहे. या दोन बाबी अनुभवणे येरा गबाळाचे काम नाही. त्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करुन मनाला संयमी करावे लागते.

# केल्याने होत आहे रे.....

**'आम्ही या खेड्यात जन्मलो, दु:खाची गाथा**
**या खेड्याचे पांग फेडण्या, उन्नत हा माथा**
**दु:ख दैन्य, अन दारिद्र्यातील शेतकरी माझा**
**जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला फासा'**

कविवर्य ना.धो.महानोरांची ही कविता भाऊंना फार आवडे. या कवितेत ग्रामीण जीवनाचे योग्य चित्रण आहे. ज्या मायभूमीत आपण जन्मलो, शिकलो, वाढलो तिचे ऋण आपण फेडलेच पाहिजेत ही भाऊंना त्यांच्या आईने दिलेली शिकवण होती. ती लक्षांत ठेवून भाऊंनी मातीत कामात सुरु केले. प्रश्न असा होता भूगर्भात पाणी नव्हते. मग भाऊंनी प्लॅस्टिकचे अस्तर लावून शेततळे तयार केले. त्यामुळे साठवलेले पाणी टिकले. परंतु ते पाणी शेतीला कमी पडायला लागले. म्हणून बंधारा बांधला. त्यातील पाणी गळती बंद गेली. शास्त्रशुद्ध पद्धतीने माथा ते पायथा या तत्वानुसार पाणलोट क्षेत्र विकासाचे काम केले. पाण्याची



भाऊंच्या जीवनाकडे बघितल्यानंतर याची पुरेपूर जाणीव होते. भाऊ एवढे प्रचंड कर्तृत्ववान आणि ज्ञानी असूनही त्यांना ज्ञानाचा अहं नव्हता. ज्ञानाचे त्यांनी कधीही प्रदर्शन केले नाही. उलट ज्ञान ते मुक्तहस्ताने सहजपणे वाटत राहिले. ते वाटतानाही आपण कुणाला काही तरी देतो आहे अशी दात्याची भूमिका त्यांची कधीच नव्हती. काही वेळेला कांद्याचा वास परवडला पण काही लोकांच्या ज्ञानाचा दूरवासही नको वाटतो. भाऊ त्या मालिकेतले नव्हते. त्यामुळे प्रत्येक माणसाला त्यांना भेटावे, त्यांच्याशी बोलावे, त्यांचा आशीर्वाद घ्यावा असेच वाटत असायचे. ज्ञानाची खोली भाऊंना उमजलेली असल्यामुळे त्यांचे ज्ञान नम्र होते. विनम्र भावाने ते आत्मसाधनेचा भंडारा डोंगर जेव्हा बनत तेव्हा त्यांच्या कपाळी विठ्ठल आकाशाचा बुक्का लावीत असे. त्यामुळे भाऊ सर्वांना आपलेसे वाटत. भाऊंच्या कपाळी आपलेपणाचा बुक्का पूर्वीपासूनच लागला होता. त्यामुळे त्यांचे काम व कार्यकक्षा आकाशाएवढी विस्तारली.

भाऊंनी देण्याघेण्याचा व्यवहार आरंभापासून बाजूला ठेवला. ते कधीही अनिष्ट मार्गांनी गेले नाहीत. त्याचा त्यांना त्रास आणि मनस्तापही खूप झाला. परंतु समाजासाठी चांगले काम करणे त्यांनी थांबविले नाही. समाजाच्या भल्यासाठी मला जे उत्कृष्ट कार्य करावयाचे आहे त्यात कितीही संकटे आली तरी आपण डगमगायचे नाही हे भाऊंनी मनाशी पक्के केले. चांगल्या सवयी जोपासल्या. दैनंदिनी चोख ठेवली. कामावर नितांत प्रेम केले. म्हणून जैन उद्योगसमुहाच्या रचनात्मक वाटचालीला लोक आदर्श मानतात. इथे कसलाही गोंधळ नसतो. विचारांची स्पष्टता असते. त्यामुळे गुणवत्तेशी तडजोड नसते. जे करायचे ते सर्वोत्तमच अशी धारणा भाऊंनी सर्व सहकाऱ्यांमध्ये निर्माण केली. त्यातूनच कंपनी ठिबक सिंचनात जगात प्रथम क्रमाकांची ठरली. भाऊंनी आयुष्यात मैत्री धर्म पाळला. मी म्हणतो

कामे वाढवित नेली. डोंगर माथ्यावरील एकेक दगड वेचून भाऊंनी जैन हिल्स ही भूमी सजविली. पाणसाठे तयार झाले. वृक्ष लावले. फुले फुलविली. फळबागा वाढविल्या. त्या फळांनी लदबदल्या. हे अत्यंत कष्टाचे काम भाऊंनी प्रेमाने केले. जागोजागी ट्यूबवेल्स बनविल्या. जलस्त्रोतांच्या पुर्नभरणाची व्यवस्था केली. पावसाचे पाणी शक्यतो वाहून जाणार नाही याची काळजी घेतली. याचा परिणाम पाणी टिकले, मुरमात नवीन पाणी निर्माण झाले. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे भाऊंनी आधी केले आणि मग जनतेला दिले. याचा परिणाम जास्तीत जास्त भूक्षेत्र ओलिताखाली आले. कृषि उत्पादन वाढले. ठिबक सिंचन तंत्रज्ञानामुळे जैन हिल्सचा परिसर नंदनवन झाला. सर्वत्र हिरवाई बहरली. पाण्याची उपलब्धी झाली. पशुपक्षी मनसोक्तपणे बागडू लागले. वानरांनी तर प्रचंड धुमाकूळ घातला. त्यांचा सुरपारंब्याचा डाव पाहण्यातच माणसे गुंग झाली. पर्यावरणाचे रक्षण झाले. सृष्टीचा समतोल साधला गेला. एखादा निश्चय जर स्वच्छ असेल तर माणूस आजच्या काळातही भगीरथ होऊ शकतो हे भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातून पुन्हा एकदा जगाला दिसले आणि भाऊंच्या कार्यकर्तृत्वाला संपूर्ण जगाने मानाचा मुजरा केला.



गिरणा नदीवरील टाकरखेडा येथील कांताई बंधारा

तेच खरं असा हट्ट त्यांनी कधी केला नाही. उलट त्यांनी असे मानले की जे खरे आहे, चांगले आहे, तेच माझे आहे. आपल्या स्वच्छ आचरणावर भाऊंचा विश्वास होता. तीच परंपरा त्यांनी आपल्या कुटुंबात घातली. कुटुंबाला उत्तम संस्कार दिले. त्यांच्या पत्नी कांताबाईंच्या संस्काराची आणि त्यागाची त्यांना अलौकिक जोड मिळाली. त्यामुळे आजही वेगवेगळ्या प्रकारचे नवनवे प्रकल्प पुढे जाताहेत. निरामय आयुष्याचा हा एक आदर्श भाऊंनी निर्माण केला.

ज्याला सगळेच आयते मिळते किंवा ज्याला मेहनत फार करावी लागत नाही अशी माणसे स्वत:ला घडवू शकत नाहीत. देवाची मूर्ती घडवायला सुद्धा त्यावर घणाचे घाव घालायला लागतात. तेव्हां त्याला आकार येतो. कृषी क्षेत्रामध्ये पावलोपावली अडचणी संकटे असतात. ती केव्हां निर्माण होतील हे काहीही सांगता येत नाही. निसर्ग नेहमीच नवी नवी आव्हाने निर्माण करतो. कशाचा काहीही भरवसा नसतो. शेतकऱ्याची परिस्थिती नेहमीच नाजूक असते. शेतीमध्ये कधीही कॅश फ्लो नसतो. शेतीत जेवढे कष्ट घ्याल त्या प्रमाणात उत्पादन वाढते. यासाठी शेतकऱ्याला आधार देणे, त्याला काहीशी स्थिरता देणे याची काळजी भाऊ करीत. त्यासाठी 'सफल' बँकेची निर्मितीही त्यांनी केली. भारतात सर्वप्रथम ठिबक सिंचन योजना आणून व दर्जेदार साहित्याची निर्मिती करुन भवरलालजींनी शेतीच्या क्षेत्रात जे अद्वितीय व क्रांतीकारी काम केले ते चिरंजीव आहे. त्यामुळे देशाच्या शेतीचा चेहरामोहरा बदलून शेतकऱ्यांच्या जीवनात चैतन्याची एक नवी पहाट फुलली आहे. अत्यंत योग्य विवेकाने भाऊंनी अनेक पुढच्या योजना प्रत्यक्षात आणल्या. त्यासाठी भाऊंचा विविध स्तरांवरचा संपर्क आणि दूरदृष्टी महत्त्वाची होती. भाऊंनी लिहीलेल्या 'ती आणि मी' या आत्मचरित्रातून हे सारे प्रतिबिंबित



# विश्वाशी संवाद

संत तुकाराम महाराज देहू या छोट्याशा गावात राहून विश्वाचे झाले. याचे कारण तुकारामांचे चिंतन पुढील काळाला उपयुक्त ठरणारी शिदोरी होती. ती जीवनमूल्यांचा शोध घेणारी होती. त्यांनी जो अभ्यास केला तो मुळापासून केला. नम्र मनाने ते विश्वाला सामोरे गेले. भाऊंच्या जीवनाचा पट ही अशाच प्रकारे घडलेला आहे. अजिंठ्याच्या पायथ्याशी असणाऱ्या वाकोद सारख्या छोट्या गावात भाऊंनी जन्म घेतला आणि जळगाव सारख्या छोट्या गावातून व्यवसायाला प्रारंभ केला. भाऊंच्या दृष्टीने ते गाव छोटे नव्हते. त्या गावात पृथ्वी सामावणारी होती. जीवनाचे खरे सूत्र त्यांना तिथेच सापडले. तिथल्या मातीने त्यांना शिकविले. वृक्षांनी त्यांना निष्काम कर्मयोग दिला. रानाने भक्ती दिली. माणसांना जमवून त्यांनी विराट सावली निर्माण केली. सर्वांशी मोकळेपणाने संवाद साधला. त्यांनी कधीही कुणालाही कमी लेखले नाही. प्रत्येकाशी संवाद करुन त्यातले जे काही उपयुक्त असेल ते भाऊंनी आपले मानले. त्यामुळे भाऊंनी विविध मनांशी केलेला संवाद त्यांचे व्यक्तीमत्व घडवित गेला. त्यातून भाऊंनी आत्मविकासाचे चिंतन केले. मन स्थिर करण्यासाठी मनाला सतत कार्यप्रेरित ठेवले पाहिजे ही धारणा त्यांनी बाळगली. आपले काम आणि आपण यामध्ये भाऊ इतके तद्रूप झाले की इतरही अनेक माणसे भाऊंबरोबर मातीशी खेळती झाली. जगातली माती त्यांना आपलीशी वाटू लागली. त्यांच्या मनाच्या विशाल पातळीतून विश्वाशी संवाद घडू लागला. विश्वासाठी आपण जास्तीत जास्त चांगले काही केले पाहिजे असे त्यांना वाटले. आज ही गोष्ट खरोखर दुर्मिळ आहे.

झाले आहे. जगण्याला खरोखर काही मूल्य असेल तरच त्यातले अनुभव वाचावेसे वाटतात. प्राण्यांशी कसे वागावे, पशुपक्ष्यांना कसे सांभाळावे याचीही सार्थ जाणीव भाऊंना होती. बैलपोळ्याच्या सणात ते दरवर्षी स्वत: आवडीने सहभागी होत. बैलांना हाताने पुरणपोळी खायला घालीत. शेतात राबणाऱ्या हातांचा सपत्नीक नवी वस्त्रे देऊन सत्कार करीत. जैन हिल्सवरचा हा पोळ्याचा सोहोळा पाहण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील लोकही येतात. त्या सर्वांना आवडीने पुरणपोळीचे भोजन दिले जाते. पोळा सणावर भाऊंचे नितांत प्रेम होते. पोळ्याच्या सणाला शुभेच्छा देतांना त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे तो असा – ''बैलालासुद्धा त्रास होऊ नये म्हणून त्या मुक्या पण अतिशय काबाडकष्ट करणाऱ्या प्राण्याला धावायला लावणे, त्याहीपेक्षा त्याची प्रभातफेरी काढणे एवढेच आपण करतो. खेड्यात पोळ्याच्या नावाखाली बैलांच्या शर्यती लावतात. अघोरी प्रकार करतात. ते चुकीचे आहे. बैलाचे जीवन आणि माणसाचे जीवन आपल्या संस्कृतीत एकरुप झाले आहे. बैलाचे महत्त्व प्रचंड आहे. त्यामुळे गायीलाही महत्त्व प्राप्त झाले आहे. गायीला आपल्या धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. यासाठी प्राणी सांभाळले गेले पाहिजेत''.

ही दृष्टी अनुभवातून येते. निरीक्षणाची वेगळी दृष्टी असते. नक्की आपण काय करतो आहोत आणि नक्की आपल्याला कुठे जावयाचे आहे हा जर निर्धार केला तर जलसुरक्षिततेच गावाची समृद्धी आहे. यासाठी पाणलोट क्षेत्र विकास व जलसंधारणाचे काम

सर्व पातळ्यांवर व सर्व गावांमधून अत्यंत चोखपणे झाले पाहिजे आणि पाणलोटातून विकसीत झालेले पाणी काटकसरीने, ठिबकद्वारे व पिक पद्धतीची शिस्त पाळून काटेकोरपणे वापरले गेले पाहिजे यावर भाऊंचा कटाक्ष होता. तसा आग्रह ही त्यांनी दुसऱ्या जल व सिंचन आयोगाच्या बैठकांमध्ये धरला होता. यावरुन भाऊंचा मोठ्या धरणांना विरोध आहे असा काही लोकांचा समजही झाला होता. परंतु नंतरच्या बैठकीत भाऊंनी स्पष्टपणे सांगितले ''मोठी धरणे आणि पाणलोट विकासाचा कार्यक्रम हा हातात हात घालून गेला पाहिजे. हे दोन्ही कार्यक्रम एकमेकांना पर्यायी नसून पुरक आहोत. जिथे ज्याची योग्यता व गरज आहे तो कार्यक्रम पाणी उपलब्धतेचे प्रमाण लक्षांत घेऊन राबविला पाहिजे व सिंचनाचे सर्व पाणी पाईप व ठिबक–तुषार संचामधूनच वितरीत केले पाहिजे. तरच या दुर्मिळ व महागड्या संसाधनाचा वाटा अधिकाधिक लोकांना मिळू शकेल. यादृष्टीने पायलेट प्रोजेक्टही आपण राबविले पाहिजेत''.

२०१३ मध्ये गिरणा नदीवर जेव्हां ६३.२७ एमसीएफटी (१७९.२ कोटी लिटर) क्षमतेचा बंधारा बांधला गेला त्यापूर्वी त्या परिसरातल्या १६० विहिरी कोरड्या पडल्या होत्या. बोअरवेल दोनशे–चारशे फुटाच्या खाली गेली होती. पण बंधारा झाला. त्यात पाणी अडले आणि सगळ्या विहीरींना पाणी आले. बोअरवेलला अगदी २०–२५ फुटावर पाणी लागू लागले. असे जर गावागावात झाले तर शेतकरी सुखी होईल असे भाऊंना वाटे. असे किती तरी बंधारे पडले आहेत की ज्यावर कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत परंतु समाजाने जर आपले काही श्रम मातीत दिले तर काही नवा इतिहास असाही निर्माण होऊ शकतो. भाऊंनी या कांताई बंधाऱ्याच्या उभारणीतून जुन्या बंधाऱ्यांचे पुनरुज्जीवन डामडौलात पुन्हा उभे करुन ते समाजाच्या हितासाठी कसे वापरात आणावेत याचा आदर्श देशापुढे उभा केला. भाऊंनी अशी माणसे तयार केली की एखादा प्रकल्प करायचा म्हणजे करायचा. मग काय वाट्टेल ते होवो. फूड प्लॅन्टमध्ये एक मशिन एकदा नादुरुस्त झाले. जी.एच. नाईक नावाच्या साहेबांवर ते मशीन दुरुस्त करण्याची जबाबदारी भाऊंनी सोपविली. त्यांनी ते मशीन दोन हजारात दुरुस्त करुन घेतले. दुसऱ्या एका कंपनीला मशीन दुरुस्तीबाबत विचारले तेव्हां त्यांनी १० हजार रुपये फी सांगितली. इथे आपल्या लक्षात येईल श्रमाबरोबर कौशल्याला, ज्ञानाबरोबर समयसूचकतेला आणि प्रामाणिकपणाबरोबर सद्सद्विवेकाला जर जागे ठेवले तर असाही एक नवीन इतिहास निर्माण होऊ शकतो.

भाऊंनी विविध कामांसाठी माणसातले कलागुण हेरुन त्याप्रमाणे टीम निर्माण केल्या. त्यांना स्वच्छ प्रखर आत्मविश्वास दिला आणि कामाची संपूर्ण धुरा विश्वासाने त्यांच्या खांद्यावर ठेवून सांगितले ''स्वत:ची इमेज बदला, सर्व काही बदलेल''. अशा जगण्याला एक वेगळे मोल असते. नव्या कल्पनांना एक वेगळे अंगणही मिळते. लोकांच्या भल्यासाठी जे जे आपण काही करु


शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतात नेऊन भाऊ गहू पिकाची माहिती देताना



# गौरवशाली भाऊ

भवरलालजींना भारतीय आणि जागतिक पातळीवर विविध पुरस्कार मिळाले. शेती क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा संपूर्ण जगाने गौरव केला. या पुरस्कारांचा एक वेगळाच ग्रंथ तयार होईल. या पुरस्कारांचा डामडोल भाऊंनी कधीही मिरविला नाही. याचे कारण भाऊंनी महात्मा गांधीजींनी सांगितलेली साधन शूचिता आयुष्यभर जपली. आपल्या जीवनात माणूस जे काही प्रामाणिक काम करतो ते नेहमीच समाज हितासाठी उपयुक्त असते. सर्वसाधारण समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी जर आपले चिंतन वापरले तर ते अर्थपूर्ण वाटते. संत तुकोबारायांनी सांगितल्याप्रमाणे – **जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा।।** हे भाऊंचे जगण्याचे ध्येयवाक्य होते. ज्यांच्यापाशी काहीही नाही अशांच्या मनाला जर तुम्ही भिडलात आणि सामाजिक बांधिलकीतून जर तुम्ही काम केले तर विशेष सन्मानासाठी दुसरी कशाचीही गरज नसते. वेगवेगळया कारणांसाठी भाऊंना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. पद्मश्री हा सरकारचा सन्मान ही मिळाला. जागतिक बँकेनेही सन्मान केला. हे सर्व सन्मान व पुरस्कार भाऊंनी शेतकरी बांधवांना अर्पण केले. ही भाऊंची बाधिलकीची जाण पुढच्या पिढीली उपकारक आहे.

त्यामध्ये जनतेचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. या सगळ्याचा एक महत्त्वाचा भावार्थ असा आहे की तुम्हांला जगावेगळे वागता आले पाहिजे आणि जगावेगळे प्रकल्प चालविता आले पाहिजेत. म्हणून उजाड माळरानावर भाऊ जी स्वप्ने पाहात ती खूप मोठमोठी असत. त्यासाठी मोठी किंमत प्रसंगी मोजावी लागली. परंतु भाऊंची ही स्वप्ने जेव्हां पूर्ण झाली तेव्हां लोकांना जैन हिल्स, टाकरखेडा, उद्‌मलपेठचा फार्म हे नंदनवन असल्याचा साक्षात्कार झाला. लोकांचे मनोधैर्य वाढवून व मन मोठे ठेवून जर आपण काम केले तर आपण या पृथ्वीवर काही वेगळे करु शकतो आणि नव्या जगाच्या नव्या आशा पल्लवित करायला हातभार लावू शकतो हा भाऊंचा दृष्टिकोन आजही महत्त्वाचा ठरला आहे.

कष्टाने उभ्या केलेल्या जैन उद्योग समूहाला आज विदेशातही मान्यता आहे. या उद्योग समूहाने आधुनिक शेती व त्यावर आधारित निरनिराळे उद्योग सुरु केले. ते बघायला, माल घ्यायला व तंत्रज्ञान–मशिनरी पुरवायला देश विदेशातून अनेक लोक येतात. विविध प्रकल्पातून भाऊंमुळे अनेकांना रोजगार मिळाला. उद्योगात काम करणाऱ्या माणसांना आपुलकी, प्रेम व सौहार्दाने वागविले जात असल्याने प्रत्येकाला कंपनी आपलीच आहे असे वाटते. त्यामुळे ''वर्क कल्चर'' चांगले तयार झाले आहे. घड्याळाच्या काट्याकडे बघून काम करणारी माणसे फार थोडी

आहेत. भाऊंचे अशोक, अनिल, अजित आणि अतुल हे चारही सुपुत्र व आता नव्याने मोठ्या भाऊंची नातवंडेही जबाबदारीचे भान ठेवून काम बघू लागली आहेत ही अत्यंत समाधानाची बाब आहे. याचे सारे श्रेय भाऊंनी नातवंडांवर केलेल्या संस्कारांना आहे. संध्याकाळचे जेवण गावातल्या घरी भाऊंबरोबर करताना त्यांचा गप्पागोष्टींतून लहानग्यांशी जो संवाद होत असे तो नुसता श्रवणीय नव्हता तर उद्योगसमुहाच्या पुढच्या वाटचालीची पायाभरणी करणारा होता हे आज भाऊंच्या अनुपस्थितीमुळे निश्चित लक्षात येते. एखादा माणूस जाण्याने जी पोकळी निर्माण होते असे आपण म्हणतो त्या पोकळीचा खरा अर्थ काय ते इथे कळते. भाऊंनी पुढच्या पिढीला जी दृष्टी दिली त्यातून आणखीही नवे नवे काही चांगले घडत गेले आणि भविष्यातही घडणार आहे.

भाऊंच्या मुलाखती अनेक ठिकाणी झाल्या. विविध प्रसंगी त्यांची भाषणेही झाली. परंतु या साऱ्यातून भाऊंचे व्यक्तिमत्त्व अनेक अर्थांनी बहरले. संस्काराची महती, शिक्षण व्यवस्था, वाचन संस्कृती, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि त्यातून फुललेली भाऊंची प्रतिभा महाराष्ट्रात एक वेगळीच उद्योगाची संस्कृती निर्माण करणारी ठरली. भाऊंनी स्वत:चे नवे व्यवस्थापन शास्त्र निर्माण केले. त्यातून शेतीचा अभ्यास, जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकास, जल सुरक्षितता व स्वच्छ, शुद्ध पिण्याचा पाणी पुरवठा, प्रक्रिया कारखानदारी व कराराची शेती यावरची त्यांची चिंतने म्हणजे एका श्रेष्ठ कर्मयोग्याचे मौलिक चिंतन आहे. त्यामुळेच चालत्या बोलत्या चिंतनातून तयार झालेली त्यांची असंख्य ग्रंथसंपदा आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व आजही मननीय व अनुकरणीय वाटते. एवढेच नव्हे तर, माणुसकीने भरलेले वाटते.


भाऊंच्या द्वितीय पुण्यस्मरणाच्या निमित्ताने विशेष आढावा घेण्याचे कारण असे आहे की असे पुण्यस्मरण हे समाजाला स्फुर्तिदायी ठरते. ''तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हां घडो'' असे वचन लोकमान्य टिळकांच्या केसरीवर होते. पुण्यस्मरणाचा हा असा अर्थ आहे की व्यक्तीचे कर्तृत्व देहाने जरी काळाआड गेले तरी त्यांच्या जगण्याचा तोल मौलिक असतो. पुण्य या शब्दाचा महाभारतातला अर्थ असा आहे 'विधायक उत्कृष्ट कर्तृत्व करणारे'. जे समाजासाठी झटतात, समाजाच्या प्रगतीचा ध्यास घेतात, त्याप्रमाणे कार्यरत होतात, त्यांना त्यांच्या जीवाची बिलकुल पर्वा नसते.


अनंत आमुची ध्येयासक्ती,
अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला

हे कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी लिहिलेले वचन प्रत्यक्ष साकार करणारे भाऊ म्हणून त्यांचे पुण्यस्मरण करायचे. हा उपचार नाही. सामाजिक कृतज्ञनेचे ते एक सुंदर मंथन आहे. व्यक्तीचे कार्य कायम मोठे राहते आणि त्यातून अनेकांना प्रेरणा मिळतात. विचार आणि विवेक यांच्या पायावर त्यांची जडणघडण होते. मग कोणत्याही गावात अशी व्यक्ती राहो, ती ग्रामीण आहे का शहरी हा प्रश्नच नसतो. त्या व्यक्तीला नेहमीच भविष्याचे आकाश खुणावत असते. नवी नवी क्षितीजे येत असतात. नव्या क्षितीजांची पर्वे येतात. नव्या नव्या पर्वांचे नवे कालखंड जन्माला येतात आणि या



साऱ्यातून संस्कृतीची देवाणघेवाण समर्थपणे होण्यासाठी पुण्यस्मरणाची गरज असते. अशा महान व्यक्तींच्या कार्यापासून आपण काय बोध घेतला आहे याचा पुण्यतिथीच्या दिवशी लेखाजोखा करायचा असतो. जैन उद्योग समुहाच्या व जैन हिल्सच्या समृद्धतेत भाऊंचे स्मरण हे महाराष्ट्राच्या कृतज्ञतेचे स्मरण आहे. माननीय भाऊंना आदरपूर्वक वंदन !


खेड्याकडे चला हे
द्रष्टे
व्यक्तिमत्व



# कृतीने सांगणारे

ग्रामीण विकास म्हणजेच शेतीचा विकास हे कळायला जागतिक बँकेलाही ५० वर्षे लागली. परंतु भवरलालजींना हे फार आधीच कळले होते की, शेतीचा विकास केला आणि तिला थोडे का होईना पण पाणी देण्याची व्यवस्था केली तरच खेड्यांचा व ग्रामीण भागाचा विकास होईल. त्या दृष्टीने शेतीच्या सर्वांगिण विकासासाठी भाऊ आयुष्यभर झटत राहिले. मुख्य म्हणजे ते सगळे काम आपल्या गावात राहून करीत होते. शहरात राहण्याचा व तिथल्या सुखसोईंचा हव्यास त्यांनी कधीच धरला नाही. त्यामुळे वाकोद, जळगाव सारख्या गावात राहून जे दैदीप्यमान काम त्यांनी देश व जगभर उभे केले ते पाहून सारे जगही अचंबित होते. इतक्या कमी कालावधीत एवढे मोठे काम एका माणसाला करणे कसे शक्य झाले? हा कदाचित आता नियतीलाही पडलेला प्रश्न असेल.



डॉ. दि. मा. मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र सिंचन सहयोग
मोबा. ९४२२७७६६७०

महाराष्ट्रातील ठाणे या आदिवासी जिल्ह्यामध्ये एका खाजगी सेवा भावी संस्थेच्या आर्थिक सहाय्याने शेकडो काँक्रीटचे बंधारे बांधून वाहून जाणारे पाणी अडवून, पावसाळी हंगामानंतर दुसरे व तिसरे पीक घेण्यासाठी पाणी उपलब्ध करुन गरीब आदिवासी लोकांच्या जीवनामध्ये सुखाचे दिवस आणण्यासाठी झटणाऱ्या शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असणाऱ्या जगताप नावाच्या अभियंत्याला पुरस्कार देऊन गौरव करणाऱ्या पुण्यातील एस.एम. जोशी सभागृहामधील दि. २५ फेब्रुवारी २०१६ ला संध्याकाळी ६ वाजता होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निघालो होतो. अचानकपणे आदित्य फिचर्स या वार्तांकन करणाऱ्या संस्थेतून फोन आला आणि त्यांनी भवरलालजी जैन उर्फ भाऊ गेल्याची बातमी कानावर घातली. क्षणभर युग संपल्याचा भास झाला. दि. २७ फेब्रुवारीच्या संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्यांचा देह पंचत्वात विलीन करण्यात आला. जैन हिल्स नावाच्या डोंगरावर वातावरण शोकाकूल झालेले होते. हजारोच्या संख्येने माणसाचे थवे जैन हिल्स म्हणजेच भाऊच्या निश्चेष्ट देहाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी दोन दिवसापासून येत होते, जात होते, काहीजण थांबत होते. माणसे मूकपणे एकमेकांशी बोलत होती. मरणाला अनेक वेळा कशा हुलकावण्या दिलेल्या आहेत याचे वर्णन भाऊ सहजपणे अनेक वेळा हसत हसत करत असत आणि म्हणून या वेळेस ते सर्वांमधून निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते. गेले पंधरा दिवस ते उपचारासाठी मुंबईतच होते. नेहमीप्रमाणे परत येऊन कामाला स्वत:ला जुंपून घेतील अशीच अपेक्षा जवळ जवळ सर्वांचीच होती. नियतीने हे भाकित खोटे ठरविले. जळगावच्या दिशेने तोंड करुन उभे राहाणेदेखील गलबलल्यासारखे होते. गेल्या २० एक वर्षापासूनच्या सहवासात जैन हिल्सवरील भाऊंचा सहवास माझ्या सारख्यांना माहेरी जाण्याचे समाधान मिळवून देत होता. महिलांनाच माहेरचे सुख अनुभवास मिळते हे पूर्ण सत्य नाही याची प्रचिती भाऊंच्या सहवासात मला मात्र आलेली आहे. 'मोरे साहेब, खूप दिवस झाले आला नाहीत', अशी हाक आता ऐकू येणार नाही, हे दु:ख पेलवण्यासाठी बराचसा काळ जावा लागेल.

जून १९९६ चा महिना होता. नांदेड या ठिकाणी अधीक्षक अभियंता म्हणून काम करण्यामध्ये साडे पाच वर्षाचा काळ लोटला होता. शासकीय अधिकाऱ्यांची तीन चार वर्षानंतर बदली होत असते. केव्हांतरी आणि कोठेतरी लवकरच बदली होईल असे वातावरण होते. कालवा आणि कालव्यावरील बांधकामे याच्या डिझाईन्समध्ये गेल्या ४०–५० वर्षाच्या पाटबंधारे विभागाच्या अनुभवावर आधारित सुधारणा कराव्यात, काही बांधकामाच्या डिझाईन्सचे प्रमाणिकरण करावे असा विचार मनामध्ये घोळत होता आणि त्या दृष्टीने पुणे वा नाशिक या ठिकाणी संकल्प चित्र मंडळात बदली व्हावी अशी इच्छा व्यक्त केलेली होती. पण मनात असेल तसे होत नसते. डिसेंबर १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाने पाणी आणि सिंचनाच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर समर्पक उत्तरे शोधून राज्याच्या विकासाच्या पुढच्या दिशेबद्दल शिफारसी करण्याबाबत महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाची (राज्याचा सिंचनाचा दुसरा आयोग) स्थापना केली होती. आयोगाच्या रचनेमध्ये वेगवगळ्या क्षेत्रात (सिंचन, कृषी, सहकार, अर्थशास्त्र इ) अनुभव असणाऱ्या एका डझनापेक्षा जास्त सदस्यांची नेमणूक केलेली होती. त्यांना मदत करण्यासाठी वेगवेगळ्या विषयातील एक डझनभर अधिकाऱ्यांच्या नेमणुकीची पण तरतूद करण्यात आलेली होती. मा. भवरलालजी जैन यांची त्यांच्या आधुनिक सिंचन पद्धतीतील गाढा व्यासंग, अनुभव आणि अभ्यास, ग्रामीण भागाच्या विकासाच्या दिशा या विषयातील त्यांची



जैन हिल्सवर केलेल्या पाणलोट विकासाच्या कामाची माहिती श्री. भवरलाल जैन हे डॉ. दि.मा. मोरे यांना देतांना शेजारी श्री. अशोक जैन, श्री. अजित जैन, श्री. अतुल जैन, श्री. अभिजीत जोशी, श्री. व्ही.डी. पाटील व इतर मान्यवर.



दुसऱ्या जल व सिंचन आयोगाच्या जळगाव येथे झालेल्या बैठकीत कवी ना.धों. महानोर बोलताना, शेजारी डॉ. सुधीर भोंगळे, डॉ. श्रीरंग कद्रेकर, श्री. बापूसाहेब पुजारी, श्री भवरलाल जैन, डॉ. माधवराव चितळे आणि श्रीमती उलेमाले व सौ. महानोर

गती इ.चा लाभ घेण्यासाठी आयोगामध्ये सन्माननीय सदस्य म्हणून शासनाने नेमणूक केली होती. डॉ. माधवरावजी चितळे हे अध्यक्ष होते आणि पुढे चालून मी सदस्य सचिवाचा कार्यभार सांभाळला. या आयोगामध्ये कृषी विद्यापीठाचे कुलगुरू होते. प्रशासनाचा गाढा अभ्यास असणारे श्री. भुजंगरावजी कुलकर्णी व माती या विषयाचे गाढे अभ्यासक डॉ. एस.बी. वऱ्हाडे होते. साखरेचे अर्थशास्त्र मांडणारे नाशिकचे बाळासाहेब वाघ होते. आयोगाचे काम चारएक वर्षे चालले. पाणी या विषयातील लोकांचे विचार, त्यांच्या कल्पना समजून घेण्यासाठी हजारो लोकांना बोलते केले गेले. अनेक बैठका घेतल्या, राज्यातील वेगवेगळ्या नदी खोऱ्यात विविध विषयावर कार्यशाळा घेतल्या. महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, पाऊस, पाणी, माती प्रत्यक्ष फिरून जाणून घेण्याचा प्रयत्न झाला. जून १९९९ मध्ये २००० पानांचा व शंभराच्या आसपास नकाशे असणारा पाच खंडातील अहवाल शासनास सादर करण्यात आला. २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील सिंचन हे थेंबातून विकासाची क्रांती करणारे असेल आणि त्यादृष्टीने लगोलग धोरणे आखणे गरजेचे आहे अशा दूरगामी विचाराची शिफारस भवरलालजी जैन यांच्या परिपक्व अनुभवाच्या आधारानेच करण्यात आली असे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल.

जून १९९६ च्या अखेरीस नांदेडहून माझी बदली झाली आणि लागलीच जुलैच्या पहिल्या आठवड्यात आयोगाचा कार्यभार स्वीकारला. आयोगाची निर्मिती होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त काळ लोटला होता. पण आयोगाचे काम करण्यासाठी शासनाला अधिकारी मिळत नव्हते आणि ती वास्तविकता होती. आयोगात आल्यानंतर वेगवेगळ्या विषयातील दहा ते बारा अधिकारी मिळवण्यासाठी एक ते दीड वर्षाचा प्रयत्न करावा लागला. आयोगाचे सर्व सदस्य अराजकीय आणि अप्रशासकीय होते. शासनाच्या बाहेर राहून स्वत:च्या आवडीच्या व्यवसायात रमून राज्याला विकासाची एक वेगळी दिशा देण्याची क्षमता त्यांच्याकडे होती असे म्हणावे लागेल. चितळे सर त्यांच्या सर्व सदस्यांना अतिशय आदराने वागवत असत आणि म्हणून तीच सवय आमच्या अंगवळणी आम्हाला पाडून घ्यावी लागली. शासकीय अधिकारी म्हणून आम्हाला आमच्या वरिष्ठांचा आणि राजकीय लोकांचा मान राखण्याची सवय लागलेली असते. याच्याही पलीकडे एक वेगळे जग आहे आणि ते अधिक मूल्यवान आहे याची कल्पना फार थोड्या लोकांना आलेली असते. आयोगामध्ये काम केल्यामुळे हे सर्व शिकण्याची मला संधी मिळाली आणि याचा मला खूप लाभ झाला. आयोगामुळेच भवरलालजी जैन सारख्या एका द्रष्टया विचारवंताचा जवळून सहवास लाभला. जैन हिल्स जळगाव येथील निर्मितीशी आपुलकीचे नाते जुळले. भाऊंच्या कुटुंबाचा आपणही एक भाग झालो आहोत का असेही मला अधून मधून वाटत असे. चांगुलपणा वरुन पाझरत असतो याची प्रचिती मला येत गेली.

आयोगाच्या बैठका साधारणत: दर महिन्याला होत असत. कामाच्या व्यग्रतेमुळे आणि प्रकृतीवरील प्रवासाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने आयोगाच्या सर्वच बैठकांना भाऊंची उपस्थिती लाभत नव्हती. आयोगाच्या सर्व सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना मात्र भवरलालजींनीच बैठकीला यावे आणि त्यांचे मौलिक विचार द्यावेत असे मनापासून वाटत होते. अधून मधून जळगावातून बर्वे नावाचे पाटबंधारे खात्यातील एक निवृत्त अधिकारी भाऊंच्या गैरहजेरीत बैठकीला येत असत. भाऊ आपणच या असे आग्रहाने सांगण्याचे धाडस आम्हाला कधी तरी करावे लागत असे. आयोगाच्या सदस्यांना सन्मानाने वागणूक देण्याबाबत चितळे सर फार संवेदनशील होते. भवरलालजी ज्या ज्या वेळी बैठकीसाठी येत असत, तेव्हा बैठकीतील त्यांची जागा अध्यक्ष, म्हणजे चितळे



जैन हिल्सचा परिसर विकसीत करण्याच्या कामाचा शुभारंभ श्री. भवरलाल जैन व त्यांच्या सुविध पत्नी सौ. कांताबाई भूमीपूजनाने करताना.

सरांना लागून असे. दुसऱ्या बाजूला भुजंगरावजी असत. तशा सूचना चितळे सरांनी दिलेल्या होत्या. त्याचे पालन चारही वर्षे न चुकता आम्ही केलेले होते. आयोगातील सहभागाबद्दल भाऊंनी शासनाकडून मानधन घेतले नाही. देणे एवढेच माहिती होते, घेणे नाही.

साधारणत: आयोगातील एका वर्षाच्या कालावधीनंतर आधुनिक सिंचन पद्धतीच्या वेगवेगळ्या उपांगाची माहिती करुन घेण्यासाठी, डोंगराळ आणि पडीक जमीनीचे शेतीत रुपांतरण करण्याचे अर्थशास्त्र जाणून घेण्यासाठी, आयोगाची बैठक जैन हिल्स जळगाव याठिकाणी (१९९६-९७) घेण्याचे निश्चित झाले. त्यादृष्टीने पूर्व तयारी म्हणून भाऊंना भेटण्यासाठी मी जैन हिल्सच्या परिसरात प्रथमत: पाऊल टाकले. जैन हिल्सवर गुरुकुल आणि पाच बंगल्याचे काम झालेले होते. माझा मुक्काम बंगला नं. १ म्हणजेच भाऊंचे निवासस्थान याठिकाणी होता. त्या डोंगरावरील फळबागाची, वृक्षराईची, टिश्यू कल्चर नर्सरीची, प्रशिक्षण केंद्र आणि निवासी बंगल्याची व्यवस्था पाहून मी हरखून गेलो. भाऊंच्या कल्पक दृष्टीतून अमेरिका, जर्मनी, जपानसारख्या पुढारलेल्या देशात जे वातावरण निर्माण केलेले सापडणार नाही, त्याच्यापेक्षाही काकणभर सरस व सुबक व्यवस्था जैन हिल्सवर करण्यात आलेली मला दिसली. माझ्या काही पत्रात जैन हिल्सचा उल्लेख 'पृथ्वीवरील स्वर्ग!' असा केल्याचे मला आठवते. कारण मला तसे मनापासून वाटत असे. स्वच्छता आणि नीटनेटकेपणा अप्रतिम असते. भोजनाची, निवासाची व्यवस्था अतिशय कल्पकतेने केलेली दिसून येते. व्यवस्थेला जो कर्मचारी वर्ग आहे, तो देखील तितकाच सालस, स्वच्छ आणि नम्र आहे . पहिल्याच भेटीत भाऊंच्या कल्पक दृष्टीतून निर्माण झालेल्या परिसराने मला भुरळ घातली आणि भाऊंच्या विचारांच्या मी जास्त जवळ गेलो. त्यांनी निर्माण केलेल्या परिसरात भाऊंनी म. गांधी आचरणात आणल्याची प्रचिती प्रथमत: या ठिकाणीच होते. जगामध्ये अनेक लोक बोलतात पण त्याप्रमाणे वागत नाहीत. पर्यावरणाची जपणूक करण्याचा संदेश देणाऱ्या कार्यशाळा, सभा, समारंभामध्ये प्लॅस्टीकचा वारेमाप वापर केलेला दिसतो आणि परिसर विद्रूप होतो. याची



जैन हिल्सच्या माळरानावर कामाची पाहणी करताना श्री. भवरलाल जैन

दखलपण कोणी घेत नाही. चांगुलपणाची सुरुवात आपल्यापासून करावी याचा धडा भाऊंच्या प्रत्येक कृतीतून इतरांना मिळत असतो. म. गांधी म्हणत असत, 'माझे जीवन हाच माझा संदेश आहे', हे घोषवाक्य भाऊंना फार चपखलपणे लागू होते असेच मला वाटून जाते. 'स्वच्छता ही ईश्वराचे दुसरे रुप आहे', असेही म. गांधीजी म्हणत असत. हजार एक एकराचा खाजगी डोंगर भाऊंनी विकत घेतला आणि पुढे त्याचे नंदनवनात रुपांतरण केले. त्याच डोंगरावर पडणारा तुटपुंजा पाऊस साठविण्याची व्यवस्था केली आणि त्या पाण्यातूनच सर्व परिसर हिरवा केला. भर एप्रिल, मे महिन्यात तापमानाचा आकडा ५०० से.ग्रेड कडे झेपावत असताना एकही झुडुप पाण्याविना कोमेजलेले दिसत नाही. परिसरात पाणीही कोठे दिसत नाही, मात्र हिरवाई सगळीकडे पसरलेली दिसते. त्यांनी निर्माण केलेल्या प्रत्येक कलाकृतीतून जीवनाला एक वेगळाच संदेश देणारा अर्थ निघतो. त्यांचे सहज बोलणे पण विचार करुन तयार केलेल्या म्हणीपेक्षाही अधिक भारदस्त आणि अर्थपूर्ण असायचे. त्यांच्या बोललेल्या वाक्याचे जर संकलन केले गेले तर एक उत्तम असा ग्रंथ निर्माण होईल आणि येत्या काळात जैन इरिगेशन ही संस्था हे काम निश्चित करेल असे मला वाटून जाते.

पावसाच्या पाण्याचा साठा करण्यासाठी जैनहिल्सवर केलेले तळे



ठरल्याप्रमाणे आयोगाची बैठक जैन हिल्सवर पार पडली. आयोगाच्या सर्व सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना जैन उद्योग समुहाने जळगाव परिसरामध्ये प्लॅस्टीक पार्क, फूड प्रोसेसिंग उद्योग, सौर ऊर्जा उपकरणे आणि ऊर्जा निर्मिती, टिश्यू कल्चर नर्सरी, आंबा, पेरु, डाळींब इ. च्या फळबागा आणि ठिबक, तुषार सिंचन पद्धतीची वेगवेगळी उपकरणे इ. सर्व बाबी तपशीलवारपणे पाहता व समजून घेता आल्या. ओबड धोबड डोंगराचे यंत्राच्या सहाय्याने शेतीत रुपांतरण करणे, सर्वसामान्यांना अर्थशास्त्रीस दृष्टीने परवडणारे नाही हे पण ते मनमोकळेपणाने बोलत असत. याच दौऱ्यात तापी नदीवरील हतनूर धरणाला आणि वाकोद या त्यांच्या जन्मगावी केलेल्या जल संधारणाच्या आणि वृक्ष संवर्धनाच्या कामालाआयोगाने भेट दिली. वनाला सिंचनाची सोय केली तर वृक्षाची वाढ दुप्पट होते याचा प्रयोगपण पाहिला. धरण स्थळावर परिसरातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत आयोगाची बैठक झाली. शेतकऱ्यांनी भूसंपादनाचे आणि पुनर्वसनाचे प्रश्न मांडले. मला आठवते, भाऊंनी शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांना उचलून धरले. पाटबंधारे आणि महसूल खाते सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या, शेती गमावून अडचणीत आलेल्या लोकांचे प्रश्न सोडविण्यामध्ये संवेदनशीलता अजिबात दाखवत नाही आणि म्हणून आयोगाने यासाठी काही भरीव शिफारसी करण्याची गरज आहे असेही ते बोलून गेलेले होते. आयोगाच्या अहवालात भूसंपादन आणि पुनर्वसन या प्रकरणात या बाबीचा योग्य तो परामर्ष घेऊन काळाच्या पुढे एक पाऊल टाकून शिफारसी करण्यात आलेल्या आहेत. आयोगाचा दोन ते तीन दिवसाचा जैन हिल्स



जैन हिल्सचा परिसर. सौर कृषी पंपाच्या मदतीने विहिरीतून पाणी उपसून त्यावर पिके घेतली जातात त्याचे हे प्रात्यक्षिक



जैनहिल्स येथे आंबा पिकावर प्रक्रिया करणारा प्रकल्प

या ठिकाणचा मुक्काम संपवून आम्ही परत औरंगाबादला आलो. आयोगाची ही भेट मात्र सर्वांच्याच स्मरणात राहिली आणि मी मात्र भाऊ, त्यांचे शेतकरी आणि देशाप्रती विचार आणि जळगावच्या अवती भवती त्यांनी निर्माण केलेले विश्व यांच्या जास्त जवळ गेलो.

आयोगाचा अहवाल अंतिम करण्याचे (१९९८-९९) प्रयत्न चालू होते. औरंगाबाद या ठिकाणची त्याअर्थाने शेवटची बैठक साधारणत: एक आठवडा चाललेली होती. वेगवेगळ्या विषयावर तपशीलवारपणे लेखन करुन त्यातून केल्या गेलेल्या शिफारसीची मांडणी एका स्वतंत्र प्रकरणात केलेली होती. शिफारसीवरुन शेवटचा हात फिरवत असताना एक मुद्दा खूप वेळ चर्चेत राहिला आणि तो म्हणजे ठिबक आणि तुषार या व्यवस्था, कालवे, वितरिका या धर्तीवर सिंचन प्रकल्पाचा पायाभूत भाग म्हणून समजण्यात याव्यात अशा अर्थाने करावयाच्या शिफारसीचा होता. पाण्याचा कार्यक्षमपणे वापर करण्यासाठी आणि शेती उत्पादनाची उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करण्याची गरज याविषयी कोणाही सदस्यांच्या मनात कसलाही किंतु नव्हता. कालवे, वितरिकांचे जाळे हे जमीनीशी एकजीव झालेले असते. ठिबक, तुषार इ. साठी जमीनीच्या पृष्ठभागावर वेगवेगळ्या आकाराचे प्लॅस्टीकचे पाईप अंथरावे लागतात आणि त्याच्या देखभाल, दुरुस्तीची आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी संबंधित शेतमालकावर पडते. या बाबतीत शेतकऱ्यांचा सहभाग हा महत्त्वाचा घटक ठरतो. अन्यथा शासनाने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सार्वजनिक पैसा गुंतवून जमीनीवर पसरलेले जाळे कसे टिकून राहील याचा मोठा प्रश्न समोर येतो. चर्चेमध्ये या प्रश्नाला उत्तर मिळत नव्हते. महाराष्ट्रासारख्या पाण्याची चणचण असणाऱ्या राज्यामध्ये आधुनिक सिंचन पद्धतीचा प्रसार व्यापक प्रमाणात होऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळून सिंचित शेतीचे क्षेत्र विस्तारित करण्याच्या दृष्टीने भाऊंना हा विषय फारच महत्त्वाचा वाटत होता. ठिबक, तुषारचा वापर जलदगतीने करण्याबद्दल आयोगाचे पूर्ण एकमत होते. तरीपण वर उल्लेख केलेल्या अडचणीचा विचार करुन आणि सद्यस्थितीतील शेतकऱ्याची मानसिकता विचारात घेऊन तशा प्रकारची शिफारस करता आली नाही. भाऊंच्या मनात ती सल राहून गेली. अधून मधून त्या विषयाची आठवण होत असे. ते विनोदाने म्हणत असत, 'मोठ्या सिंचन प्रकल्पाचे तुम्ही सर्वजण पाठीराखे आहात. लहान शेतकऱ्याचे दु:ख तुम्हाला कसे समजेल?'

ठिबक, तुषार सारख्या योजनेचे जाळे सार्वजनिक पैशाच्या गुंतवणुकीतून जमीनीवर बसवत असताना, शेतकऱ्यांचा स्वयंप्रेरित सहभाग हा एक महत्त्वाचा घटक राहाणार आहे. ज्या ज्या ठिकाणी तो मिळेल त्या ठिकाणच्या सिंचन व्यवस्थेला स्थैर्य मिळणार आहे आणि सिंचन विस्तारातून ग्रामीण जीवनाला आधार मिळणार आहे. पंधरा सोळा वर्षाचा काळ पुढे आलेला आहे. कर्नाटक आणि गुजरात सरकारने उपसा सिंचन योजनेच्या मदतीने तलाव आणि कालव्यावर ठिबक आणि तुषार चे जाळे शेतकऱ्यांच्या जमीनीवर बसविण्याचा प्रयोग राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्रामध्ये पण यवतमाळ जिल्ह्यात बेंबळा सिंचन प्रकल्पावर स्वयंचलित ठिबकचे जाळे बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. शासन पुढाकारातून हाती घेतलेल्या या सिंचन प्रकल्पाच्या यशस्वीततेतून



या विषयासंबंधीची पुढची दिशा सापडणार आहे. या प्रकल्पामध्ये ठिबक, तुषार चे जमीनीवर पसरलेले जाळे सिंचन प्रकल्पाच्या पायाभूत सोयीचा एक भाग होणार आहे. जैन इरिगेशनकडून कर्नाटकमध्ये शिग्गाव तालुक्यात दहा हजार हे. क्षेत्रावर तुषार सिंचन पद्धतीची व्यवस्था शेतकऱ्यांच्या शेतावर बसविण्यात आलेली आहे. दोन तीन वर्षाचा काळ गेलेला आहे. याठिकाणचा अनुभव बरेचसे काही शिकवून जाणार आहे. कृष्णा नदीवरील आलमट्टी धरणाच्या खालील बाजुस असलेल्या नारायणपूर जलाशयातून पाणी उचलून कर्नाटक शासनाकडून ठिबक सिंचन व्यवस्थेचे जाळे जवळ जवळ पंचवीस हजार हे. जमीनीवर बसवून देण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे समजते. यातील अर्ध्या क्षेत्रावर जैन इरिगेशन काम करत आहे. गुजरात सरकारच्या पुढाकाराने सरदार सरोवर प्रकल्पाच्या कालव्यावर पण ठिबक/तुषारचे जाळे जैन इरिगेशनच्या माध्यमातून बसविलले आहे. या वेगळ्या धाटणीच्या प्रकल्पाच्या यशोगाथेमधून सिंचित क्षेत्रातील विकासाची पुढची दिशा निश्चित करावी लागणार आहे. भाऊंच्या सांगण्यावरुन शिग्गाव प्रकल्पाला भेट देऊन त्या संबंधीचा अहवाल तयार करुन दिल्याचे मला आठवते.

डिसेबर २००५ मध्ये मी शासकीय सेवेतून निवृत्त झालो. अधून मधून सिंचन विषयक वेगवेगळ्या उपक्रमाच्या निमित्ताने जैन हिल्सला येऊन भाऊंशी भेट घेण्याचा योग येत असे. मुंबईमधील चार वर्षाचे वास्तव्य मुंबईतील जैन इरिगेशनच्या स्थानिक व्यवस्थेमुळे खूपच सुकर झाल्याची कबुली देण्यात मला कृतज्ञतेचा आनंद वाटतो. अनेकवेळा असे वाटून जाते की, आपण किती भाग्यशाली आहोत कारण जैन इरिगेशनसारख्या नावाजलेल्या संस्थेच्या सहवासात आपल्याला वावरता येते. आपल्या दैनंदिन जीवनातील वैयक्तिक अडचणीवर मात करण्याचे बळपण मिळते. महासंचालक म्हणून माझे शेवटचे शासकीय सेवेतील वास्तव्य नाशिक येथील दिंडोरी रोडवरील मेरी संस्थेच्या परिसरात होते. याठिकाणी गोदावरी नदीच्या डाव्या तीरावरील जवळ जवळ दोनशे हे. जमीन १९६० च्या दरम्यान पाटबंधारे खात्याने संपादित करुन स्वत:च्या अखत्यारित ठेवलेली आहे. गेल्या पन्नास साठ वर्षाच्या अनुभवावरुन लक्षात आले की, या एकूण जमीनीपैकी केवळ साधारणत: ५० हे. जमीन कार्यालये, निवासस्थाने, प्रयोगशाळा इ. साठी वापरण्यात आलेली आहे. पाटबंधारे म्हणजे आजच्या जलसंपदा खात्याचा संशोधन, प्रशिक्षण इ क्षेत्रात भविष्यात होणाऱ्या विस्ताराचा विचार करता पन्नास हे. पेक्षा जास्त क्षेत्र व्यापले जाणार नाही. या अतिशय सुपीक आणि भूजलाने समृद्ध असलेल्या जमीनीला लागूनच गोदावरी नदीवरील गंगापूर धरणाचा डावा कालवा बारमाही वाहातो. कधीकाळी भविष्यातील विकासाचा अंदाज घेऊन शेतकऱ्यांकडून संपादित केलेल्या अधिकच्या जमिनी पासून उत्पादन घेण्याच्या दृष्टीने योजना आखणे हे राज्याला हितकारक ठरते. अलिकडच्या काळात बदललेल्या नियम व कायद्यामुळे दिडशे दोनशे हेक्टर. इतक्या मोठ्या क्षेत्राचे शासकीय व्यवस्थेकडून संगोपन करणेपण कठीण जाते. अशा जमीनी, विनावापर उघड्या ठेवणेपण समर्थनीय ठरत नाही. याबाबतचा बराच उहापोह भवरलालजी जैन हेच सदस्य असलेल्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या अहवालात केलेला आहे. मला हा विषय अस्वस्थ करत होता. यादृष्टीने विचार करुन काहीतरी करावे म्हणून नाशिकहून मी जैन हिल्सवर भाऊंना भेटण्यासाठी आलो. भाऊंबरोबर हा विषय काढला. जमीनीची



ठिबकवर अगदी छोट्या झाडालाही लदबदलेली मोसंबी

मालकी शासनाकडे अबाधित ठेवून आणि खात्याकडे संशोधनाच्या दृष्टीने लागणारी जमीन चगळून उर्वरित जमीनीवर फळबागाची लागवड करुन राष्ट्रीय उत्पन्नात भर घालता येईल आणि अतिशय सुपीक असा तो भाग वृक्षाच्छादितपण करता येईल. पर्यावरणाची जपणूक होईल. शासनाला पण विकसकाबरोबरच उत्पन्न मिळेल. भाऊंना हा विषय खूप आवडला. पण ते पुढे म्हणाले, तुम्ही असेतोपर्यंतच काहीतरी होईल अन्यथा पाटबंधारे विभागला असा विधायक विचार सुचण्याची व पटण्याची सुतराम शक्यता नाही. तुम्ही प्रयत्न करा, मान्यता मिळाली तर मेरी संस्थेच्या अखत्यारितील संपूर्ण दोनशे हेक्टर क्षेत्राचा जैन इरिगेशन संस्था कायापालट करेल. उपजाऊ जमीनीचे रुपांतरण उत्पादक जमीनीत करता येईल आणि राज्यापुढे वेगवेगळ्या सिंचन प्रकल्पाच्या अवती भवती एकेकाळी संपादित केलेल्या पण सद्यस्थितीत आधिकच्या म्हणून विना वापर पडलेल्या जमीनीचा उपयोग कसा करता येऊ शकेल याचे उदाहरणपण घालून देता येईल. यात शासनाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही आणि उत्पन्न मात्र दरवर्षी मिळत राहील. यासाठी शासनाने शेती या क्षेत्रात अग्रगण्यता प्रस्थापित केलेल्या जैन इरिगेशन सारख्या संस्थेशी किमान बाराएक वर्षाचा करार करावयास पाहिजे. मेरीच्या परिसराचे ओसाड स्वरूप बदलून जाईल. यादृष्टीने सविस्तर चर्चा करुन जबाबदारी दिल्यास ती पेलण्याची जैन इरिगेशनकडून म्हणजेच भाऊंकडून संमती घेऊन मी नाशिकला परत आलो. प्रस्ताव तयार केला आणि त्यानंतरच्या खात्याचे मंत्री आणि सचिव यांच्या मेरी संस्थेला दिलेल्या भेटीत तो मांडण्यात आला. दुर्दैवाने अनुकुलता मिळाली नाही. वाईट वाटले, पण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असेच म्हणून शांत बसावे लागते. जैन इरिगेशनने या जमीनीचे सोने केले असते.

वाल्मी औरंगाबाद याठिकाणीपण अशाच प्रकारे मोठे क्षेत्र उघडे आणि विनावापर पडलेले आहे. शासकीय व्यवस्था शेतीची मशागत करुन त्यापासून उत्पादन घेऊन त्यातून संपत्ती आणि रोजगार निर्माण करण्यात पूर्णत: अयशस्वी ठरलेल्या आहेत. महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठांकडे जवळ जवळ वीस हजार हे पर्यंतची सिंचनाखालील सुपीक जमीन अशाच प्रकारे अपुऱ्या वापरात पडून असलेली बातमी वर्तमानपत्रातून परवाच वाचण्यात आली. यापैकी जवळपास तीस टक्के क्षेत्र पडीक आणि ओसाड झाले आहे असाही उल्लेख बातमीत केलेला होता. १९९९ च्या चितळे आयोगाने उपजाऊ जमीनी विनावापर ठेवणे हा सामाजिक गुन्हा आहे असे भाष्य केलेले आहे. पण याची कोणालाही कदर वाटत नाही.

निवृत्ती नंतर जमा झालेली काही पुस्तके, महत्त्वाची संदर्भ असलेली कागदपत्रे इ. ची आवरा आवर करण्यामध्ये नाशिक येथेच दोन चार दिवसाचा काळ गेला. नाशिक येथील के.के. वाघ या शिक्षण संस्थेशी आणि त्या संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब वाघ यांच्याशीपण बराचसा स्नेह जुळलेला होता. श्री. बाळासाहेब वाघ यांचीपण ओळख महाराष्ट्र जल व सिंचन आयोगानेच करुन दिलेली होती. शिक्षणामध्ये गुणवत्तेला महत्त्व देणारी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी झटणारी म्हणून या संस्थेचा देशामध्ये लौकिक आहे. या संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने वाढवित राहाण्यासाठी संस्थेकडून एका त्रयस्थ सल्लागार समितीची निर्मिती करण्यात आली. या समितीचे पहिले अध्यक्ष डॉ. माधवरावजी चितळे होते आणि सध्याचे अध्यक्ष श्री. विवेक सावंत आहेत. या समितीवर मी सदस्य म्हणून सुरुवातीपासूनच सहभाग द्यावा अशी या संस्थेची इच्छा होती आणि या निमित्ताने या संस्थेशी मी जुडला गेलो. जुलै २००५ मध्ये मिठी नदीने मुंबईतील जीवन विस्कळीत करुन टाकले होते. चंद्रशेखर नावाचे एक धाडसी सनदी अधिकारी मुंबई मेट्रो पॉलीटन रिजनल डेव्हलपमेंट ॲथॉरिटीचे प्रमुख होते. सामानाची बांधाबांध करत असतानाच अचानकपणे मुंबईहून त्यांचा फोन आला.



सौर कृषी पंपाची सर्वप्रथम चाचणी श्री. भवरलाल जैन यांच्या उपस्थितीत घेण्यात आली त्यावेळी शेजारी श्री. अशोक जैन, श्री.अजित जैन, अतुल जैन व इतर सहकारी



जैन इरिगेशनने पुढाकार घेऊन गिरणा नदीवर बांधलेला कांताई बंधारा. एचडीपीईचे दरवाजे या बंधाऱ्याला बसविले आहेत हे याचे वैशिष्ट्य आहे.

त्यांची व माझी पूर्वीची ओळख नव्हती. ते आदराने म्हणाले, मोरे साहेब तुम्ही मुंबईला या. तुमची आम्हाला गरज आहे. मिठी नदीच्या पुनर्स्थापनेचे काम तुमच्याकडे सोपवावयाचे आहे. तुमची सगळी सोय याठिकाणी केली जाईल. तुमचा होकार कळवा. मी दोन एक दिवसाचा विचार करण्यासाठी अवधी मागून घेतला. पुन्हा त्यांचा फोन आला. माझे अंतर्मन मुंबईला जाण्यासाठी नकार देत होते. श्री. चंद्रशेखर यांना अतिशय नम्रपणे माझा नकार कळविला. ते निराश झाले असावेत. डॉ. विश्वनाथराव कराड आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या प्रेमामुळे पुण्यातील एमआयटी या संस्थेशी अगोदरपासूनच जोडलेला होतो. नंतरच्या काळात मुठा नदीवर राजबाग, लोणी येथे नौकायनासाठी काँक्रीटचा एक बंधारा बांधण्याच्या कामी सहकार्य देता आले. त्याच काळात भाऊंचा फोन आला.मोरे साहेब आता कोठेही जायचे नाही आणि सरळ माझ्याकडे जळगावला यायचे असे त्यांनी सांगून टाकले. मी सेवानिवृत्त होणार आहे, फिरण्यासाठी गाडी राहाणार नाही आणि माझे वास्तव्य पुण्यामध्ये राहाणार आहे याची कल्पना भाऊंना असल्यामुळे एका चालकासह वाहन पुण्यामध्ये असावयास पाहिजे असा विचार करुन सामान घेऊन मी पुण्याला येण्याअगोदरच त्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. पुण्यात घराजवळ गाडी आलेली आहे असा मला निरोप आला. ही फोर्ड कंपनीची कार चालकासह पुणे येथे माझ्याकडे अडीच, तीन वर्षे होती.

पाणी, सिंचन, शेती हे माझ्या आवडीचे आणि जिव्हाळ्याचे विषय असल्याने जैन इरिगेशन या संस्थेच्या सहवासात राहाण्याची माझीपण मनापासून इच्छा होती. पुण्यामध्ये एखाद्या महिन्याच्या कालावधीनंतर मी जळगावला भाऊंच्या भेटीसाठी गेलो. जैन इरिगेशन जळगाव येथील संस्थेच्या वेगवेगळ्या उपक्रमाची जवळून ओळख करुन घेण्यामध्ये एक दोन महिन्याचा कालावधी असाच निघून गेला. भाऊंची इच्छा मी संस्थेशी पूर्णपणे संलग्न राहावे अशी दिसून आली. गेले तीस चाळीस वर्षे शासकीय सेवेमध्ये बांधून घेतल्यामुळे मोकळपणे राहाण्याचा विचार मनामध्ये प्रबळपणे येत होता. त्या काळात जैन हिल्सवर भाऊंशी वेगवेगळ्या विषयावर चर्चा करण्याचा योग येत असे आणि त्यातून वेगळाच आनंद मिळत असे. नियतीला मात्र वेगळ्याच प्रश्नामध्ये तुम्हाला गुंतवायचे होते आणि याची जाणीव मात्र येत नसते. दुर्दैवाने निवृत्तीनंतर दोन तीन महिन्याचा मोकळा श्वास घेण्याचीपण संधी मला मिळाली नाही आणि एका केविलवाण्या कौटुंबिक प्रश्नामध्ये मी गुंतला गेलो. काही प्रश्न असे असतात की, जितक्या लवकर आणि जलद गतीने तुम्ही त्यातून सुटका करुन घेण्याचा प्रयत्न करत असता, तितक्याच वेगाने तुम्ही त्या प्रश्नामध्ये गुरफटून जात असता. भाऊंना माझी स्थिती माहित होती. त्यांच्या बरोबरच्या चर्चेमुळे अचानकपणे माझ्या जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नावर मात करण्याचे बळपण मिळत गेले. त्यांची वैचारिक साथ ही फार मोलाची ठरली. असेच दिवस जात होते. महिन्यातील काही दिवस माझे वास्तव्य जैन हिल्स येथे भाऊंच्या सहवासात असे.

त्याच काळात गिरणा नदीवर जलसंपदा विभागाच्या सहभागाने एक बंधारा बांधावा आणि त्या बंधाऱ्याच्या पाठीमागे अडवलेल्या पाण्याचा वापर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आणि त्या बरोबरच जैन इरिगेशनच्या कृषी आधारित वेगवेगळ्या उपक्रमासाठी करावा या विचाराला मूर्त स्वरुप देण्याच्या दृष्टीने सुरुवात करण्यात आलेली होती. वाकोद या त्यांच्या जन्मगावा जवळून वाहाणाऱ्या नदीवरपण बंधारे बांधण्याचा विचार पुढे येत होता. या विषयावर खूप चिंतन होत गेले. नद्याची मालकी शासनाकडे असते आणि म्हणून जैन इरिगेशनसारख्या एका खाजगी संस्थेने नदीवर बंधारा बांधून पाणी अडविण्याचा विषय हा शासकीय व्यवस्थेला नेहमीचा वाटत नाही. २० व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटीश कालावधीत जल विद्युत निर्मितीसाठी टाटा या कंपनीस सह्याद्रीच्या कुशीतील कृष्णा खोऱ्यातील जवळ जवळ ४५ टीएमसी पाणी चार ते पाच ठिकाणी पक्की दगडी धरणे बांधून पश्चिमेकडे वळविण्याचा प्रकल्प महाराष्ट्रामध्ये राबविला गेलेला आहे. एका मोठ्या कालावधीच्या करारानुसार पाणी वापरण्याचा हक्क एका



टाटाने बांधलेले मुळशी येथील धरण. पश्चिमेकडे पाणी वळवून त्यातून वीज निर्मिती केली जाते.

खाजगी कंपनीला देण्यात आलेला आहे. एका अर्थाने हे पाण्याचे खाजगीकरणच आहे. देशामध्ये पण हा पहिलाच प्रयोग असावा. इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी हक्क एका खाजगी कंपनीला दिलेला देशातील दुसरा प्रकल्प माझ्या माहितीत तरी आलेला नाही. गिरणेवर जैन इरिगेशनच्या खर्चाने बंधारा बांधून पाणी वापरण्याचा हक्क मिळवण्याचा भाऊंचा विचार २० व्या शतकातील टाटाच्या विचाराशी एक तत्व म्हणून मिळता जुळता होता असे मला वाटून गेले. पुढे चालून भाऊंच्या प्रयत्नातून गिरणा नदीवर हा बंधारा बांधण्यात आला आणि जैन इरिगेशनला पाण्याचा उपयोग करता येऊ लागला. या बंधाऱ्याची निर्मिती हा भाऊंच्या आवडीचा विषय झाला. नदीची मालकी जलसंपदा विभागाकडे असल्यामुळे बंधाऱ्याचे संकल्प चित्र कसे असावे, नदीच्या पात्रात बंधारा नेमका कोठे बांधावा इ. बाबी मध्ये शासकीय व्यवस्थेचेच मत पुढे रेटले जाते. या बंधाऱ्याला कांताई बंधारा म्हणून नाव दिलेले आहे. शाहू महाराजांनी १९१० च्या सुमारास कोल्हापूर जवळ भोगावती नदीवर बांधलेल्या दगडी धरणास स्वतःच्या कन्येच्या नावाने राधानगरी धरण असे नाव दिले तर जलाशयाला लक्ष्मी जलाशय असे नाव दिल्याची आठवण सहजपणे येऊन जाते. जैन इरिगेशन या संस्थेच्या पूर्ण नियंत्रणाखाली या बंधाऱ्याची उभारणी झाल्यामुळे काँक्रीटमध्ये बांधलेल्या या बंधाऱ्याची गुणवत्ता अति उत्तम आहे आणि दुसरी विशेष बाब म्हणजे या बंधाऱ्याला लोखंडी ऐवजी प्लॅस्टीकचे (एचडीपीइ) दरवाजे बसविलेले आहेत. असे दरवाजे बसविलेला हा देशामधील पहिलाच बंधारा असावा. २००२ या वर्षात कोल्हापूर सिंचन विभागाला कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या दरवाजाची दुरुस्ती प्लॅस्टीक मटेरियलमध्ये नवीन दरवाजे बनवून तयार करण्यासंबधी अभ्यास हाती घेण्याच्या सूचना मंत्रालय स्तरावरून मी दिलेल्या होत्या. दरवाजे चोरीला जाणार नाहीत, नादुरुस्त होण्याचे प्रमाण कमी होईल आणि वजनाला हलकेपण राहातील असा विचार पुढे आलेला होता. काळाच्या पुढे जाऊन नवीन प्रयोग हाताळण्यात भाऊ सतत अग्रभागी राहिलेले आहेत. गुणवत्तेशी तर त्यांनी कधीही तडजोड केलेली नाही. जे जे निर्माण केले जाईल ते उत्तमच असेल यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यांनी निर्माण केलेल्या अनेक वास्तुतून पदोपदी याची प्रचिती येते. जैन ठिबक, तुषार संच इ. ची गुणवत्ता जागतिक स्तरावर वादातीत राहिलेली आहे. राज्यातील हजारो कोल्हापूर बंधाऱ्याच्या परिचालनामध्ये लोखंडी दरवाजे हाताळणे हे अडचणीचे झालेले आहे. जैन इरिगेशनने गिरणेवरील बंधाऱ्यासाठी तयार केलेल्या दरवाज्यातून राज्याला यावर सोपे उत्तर मिळावे असे वाटून जाते.



ओसाड, पडीक आणि डोंगराळ जमीनीचे । खूपसे श्रम ओतून त्याचे उपजाऊ जमीनीमध्ये रुपांतरण करणे हा भाऊंचा एक आवडीचा विषय होता असे म्हणले तर अतिशयोक्ति वाटू नये. सखल भागातल्या जमीनीचे त्यांना आकर्षण नव्हते. जैन हिल्सला लागून आणखी एका पडीक डोंगरावर हिरवाई निर्माण करण्याचा प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे मला समजले. दोन एक वर्षापूर्वी तो डोंगर पाहात एक पूर्ण दिवस भाऊंबरोबर घालविला होता. त्या डोंगरावरच पडलेला पाऊस पायथ्याशी तलावामध्ये साठवून त्यातूनच त्या दुर्लक्षित जमीनीचा उत्पादक जमीनीत रुपांतरण करण्याबद्दलचा भाऊंच्या दूरदृष्टीला आणि आत्मविश्वासाला तोड नाही असेच म्हणावे लागेल. डिझेल पंपाची जागा सोलर पंपाने घेतल्यामुळे पाहिजे त्याठिकाणी पंप आणि मोबाईल सोलर पॅनेल बसवून पाणी उचलण्याचा एक सोपा पर्याय भाऊंच्या हातात आलेला होता. सोलर पंपाच्या निर्मितीचा पाया रचणारीपण जैन इरिगेशन ही देशातील पहिलीच संस्था

असावी असे म्हणले तर चूक ठरु नये.

कौटुंबिक प्रश्नाच्या दाहकतेमुळे जैन हिल्स या परिसरात भाऊंच्या सहवासात मला रमता आले नाही. त्या काळात चौगुले नावाचा एक तरुण भाऊंचा सचिव म्हणून काम करत होता. भाऊंचे कार्यालय जैन हिल्सवरील पाच नंबरचा बंगला हे होते. एके दिवशी चौगुले यांनी काही कागद माझ्यासमोर ठेवले. प्रिन्सिपल इरिगेशन ॲडव्हायझर टू जैन इरिगेशन म्हणून मी त्या संस्थेशी औपचारिकदृष्ट्या जोडला जावे अशी भाऊंची इच्छा होती आणि त्याला अनुसरुन चौगुले यांनी तशा कार्यालयीन प्रस्तावाला मी स्वीकृती द्यावी आणि तत्पूर्वी त्याप्रित्यर्थ घ्यावयाच्या मोबदल्याचा आकडापण मीच लिहावा असे मला सांगण्यात आले. एक वर्षभराचा कालावधी गेला असावा. जैन इरिगेशन या संस्थेत माझे स्थान स्थिर करावे असा भाऊंनी विचार केला असावा. पाहू नंतर असे म्हणून मी तो कागद परत केला. तो विषय त्याच ठिकाणी संपला. काहीही न करता भाऊंनी दाखविलेल्या औदार्यामुळे मला भरभरुन मिळालेले होते. मला मिळालेल्या आनंदाची किंमत कशी होणार? पुढे अनेक ठिकाणी जैन इरिगेशनशी तुमचे काय नाते आहे असे जेव्हा विचारले जात होते तेव्हा मात्र मी नि:संकोचपणे व अभिमानाने भाऊंनी देऊ केलेल्या उपाधीचा उल्लेख करुन समोरच्यावर प्रभाव टाकण्याचा मोह टाळलेला नाही. यात माझी फुशारकी दिसून येत असे पण मनुष्य स्वभावाला औषध नसावे. आपण यास पात्र आहेत का अशाही विचाराचे काहूर मनामध्ये अनेकवेळा घुटमळते. सार्वजनिक उपसा सिंचन योजनेत पाणी किती उंच उचलावे यावर पाण्याचे अर्थशास्त्र मर्यादा घालते या विषयावरपण चर्चा होत असे. विज्ञान व अर्थशास्त्र यांना नजरेआड करु नये यावर एकमत होत असे. अलीकडे त्यांचा प्रवास कमी झालेला होता. काही ठिकाणी सिंचनातील वेगळा विचार मांडण्यासाठी आवर्जून जात असत. कोकण कृषी विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ही मानद पदवी दिली. मुंबईमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने त्यांचा जाहीर सत्कार केला. अशा मंचावर नेमके काय बोलावे याबद्दलच्या मुद्द्यासंबंधी ते मोकळेपणाने चर्चा करत असत. माझ्यापेक्षा समोरच्याला काय जास्त समजते, असा अहंकार त्यांच्याकडे नव्हता.

माझेही जळगावला जाणे कमी कमी होत गेले. पण भाऊंबरोबरचा प्रेमाचा धागा जास्तच बळकट होत गेला. एकदा सहज बोलत असताना मी म्हणून गेलो, केवळ चांगुलपणा माणसाची समोर आलेल्या प्रश्नातून सुटका करत नाही. व्यवहारामध्ये माणसाकडे थोडी गुंडगिरी असावी लागते. ती जर असेल तर कदाचित माझ्यावर हा प्रसंग ओढवला नसता. असे मी उद्वेगाने बोलून गेलो. भाऊ थोडावेळ शांत बसले आणि म्हणाले, मोरे साहेब, तुमच्या बोलण्यामध्ये तथ्य आहे असे वाटते. जैन इरिगेशन सारख्या जागतिक स्तरावर लौकिक मिळविलेल्या संस्थेचा भार सांभाळत असतानासुद्धा माझ्यासारख्या माणसाच्या सुख दु:खात एकरूप



जैन इरिगेशनने विकसीत केलेले कांदा बी पेरणी यंत्र पाहताना भवरलाल जैन शेजारी डॉ. अनिल ढाके, श्री. एस.व्ही. पाटील, श्री. सुनिल देशपांडे, डॉ. डी.एन. कुलकर्णी, श्री. देवदत्त गोखले, श्री. राजेंद्र महाजन व इतर सहकारी

होऊन विचार विनिमय करण्यामध्ये त्यांना कधीही वेळेचा अपव्यय झाला असे वाटत नव्हते. समोरच्या माणसाच्या ह्दयात घर करुन कायमचे आपुलकीचे स्थान मिळविण्याची त्यांची विचारधारा ही फारच भावणारी होती. म्हणूनच माणूस म्हणून मला ते फार मोठे वाटायचे. त्यांना अनेक उपाध्या लावता येतील. ठिबकचे प्रणेते, सिंचन क्रांतीचे प्रणेते, करार शेतीचे प्रणेते, सौर ऊर्जेचे प्रणेते, शेतकऱ्यांचे पाठीराखे, ग्रामीण भागाला बळ देणारे इ.अशा अनेक उपाध्या त्यांच्या बद्दलचे वर्णन करण्यात कमीच पडतील असे मला वाटून जाते. मोठ्यातल्या मोठ्या व्यक्तिबरोबर मग ती व्यक्ती राष्ट्रपती पदावर विराजमान झालेली असेल, शास्त्रज्ञ असेल, सामाजिक कार्यकर्ता असेल, देशाचे मंत्रीपद भुषविलेली असेल, न्यायधीश असेल, नामवंत उद्योगपती असेल, या सर्वांशी ज्या जवळीकेने ते वागत होते त्याच्या पेक्षा जास्त आपुलकीने सामान्य माणसाच्या सुख दु:खात पण जिव्हाळा दाखवत असत. त्यांच्या सान्निध्यात आलेली माणसे सुखाने, समाधानाने आणि आनंदाने जीवन व्यतीत करावीत असेच त्यांना वाटत असावे. याच त्यांच्या स्वभावामुळे औरंगाबादला आयोगाच्या सर्व सदस्यांबरोबर घरी जेवणासाठी आले. मुलीच्या लग्नात ते येऊ शकले नाहीत पण दुसऱ्याच दिवशी खास आले, जेवण केले, कौटुंबिक सर्व चौकशी केली आणि जवळकीचा धागा जोडून गेले.

एकदा असेच दुपारी चारच्या वेळी त्यांच्या कार्यालयात मी गेलो. ते खुर्चीवर बसले होते आणि त्यांच्या समोर खेड्यातील तीस चाळीस माणसे मुलाबाळांसह बसलेली होती. त्या सर्वांशी ते अतिशय आपुलकीने गप्पा मारत होते. मला म्हणाले, तुम्ही पण बाजूला बसा. ही मंडळी गेल्यानंतर आपण बोलू. मी त्यांचे बोलणे ऐकत राहिलो. थोड्या वेळाने ती सगळी मंडळी आदराने लवून भाऊंना नमस्कार करुन एका पाठोपाठ एक निघून गेली. मी भाऊंना विचारले, हा काय प्रकार आहे? ही मंडळी कोण होती? कंपनीमध्ये काम करणारे वाटत नाहीत. भाऊ म्हणाले, कंपनीमध्ये काम करणारी ही मंडळी नाहीत पण कंपनीमध्ये काम करणाऱ्या मंडळींचे हे आई, वडील, पती, पत्नी या अर्थाने जवळचे नातलग आहेत. जवळच्या अनेक खेड्यापाड्यातून जैन इरिगेशन या उद्योग समुहामध्ये हजारोने अधिकारी आणि कर्मचारी गेल्या २०-२५ वर्षापासून काम करतात. कुटुंबातील एकटाच माणूस दररोज घराबाहेर पडून कामावर येतो आणि संध्याकाळी परत जातो. कुटुंबामध्ये तो सांगत असावा, माझी कंपनी ठिबकचे साहित्य निर्माण करते, पाईप व शीटस् निर्माण करते, आंब्याचा पल्प निर्माण करते इ. माझ्या कंपनीचे संचालक, व्यवस्थापक ही मंडळी फार चांगली आहेत वा कोणी म्हणत असेल बरी आहेत वगैरे वगैरे. कुटुंबातील माणसांची, नातेवाईक म्हणून कधीही त्यांचा मुलगा वा पती वा पत्नी ज्या कंपनीत काम करतात त्या कंपनीशी कसलीही ओळख नसते. हा दुरावा तोडण्याचा मी माझ्यापरीने प्रयत्न करतो आणि म्हणून दरवर्षी जैन उद्योग समुहामध्ये काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना बस पाठवून घेऊन येऊन सकाळच्या वेळी कंपनीचा परिसर आणि कंपनीचे सर्व उपक्रम दाखविण्याची व्यवस्था करतो. दिवसभर त्यांच्या भोजनाची, चहापाण्याची व्यवस्था कंपनी मार्फत केली जाते. संध्याकाळी परत जाण्यापूर्वी सर्व नातेवाईक मंडळी मला भेटून जातात आणि दिवसभरामध्ये त्यांनी काय पाहिले, त्यांना काय आवडले आणि त्यांचे कंपनीविषयी काय मत बनले या विषयी माझ्याबरोबर मोकळेपणाने संवाद करतात. अशा भेटीतून या नातेवाईक मंडळींना लक्षात येते वा खात्री पटते की, त्यांचा मुलगा वा पत्नी जो कोणी असेल तो एका चांगल्या विचाराने आणि चांगले काम करणाऱ्या कंपनीत नोकरी करत आहे. कोठेतरी चुकीच्या व्यवसायात तो सहभागी झालेला नाही याची खात्री याची देही याची डोळा त्यांना व्हावी म्हणून हा सगळा उपक्रम राबविला जातो. या निमित्ताने कंपनीचे नाते केवळ अधिकारी वा कर्मचाऱ्याशी न जुडता त्यांच्या नातेवाईकांबरोबरपण जुळते आणि काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना घरातून चांगली प्रेरणा मिळते, आधार मिळतो आणि त्यातून कंपनीची कार्यक्षमता वाढते. मी ऐकतच राहिलो. किती मोठा हा विचार! असे कोठे इतरत्र घडत असावे का असा प्रश्न मी मलाच विचारला. मनामध्ये म्हणालो, वंदावी तुमची पाऊले. भवरलालजी या व्यक्तीचे अंतरंग किती व्यापक आणि उच्च विचाराने भरलेले होते याचे हे प्रतिक होते असे म्हणण्यास काही हरकत नाही.

जैन इरिगेशन उद्योग समुहाची उलाढाल सहा हजार कोटी रुपयाच्या पुढे गेलेली असावी. जगभरात त्यांच्या दोन डझनापेक्षा



जास्त शाखा असाव्यात. कंपनी तयार करत असलेल्या मालाचे विक्री प्रतिनिधी जवळ जवळ पाच ते सहा हजाराच्या पुढे असावेत. अप्रत्यक्षपणे कंपनीच्या उपक्रमाशी जोडले गेलेल्यांची संख्या लाखामध्ये जाईल. कंपनीला त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल, गुणवत्तेबद्दल, कंपनीने जपणूक केल्या गेलेल्या सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय मूल्याबद्दल अनेक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पारितोषके मिळालेली आहेत. भारत सरकारने पद्मश्री पदवी देऊन गौरविलेले आहे. वास्तविक जीवनात त्यांचे कार्य या पदवीपेक्षा खूपच मोठे आहे. कंपनीचे मुख्यालय जळगाव जिल्ह्यातील शिरसोली नावाच्या एका खेडेगावात आहे. कंपनीची शाखा कार्यालये मात्र युरोपमध्ये, अमेरिकेमध्ये, इस्राईलमध्ये, जगातल्या आणि भारतातल्या वेगवेगळ्या मोठ्या शहरात आहेत. या भल्या माणसाने उद्योग म्हणजे संपत्ती आणि रोजगार निर्माण करण्याऱ्या विकासाच्या साधनाची ज्या भागात, म्हणजेच राज्याचा ग्रामीण भाग, त्याची गरज आहे त्या ठिकाणी त्याची स्थापना त्यांनी ठरवून आणि आवर्जून केली. भाऊंना त्यांचा हा व्यवसाय त्यांच्या कर्तबगारीकडे पाहाता मुंबई, पुणे किंवा देशाबाहेरपण घेऊन जाणे काही अवघड नव्हते. पण त्यांनी तसे केले नाही आणि ते करणारही नव्हते. खऱ्या अर्थाने विकासाच्या तत्वाशी ते बांधलेले होते. ते तत्व म्हणजे, खेड्याकडे चला. हे होते. याचा अर्थ खेड्याचा विकास करा असा होतो. भाऊंनी ग्रामीण भागातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील आणि दुष्काळाच्या वारंवारतेमध्ये सापडलेल्या प्रदेशातील हजारोच्या संख्येतील रिकाम्या हाताला त्यांच्या गावाजवळच काम दिले, रोजगार दिला. जैन उद्योग समुहामध्ये बहुतांशी कर्मचारी आसपासच्या खेड्यातून कामावर येतो आणि संध्याकाळी आपल्या घरी कुटुंबात जातो. घर, शेती, पशुधन हे स्थिर ठेवतो. नोकरीमुळे त्यांचे स्थलांतरण होत नाही आणि असे सार्वत्रिकपणे झाले तर गावे ओस पडणार नाहीत व शहरे बकाल होणार नाहीत. पण आज नेमके उलट घडत आहे. जैन उद्योग समुहात टिश्यू कल्चर नर्सरीमध्ये दररोज शेकडो, हजारो खेड्यातील महिला आपले संसार सांभाळून कमाई करतात. हे पुण्याचे काम आहे.

जैन इरिगेशनसारखी काही अपवादातमक उदाहरणे वगळली तर या देशामध्ये घडलेला औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास हा दिल्ली, बंगलोर, पुण्या मुंबईसारख्या मोठ्या शहरातच स्थिरावत आहे. निसर्गाची अवकृपा झालेल्या काळात ग्रामीण भागात निवास करणाऱ्या ५० ते ६० टक्के लोकसंख्येला शेती व्यतिरिक्त जगणे



हाच तो सौर ऊर्जा निर्माण करणारा जळगावातील जैन हिल्सचा परिसर



महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा व वसा जपणारे जैन हिल्सवरील देखणे गांधीतीर्थ

सुकर करण्यासाठी वेगळे साधन उपलब्ध होत नाही. रोजगार हमी योजना हे याला कायमचे उत्तर नाही. ही बाब गेल्या चाळीस वर्षाच्या अनुभवानंतरही आपल्याला समजली नाही. महाराष्ट्रातील मध्य महाराष्ट्राच्या दुष्काळ प्रवण क्षेत्राची २०१५-१६ या टंचाईग्रस्त वर्षाची स्थिती हे विकासाच्या नियोजनातील मोठ्या उणीवाचे प्रतिक आहे असे म्हणले तर वावगे ठरू नये, वा टिकाही वाटू नये. जैन उद्योग समुहाने देशाला विकासाची खरी दिशा दाखविलेली आहे. पण त्याकडे पाहून बदल घडवून आणण्याचे धारिष्ट्य कोणत्याही राजकीय पक्षाचे शासन दाखवत नाही ही शोकांतिका आहे. या प्रसंगाने म. गांधी, सर विश्वेश्वरय्या या सारख्या महान आणि द्रष्ट्या लोकांचे विचार आठवणीत येतात. म. गांधींनी आयुष्यभर खेड्याकडे चला अशी हाक दिली. २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातच स्वतंत्र भारताची स्वप्ने पाहाणाऱ्या या विशाल देशाला सर विश्वेश्वरय्या या द्रष्ट्या अभियंत्याने खेड्यामध्ये उद्योगाचे जाळे पसरवा आणि शेतीला पर्यायी रोजगाराच्या साधनेची साथ द्या असे निक्षून सांगितले होते. ते म्हणत असत, खेड्यामध्ये औद्योगिकरणाची कास धरा अन्यथा ग्रामीण समाजाला दारिद्र्याशी संग करावा लागेल. इंडस्ट्रीलाईज ऑर पेरिश हे त्यांचे घोषवाक्य होते. पण याकडे काही अपवादात्मक उदाहरणे वगळता सगळयांनीच दुर्लक्ष केले आणि त्याचे परिणाम राज्याच्या गरीब जनतेला भोगण्यास भाग पाडले असे कठोर विश्लेषण करणे भाग पडते.

दोन एक वर्षापूर्वी जैन हिल्स जळगाव या ठिकाणी सकाळ वृत्तपत्र समुहातर्फे सरपंच महा परिषदेचे आयोजन करण्यातआले होते. योगायोगाने हजार एक सरपंचांना उद्बोधित करण्यासाठी आयोजकांकडून मलाही आमंत्रित करण्यात आले होते. भाऊचा सहवास लाभण्याची संधी मला मिळत होती. एका सत्रामध्ये राज्यातील उद्योगपतीबरोबर मुलाखतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इतरांबरोबर भाऊपण एक उद्योगपती म्हणून श्रोत्यांच्या प्रश्नाला उत्तरे देण्यासाठी बसलेले होते. श्रोत्यांमधून भाऊंबरोबर बसलेल्या एका उद्योगपतीला एकाने प्रश्न केला, तुमच्या उद्योगाची शाखा महाराष्ट्रा बाहेर इंदोर याठिकाणी का काढत आहात? त्यांचे उत्तर वरकरणी निरुत्तर करणारे होते. ते म्हणाले, तुम्ही साखर कारखाना मुंबईमध्ये काढाल का? प्रश्न विचारणारा बापडा गप्प बसला. हे जर बरोबर असेल तर, राज्यातील सगळीच आटोमोबाईल इंडस्ट्री पुणे शहराभोवतीच कशाला याचे समर्पक उत्तर सामाजिक भान ठेवत ते उद्योगपती देऊ शकले असते का हा महत्त्वाचा प्रश्न होता. आटोमोबाईल कंपनीला पाणी कमी लागते पण या उद्योगाची रोजगार निर्मितीची क्षमता जास्त असावी. मग असे उद्योग महाराष्ट्राच्या अवर्षणप्रवण ग्रामीण भागात, बीड, उस्मानाबाद, लातूरसारख्या जिल्ह्यात का काढले गेले नाहीत? यामुळे आसपासच्या खेड्यातील हजारो लोकांना स्थानिक स्तरावर रोजगार मिळाला असता आणि त्यांचे शहराकडे स्थलांतरण झाले नसते. त्याच वेळेस श्रोत्यातील एकाने भवरलालजींना प्रश्न केला. भाऊ तुम्ही जळगावच्या परिसरात साखर कारखाना का उभारत नाही? साखर कारखाना फायद्यात राहील. भाऊंनी सडेतोड उत्तर दिले. निसर्गत: पाण्याची चणचण असणाऱ्या प्रदेशामध्ये साखर कारखाना निर्माण करुन शेतकऱ्यांना उसासारखे पाणी जास्त पिणारे पीक घेण्यासाठी मी प्रोत्साहित करणार नाही. ऊस ठिबक खाली घेतला तरी उसाला इतर पिकाच्या तुलनेत पाणी जास्त लागते. आणि तितके पाणी अवर्षण प्रवण क्षेत्रात उपलब्ध नाही. पाण्याच्या असमतोल वापरामुळे समाजामध्ये आर्थिक विषमता निर्माण होते. तसे मला होऊ द्यावयाचे नाही आणि म्हणून जळगाव परिसरात साखर कारखाना काढण्यास मी कधीही अनुकुलता दर्शविणार नाही. सामान्य उद्योगपती आणि द्रष्टा उद्योगपती यामधील फरक या दोन उत्तरातून स्पष्ट झाला होता. भाऊ नेहमीच विनोदाने म्हणत असत की, जैन उद्योग समुहाचे मुख्यालय शिरसोलीला तर शाखा कार्यालय न्यूयॉर्कला असेल.

उद्योगातून संपत्ती आणि रोजगार निर्माण करत असताना

आणि त्यातून विकासाचे चित्र साकारत असताना अनेक बाबींची काळजी घेणे गरजेचे असते. विकासाच्या मूलभूत व्याख्येशी प्रामाणिक राहाण्याची आवश्यकता असते. विकास हा सर्वसमावेशक म्हणजेच गरीब, श्रीमंत इ. सर्वांना सामावून घेणारा असावयास हवा. विकासातून सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळाला पाहिजे. विकासातून संपत्तीचे समन्यायीपणे वितरण व्हावयास हवे. विकासामध्ये नैसर्गिक साधनसामग्रीचा इष्टतम (optimum) वापर होणे गरजेचे असते. विकास हा विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित असणे आणि त्यातून पर्यावरणाची जपणूक होणे हे देखील तितकेच गरजेचे असते. त्यातूनच तो शाश्वत राहातो. विकासाचा शेवट हा समाज जीवनामध्ये उन्नती, परिवर्तन घडवून आणणारा असणे अपेक्षित असते. विकासाला असे अनेक पापुद्रे आहेत आणि या सर्वांचे पालन करणे महत्त्वाचे ठरते. अन्यथा तो विकास लंगडा व अधुरा ठरतो. गेल्या साठ सत्तर वर्षात उसतोडी कामगारांच्या जीवनात त्यांचे पोट भरण्या व्यतिरिक्त दुसरा कोणता बदल घडवून आणण्यात आला आहे? साखर कारखान्याच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती केली गेली पण सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित केला गेला नाही. उद्योग व सेवाक्षेत्राच्या केंद्रीकरणामुळे गरीब ग्रामीण जनतेला शहरामध्ये फूटपाथवर व झोपडपट्टीमध्ये किड्या, मुंग्यासारखे आयुष्य घालवावे लागते. ही सामाजिक न्यायाची पायमल्ली आहे.

जैन उद्योग समुहामध्ये गेल्या अनेक वर्षापासून हजारो कुशल वा अकुशल कर्मचारी काम करतात पण आतापावेतो संप झालेला नाही. कोणीही धरणे धरलेले नाही. मजुराची संघटना नाही. याचाच अर्थ असा होतो की, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या न्याय्य मागण्या व्यवस्थापनेकडून मागणीपूर्वीच पूर्ण होतात. माझ्या असेही ऐकण्यात आले आहे की, कर्मचाऱ्यांना दररोज चहा ऐवजी केळी व दूध दिले जाते. चांगले शाकाहारी भोजन सवलतीच्या दरात दिले जाते. जैन इरिगेशनच्या अनेक केंद्रावर कंपनीशी संबंधित सर्वांचीच निवासाची आणि भोजनाची उत्तम सोय केलेली असते.शाकाहारी वातावरण सर्वत्र ठरवून जपले जाते. कोठेही धुम्रपान वा अपेय पानास वाव नाही. अनेक परदेशी पाहुणे आपसुकच या अलिखित नियमाचे आनंदाने पालन करतात असा अनुभव मला स्वत:ला आलेला आहे. जैन इरिगेशनच्या हजारो एकराच्या परिसरात कोठेही कचरा साचलेला दिसत नाही. उद्योग आणि निवासी क्षेत्रातून बाहेर पडणारे सांडपाणी आणि घन कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया केली जाऊन त्याचे उपयोगी वस्तूत रुपांतरण केले जाते. जैन उद्योग समुह शून्य विसर्गाचे पालन करतो. जैन हिल्सच्या परिसरातील फळबागामध्ये कोणत्याही प्राण्याला मुक्तपणे वावर करण्यास प्रतिबंध नाही. दरवर्षी माकडांच्या टोळीने आंब्याच्या बागेच्या केलेल्या नुकसानीचा कोणीही अंदाज घेत नाही. अनाथ गायींचे संगोपन केले जाते. त्यांच्या शेणाचा सेंद्रीय खत, जैव वायु इ. साठी उपयोग केला जातो. मध्यंतरीच्या काळात भाऊंना वनस्पतीवरील रोगाचा प्रादुर्भाव कमी करणाऱ्या किटक आणि जंतू नाशकाचा उद्योग चालू करण्याबाबत सूचना करण्यात आलेली होती. हे पाप कर्म मी करणार नाही असे स्पष्टपणे सांगून भाऊंनी त्या सूचनेला नकार दिलेला होता. ही वस्तुस्थिती अनेकांना माहित नसावी.

चांगले नागरिक निर्माण करण्यासाठी बाल वयातच मुलाच्या मनावर संस्कार घडविणारी एक उत्तम शाळा चालवावी याबाबत भाऊ अनेक वर्षे चिंतन करत होते. गेल्या पाच सहा वर्षापासून जैन हिल्सच्या समोरच्या टेकडीवर अनुभूती या नावाने शाळा चालविली जात आहे. या मुलांसाठी तयार केलेले सर्व भोजन सौर ऊर्जेवर तयार केले जाते हे आणखी एक वैशिष्ट्य आहे. चांगले शिक्षक हा शाळेचा कणा असतो. गुणवान, हुशार आणि निर्व्यसनी शिक्षक मिळणे ही दुर्मिळ बाब झालेली आहे. मूलत:च शिक्षक हा शाकाहारी असावा असे त्यांना आवर्जून वाटत असे. देशातील वेगवेगळ्या भागातून अनेक शिक्षकांना ते बोलावून घेत असत. काही दिवस जैन हिल्सवर मुक्कामी ठेवून घेऊन स्वत:च्या गाळणीतून त्याची तपासणी करत असत. भाऊंना भडक रंग आवडत नसे. कंपनीशी जुळलेले सर्वजण पांढऱ्या वा फिक्या रंगाचे स्वच्छ कपडे परिधान करतात व तसेच लोक त्यांना आवडत असत. ते एकदा सहज म्हणाले, जैन उद्योग समुहामध्ये काम करणाऱ्या लोकांसाठी गणवेश नसेल पण त्यांच्यासाठी ड्रेसकोड आहे आणि नकळतपणे त्याचे पालन करुन घेतले जाते. एकेदिवशी दुपारच्या वेळी कार्यालयातून घरी म्हणजे बंगला नं. १ मध्ये मला बोलावले. नवीन येणाऱ्या काही शिक्षकाबरोबर ते संवाद साधत होते. परत जावयास निघालो.



जळगाव स्थित कांदा व भाजीपाला निर्जलीकरण उत्पादन केंद्र

भाऊंनी मला पायामध्ये सँडल घालत असताना थांबविले. दुरूनच सँडल कशी आहे हे निरखत होते. ठीक आहे मला थोडी शंका आलेली होती. असे म्हणून तो विषय त्याठिकाणीच संपविला. मला मात्र त्या प्रसंगातून त्यांना काय ध्वनीत करावयाचे होते हे समजले नाही. पण एक मात्र निश्चित समजले की, अवती भवतीच्या व्यक्तींवर त्यांची फार बारीक नजर असते.

भाऊंनी जैन हिल्स, जैन इरिगेशन वा इतरत्र कोणत्याही परिसरात मंदिराची उभारणी केलेली नाही. यामुळे पूजा अर्चेचा भागच शिल्लक राहिलेला नाही असेच मला वाटून गेले. म. गांधीच्या जीवनावर त्यांचे प्रकांड प्रेम होते, आत्मीयता होती. जैन हिल्सवर गांधी तीर्थ नावाने बहुमजली वास्तू निर्माण करण्यात आली आहे. गांधींच्या जीवनातील अनेक दुर्मिळ लेखन, साहित्य इ. चे संकलन करण्यात आलेले आहे. देशातील आणि परदेशातील पर्यटकांना, अभ्यासकांना जळगाव येथील गांधी तीर्थ ही जागा फार महत्त्वाची ठरत आहे. बऱ्याच वेळा जळगाव शहरातील मूळ घरी संध्याकाळच्या जेवणासाठी बरोबर घेऊन जात असत. भाऊंचा मुक्काम जैन हिल्सवर असे पण संध्याकाळचे भोजन शहरातील घरात नातवंडांसह घेत असत. अनेक वेळा मी पाहिले की, मोठ्या ताटामध्ये जेवणाचे सर्व पदार्थ एकत्र केलेले असत आणि सर्व नातवंडांना अवती भवती घेऊन एकाच ताटात सर्वजण जेवत असत. यातून नातवंडांशी म्हणजेच पुढच्या पिढीशी ते किती घट्टपणे जोडून घेतलेले होते हे यातून दिसून येत असे. ते कुटुंबवत्सल होते. दररोज सकाळी न चुकता नातवंडांना आणि जवळच्या इतरांना घेऊन सकाळच्या शुद्ध हवेत खूप चालत असत. त्यांच्या बरोबर खूप दूरपर्यंत चालण्याचे धाडस करणे कठीण वाटायचे. घरी टेबलावर जेवायला बसल्यानंतर त्यांच्या सुना स्वत: जेवण वाढतात. आपल्याला सहज वाटून जाते की आजुबाजुला इतके नोकरचाकर असताना असे का? या सगळ्या कृतीतून भाऊंच्या वागण्यातील वेगळेपण जाणवत राहाते त्यांचे कुटुंब हे एक गोकुळ आहे. त्यांची चारही मुले, स्नुषा आणि सर्व नातवंडे त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्वांना त्यांच्या प्रेमळ आणि आपुलकीच्या वागणुकीने शीतलता देतात. मध्यंतरी मी एक लेख वाचला होता. हवेलीचे आयुष्य असे त्या लेखाचे शीर्षक होते. हवेलीचे आयुष्य पिढ्यांमध्ये मोजले जाते. भाऊच्या कुटुंबाकडे पाहिल्यानंतर त्यांच्या हवेलीच्या आयुष्याला शेवट हा नसणारच. माणूस म्हणून भाऊंच्या गुणवैशिष्ट्याचे वर्णन करण्यास लेखणी अपुरी पडते. त्यांच्या पुढच्या पिढ्या त्यांच्या सत्कर्माने भाऊंच्याच पाऊल वाटेवरुन मार्गक्रमण करणार आहेत. गेल्या २० वर्षापासून शेतकऱ्यामध्ये पाणी वापराची जाणीव करुन देण्यासाठी महाराष्ट्र सिंचन सहयोग ही सेवाभावी संस्था राज्याच्या वेगवेगळ्या भागात सिंचन परिषदा भरवते. या कार्याबद्दलची आपुलकी म्हणून दरवर्षी जैन इरिगेशन संस्था परिषदेमध्ये आयोजकाच्या भूमिकेतूनच वावरते. परिषदेचे उद्घाटन नेहमीच्या पारंपरिक पद्धतीऐवजी या संस्थेच्या मदतीने ठिबक, तुषार, सोलर पंप इ. सिंचनाच्या उपकरणाच्या वापरातून केले जाते.

ग्रामीण भागात उद्योगाचे जाळे पसरवून हजारोंच्या संख्येतील, खेड्यातून पोटाची खळगी भरण्यासाठी शहराकडे होणारे स्थलांतरण थांबवून त्यांनी समाजावर फार मोठे उपकार केले आहेत असे म्हणले तर अतिशयोक्ति ठरू नये. एक हंगामी शेतीतून शेतकरी सुखी आणि समृद्ध होऊ शकत नाही हे शेती व्यवसायातील विदारक सत्य आहे. शेती किमान द्विहंगामी करण्यासाठी पाण्याची जोड लागते. अल्पशा पाण्याचा इष्टतम वापर करण्यासाठी आणि त्यातून भरीव उत्पादन घेण्यासाठी त्याला तंत्रज्ञानाची जोड असावी लागते. शेतीतील उत्पादन हे नाशवंत असते. या नाशवंत उत्पादनाचे अधिक मूल्यदायी आणि टिकावू पदार्थात रुपांतरण करण्यासाठी प्रक्रिया उद्योगाची गरज लागते. अन्यथा मिळेल त्या भावाने शेतकऱ्याला आपला माल विकून कंगालपणातच राहावे लागते. भाऊंनी भारतीय शेतकऱ्यांच्या या अडचणी ओळखून शेतीला समर्पक उत्तर देण्याचे काम केलेले आहे. ठिबक, तुषार सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा १९८५-८६ या कालावधीत देशामध्ये पाया रचला. आज एकट्या महाराष्ट्रामध्ये या तंत्रज्ञानाच्या प्रभावाखाली असणारे क्षेत्र वीस



लाख हेक्टरच्या आसपास असावे. देश पातळीवर हा आकडा एक दशलक्ष हे. कडे झेप घेत असावा. उद्योगाचे आणि शेतकऱ्याचे नाते किती महत्त्वाचे असते हे त्यांनी कृतीने दाखवून दिले आहे. शेती उत्पादनाला प्रक्रियेची जोड देऊन शेती मालाची एक मोठी हमखास भाव मिळणारी बाजारपेठ त्यांनी निर्माण केली आहे. २००६-०७ च्या कालखंडात कांद्याचे भाव एक ते दोन रुपये प्रति किलो पर्यंत आलेले होते. त्याच काळात उत्तर महाराष्ट्रातील हजारो शेतकरी कराराच्या शेतीने जैन उद्योग समुहाशी जोडलेले होते आणि त्यांनी लाखो रुपयाचे उत्पन्न मिळविले. उद्योजकता हा एक वेगळा गुण आहे. सर्वच शेतकरी उद्योजक होऊ शकत नाहीत आणि म्हणून शेती व्यवसायाला हमी भाव, हमी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रक्रिया उद्योगाचा शेजार फार महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. भाऊंनी जळगाव परिसरात ग्रामीण शेतकऱ्यांना आधार देणारा बळकट असा शेजार निर्माण केलेला आहे. त्यांच्या उद्योगातून दरवर्षी हजारो आणि लाखो टन कांदा, डाळींब, आंबा, केळी, पेरु इ. अनेक शेती उत्पादनावर प्रक्रिया केली जाते आणि त्या उत्पादनाला देशांतर्गत आणि देशाबाहेर बाजारपेठ मिळवून दिली जाते. असे उद्योग देशाच्या प्रत्येक तालुका स्तरापर्यंत असणे ही काळाची गरज आहे. सिंचनाच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उत्पादन वाढले, पाण्याची, विजेची, खताची, श्रमाची बचत झाली. पण तिथेच थांबून चालणार नाही. त्या उत्पादनाला चांगला भाव मिळून देण्यासाठी प्रक्रिया उद्योगाची जोड देणे गरजेचे आहे. या दोन्ही गोष्टीचा समतोल साधण्याचे उदाहरण भाऊंनी समाजापुढे घालून दिलेले आहे. या बाबीचे महत्त्व जाणूनच माझे लेख आणि माझी व्याख्याने जैन इरिगेशनचा संदर्भ घेतल्याशिवाय पूर्ण होत नाहीत.

सन २०००-२००१ मध्ये 'आजची समाजरचना' अशा शीर्षकाखाली भाऊंनी एक पुस्तक लिहिले. ते नेहमी असे म्हणत असत की, या पुस्तकाची मांडणी करत असताना तुमच्यासारखी माणसे माझ्या मनात घुटमळत होती. माणसाने जन्माला येताना जे जग पाहिलेले होते त्यापेक्षा आधिक सरस ते जग करुन या जगाचा निरोप त्यांनी घ्यावा असे ते म्हणत असत, माणसाच्या जगण्याचे हे उद्दिष्ट असावे असे त्यांना म्हणावेसे वाटत असावे. अलीकडे सौर ऊर्जेवर त्यांनी फार लक्ष केंद्रीत केलेले होते. पर्यावरण जपण्यासाठी पाण्याचे संवर्धन करणे. सांडपाण्यावर आणि घन कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करणे, सौर ऊर्जेचा वापर वाढविणे इ. मूलभूत गोष्टीवर त्यांचा भर राहिलेला होता. हा व्यवहार तोट्याचा होत नाही, फायद्याचा होतो हे त्यांनी जगाला दाखवून दिलेले आहे. कोठेतरी वाचले होते, माणसाला आयुष्य किती असते? सोपे उत्तर म्हणजे जन्मापासून मरेपर्यंत. पण हे अर्धसत्य आहे. सुरुवात जन्मापासून होते पण शेवट त्या माणसाच्या समाजोपयोगी कार्याची आठवण येणाऱ्या किती पिढ्या ठेवणार आहेत तेथपर्यंत ते मोजले जाते. या अर्थाने भाऊंचे आयुष्य किती असावे याची गणती करता येणार नाही. भाऊंना समाजासाठी खूप काही करावयाचे होते. पाणी आणि कृषी या विषयाला वाहिलेले विद्यापीठ, जळगाव येथे अत्याधुनिक सर्व सोयींनी युक्त असे हॉस्पीटल, परिसरातील गावांना स्वस्त व स्वच्छ पाणी पुरवठा, सुक्ष्म सिंचनाच्या प्रसारासाठी राष्ट्रीय स्तरावर दरवर्षी पुरस्कार वितरण इ. काही बाबी लवकरच कार्यान्वीत करण्याची ग्वाही त्यांच्या पुढच्या पिढीकडून देण्यात आलेली आहे. दोन एक महिन्यापूर्वी मी आणि माझे स्नेही डॉ. हापसे ठिबक सिंचन आणि ऊस पीक यावर चर्चा करण्यासाठी जैन इरिगेशन जळगाव याठिकाणी गेलो होतो. दुसऱ्या दिवशी भाऊंना भेटून पुण्याकडे परत येण्याचा विचार केलेला होता. अनिल भाऊ आणि अजित भाऊ या दोघांबरोबर चर्चा करत असताना बराचसा वेळ झाला. रेल्वे पकडण्याची वेळ आणि भाऊंना भेटणे याची सांगड घालता आली नाही. भाऊंना न भेटता पुण्याकडे यावे लागले. जळगावला जाऊन भाऊंना न भेटता येण्याची ही पहिली वेळ होती. लवकरच पुन्हा जाणे होईल आणि भाऊंबरोबर प्रशस्तपणे गप्पा मारता येतील अशा विचारात असतानाच नको ती बातमी कानावर आली आणि विचार थांबले. नियतीला हेच मान्य होते असे समजण्या पलीकडे आपल्या हातात काहीही नाही, हेच त्रिकालाबधीत सत्य आहे.


सेंद्रीय पद्धतीने जैन हिल्सवर ठिबक तंत्राच्या माध्यमातून पिकविला जाणारा भाजीपाला




प्रसिद्ध उद्योगपती भवरलाल जैन यांनी शेतीतंत्राची खोल पायाभरणी वैज्ञानिक दृष्टीने केली. ठिबक सिंचन योजनेतून माळरानाचे नंदनवन केले. जैविक खते निर्माण केली. उच्च शेतीचे तंत्र सामान्यांपर्यंत पोहोचविले. यासाठी त्यांनी कष्टही केले. यातून त्यांचे अर्थपूर्ण चिंतन निर्माण झाले. कांताबाईंचा आणि त्यांचा संसार सुंदर झाला. त्यांच्या चारही मुलांनी सामाजिक बांधिलकीतून जैन उद्योग विश्वाचे नवे जागरण निर्माण केले. याचे प्रत्यंतर 'ती आणि मी' या भाऊंच्या आत्मकथनातून व्यक्त होते. या आत्मकथनाने भाऊंनी संसाराचे



# एक अनोखा सुंदर बोधप्रद जीवन प्रवास

सुंदर प्रात्यक्षिक कसे असते ते दाखविले. तर 'आजची समाजरचना तिचे स्वरूप आणि पुर्नबांधणी' यातून जनमानसाची कोंडी, व आजच्या समाजाची अगतिकता याविषयीचे मंथन भाऊंनी नेमकेपणाने करून त्यावर उपाय योजना सुचविली आहे. त्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने हे त्यांचे भावविश्व आणि विचारविश्व आम्ही मुद्दाम आपल्या विचारांसाठी पुढे ठेवीत आहोत.

डॉ. सुधीर भोंगळे




सत्यरूप आत्मकथनाची परंपरा मराठी साहित्यात समृद्ध आहे. विविध विश्वातील नामवंतांनी लिहिलेले आत्मकथन महत्त्वाचे आहे. काही सामान्य माणसे त्यांच्या जगण्यातून नामवंत झाली, आणि त्यांचे कर्तृत्व नावारूपास आले. कर्तृत्वाला घराची साथ महत्त्वाची असते. आदरणीय भवरलालजी (मोठेभाऊ) यांनी लिहिलेले आत्मचरित्र असेच वेगळ्या प्रकारचे आहे. त्याच्या नावातच वेगळेपण जाणवते. त्यांच्या आत्मचरित्राचे नाव आहे ती आणि मी. ती ही भाऊंच्या आत्मप्रवासाची शक्ती आहे. आणि ज्या मातीने भाऊंच्या मी पणाला खऱ्या अर्थाने व्यापक केले, जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिला, यातले मीत्व संस्कारीत ठरले. भाऊंच्या पत्नी कांताबाईंनी ज्या नेकीने संसार केला आणि आपल्या चारही मुलांना ज्या पद्धतीने संस्कार दिले त्यामुळे जैन घराण्याने निर्माण केलेली सामाजिक बांधिलकी माणुसकीचे वरदान ठरले. 'भवरलाल जैन कोण होते?' हा प्रश्न अशा ठिकाणी उरतच नाही. तर भवरलाल आणि कांताबाई भारतीय संस्कृतीचे नंदादीप आहे. आदर्श कसे जगावे आणि अखंडपणे कुटुंबाची आणि समाजाची सेवा कशी करावी याचे हे उदाहरण आहे. भाऊंनी व्यक्तिस्वातंत्र्यातून ज्या काही अभ्यासपूर्ण विविध शाखा निर्माण केल्या त्यातून मानवतावादाची कार्यनिष्ठ प्रेरणा महत्त्वाची मानली गेली. जैन कुटुंबात ही प्रेरणा आजही आहे. त्यासाठी भाऊंचे जैन कुटुंब आजही तितक्याच निष्ठेने काम करते आहे. भाऊंनी संयुक्त कुटुंबात प्रत्येक व्यक्तिला त्याची अभिव्यक्ती असली पाहिजे म्हणून त्याला स्वतंत्र अंगण दिले. यातून त्यागाचे धडे सहज मिळत गेले. आपण ज्या रोजच्या व्यवहारांना नगण्य समजतो ती फार महत्त्वाची मूल्ये आहेत हे भाऊंच्या आत्मकथनातून लक्षात येते. उदा. काटकसर, साधेपणा, सहनशीलता, आतिथ्य, नम्रता ही आजच्या जगाची मूल्य असलेली परंपरा भाऊंनी आपल्या घरात कधीच रूजविली. देशातील आघाडीचे उद्योजक म्हणून भाऊंनी नाव मिळविले. जैन कुटुंबाची सांस्कृतिक जाणीव फार महत्त्वाची आहे. भाऊंनी मांडलेला सज्ज्नशक्तीचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यासाठी तरी 'ती आणि मी' हे आत्मचरित्र वाचायला हवे. यातून भाऊंनी आपला जीवनप्रवास जो अत्यंत कष्टाने केला त्याचे दर्शन हुबेहुबपणे उभे केले आहे. एका लहानशा खेड्यात नेकीने जगणारे हे कुटुंब पारंपरिक घडी विस्कटू न देता या कुटुंबाने आधुनिक जगालाही आपलेसे केले. परंपरा आणि आधुनिकतेचा फार सुंदर सेतू या कुटुंबाने बांधला. याचे सुरेख उत्तम चित्रण अत्यंत मोजक्या आणि अचूक शब्दात भाऊंनी ती आणि मी या आत्मकथनातून केले आहे.


त्यांनी दिलेली महत्त्वाची जाणीव म्हणजे कुठलेही काम असो, आपले काम आपण करायचे. त्या कामाचा कंटाळा नसावा. कोणतेही काम गळ्यात लोढणे म्हणून करायचे नाही. आयुष्यभर जे काम पत्करले त्या कामाचा कंटाळा कशाला करायचा? रोज



करावयाचा लागणाऱ्या कामाला जर आपण नावे ठेवीत गेलो तर तो निष्काम कर्मयोग होत नाही. यासाठी आपण आपल्या कामाला आपल्यासकट सांभाळायला हवे तरच समाजाला आपण सांभाळू सकतो. नाहीतर एकटे पडतो. कामातून स्वत:च्या पायावर आपण उभे राहू शकतो. दोन पैसे सांभाळू शकतो. यातून सामाजिक प्रतिष्ठा सहज मिळते. यासाठी आपला वेळ आपण सत्कारणी लावणे आवश्यक आहे. चांगल्या विचारांनी शांती लाभते किंवा चांगल्या विचारातून मन प्रसन्न व टवटवीत राहते. माझे जगणे हे केवळ वस्तुत नाही, तर ते माणुसकीच्या गाभाऱ्यात आहे. माणसांना समजून घेऊन मला जगायचे आहे. त्यासाठी तुमचे आमचे करून चालणार नाही. चांगले उत्तम काम केले पाहिजे. उत्तम विचार हाच मनाचा उत्कृष्ट आविष्कार असतो. वाट ठरवून चालावयाचे असते. वाटेसाठी कधीही चालायचे नसते. जीवनाच्या वाटेवर निरर्थकपणे जे चालत राहतात ते केवळ रस्ता कापतात. परंतु जे विवेकाने चालतात त्यांच्या नावाने ध्येयपथ निर्माण होतात. त्यांच्या दृष्टीने ऐहिकता क्षणभंगुर असते. त्यांचा आधुनिक प्रवास चिरंजीव असतो. त्यांची भावनिक प्रश्नोत्तरे अमूल्य असतात. त्यांचे आकलन इतरांना उपयोगी पडते.

भाऊंनी आणि कांताबाईंनी आपल्या जीवनाला सुयोग्य प्रतिसाद दिला. सकारात्मकतेची भावना त्यांनी घरात रूजविली. साध्यासरळ जगण्यातून वेगळ्या अर्थाने त्यांचा जीवनाचा निर्धार






आपल्याला खूप काही शिकविणारा आहे. कोणत्याही चांगल्या गोष्टीची सुरूवात आपल्या घरापासून करायची ह्या हेतूमुळे त्यांचा सहजीवनाचा प्रवास सुंदर झाला. कधीकधी अडचणी माणसाला नवीन काही शिकवीत असतात. अडचणींना समजून घेऊन त्यानुसार वेगळेपणाने जगण्याची इच्छा जगण्याला उठाव देते. यामुळे वेगळे संकटांचे प्रसंग आले तरी सुद्धा ह्या दोघांच्या स्वभावातली समंजसता यत्किंचीतही कमी झाली नाही. कांताबाईंच्या तोंडी नेहमी असायचे,

**''जीवनभर मैंने आप का माना, मैंने तो पुरे परिवार का ही माना – आपने सब देखा है। अब नयी पिढी है, नया जमाना है, वैसे अगले पिढ़ी में भी होगा, यह आप क्यो पकड़ के चलती हो? हर नया दिन अपना पैगाम लेके आता है, हर पिढ़ी भी एक नयी दृष्टी धारण करती है, यह हमे समझना पडेगा। तो ही हम उस पिढी के साथ सुखचैन से रँह पायेंगे।''** ह्या शब्दांनी कांताबाई माझ्या आईची समजूत काढीत असे. (ती आणि मी, पान–१०८)

अशा जगण्यातून वेगळे शिक्षण मिळते. संस्कारांची देवाणघेवाण होते. बहुढंगी स्वभाव कळतात. स्वभावाची आंतरिक ओळख होते. यामधून घर समृद्ध होत जाते. आपण काय करीत असतो ते ही जाणवते. वाकोदच्या मातीशी या पतीपत्नीचे जे जीवाभावाचे नाते जडले त्यातूनच अखिल भारतीय मिरची पीक स्पर्धेत भाऊंनी बक्षीस मिळविले. निसर्गाचे सानिध्य, गावचा सहवास या सगळ्यामुळे कारखानदारी वाढली तरीही शेती आणि शेतकरी



भाऊंनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या पुस्तकाचे ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे आणि ख्यातनाम लेखिका डॉ. विजया राजाध्यक्ष प्रकाशन करताना



यांचे नाते तसेच राहीले. कुठल्याही परिस्थितीत भुमिपुत्रांचा सन्मान केलाच पाहिजे ही जाणीव भाऊंना मोठे करीत गेली. दोघांचीही मानसिक स्थित्यंतरे सहज होत होती. कांताबाईंचा सेवाभाव सगळ्यांना जाणवे. यातून सात्त्विक जगण्याचा जो वस्तुपाठ मिळाला त्यामुळे मुलांनी आपल्या दिशा योग्य प्रकारे निवडल्या. कांताबाई लहानमोठ्यांशी प्रेमाने, आदराने वागत. गडी असो, काम करणारी बाई असो त्यांनी सगळ्यांना आपलेसे केले. यामुळे सारी माणसे आपण कांताबाईंच्या कुटुंबात आहोत असेच मानत. कोणतेही काम कांताबाईंना रेंगाळत ठेवलेले आवडत नसे. बाजारातली खरेदी असो, स्वयंपाक घरातले काम असो सगळे कसे वेळेत व्हायला पाहिजे. घरात कणिक तिंबत असतांना समोर दुसऱ्याला बसवून भाजी कापायला त्या स्वत: बसत. किचनमध्ये वेळेच्या आत सगळे काम झाले पाहिजे असे त्यांना वाटे. व्यवहार स्वच्छ असत. यामुळे कांताबाईंनी जाणिवपूर्वक घर सांभाळले. संयुक्त कुटुंबात राहण्याच्या सवयीने मुले व्यवसायात जशी आली तस तसे संस्कारांचे त्यांचे आवार विस्तारत गेले. हळूहळू कारखानदारीत वाढ होऊ लागली. विविध प्रकल्प आले. तरीही कांताबाईंनी स्वयंपाकाचा वसा अखेर पर्यंत ठेवला. कांताबाई मुलीं व सूनांना म्हणत, सुंदर वस्तु अवश्य घ्या पण कुणाच्या ह्रदयात विराजमान व्हायचे असेल तर प्रेमाने, रूचकर पोटभर खाऊ घाला. हेच घराचे घरपण आहे. जबाबदारीने




शेजारी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, कवि ना.धों. महानोर, श्री. भवरलाल जैन, श्री. भरतकुमार राऊत व प्रकाशक श्री. अशोक कोठावळे

आधी कुटुंब सांभाळा. कारण त्यात यशस्वी होणे हेच खरे जगण्याचे सौंदर्य आहे. हे व्रत जैन कुटुंबाने आजपर्यंत पाळले आहे. त्यामुळे नव्यानव्या वाटा हे कुटुंब आनंदाने शोधत गेले. यातूनच जैन उद्योग समूह विकसीत झाला. जगात नावलौकीकाला आला.

विविध संस्थांमध्ये भाऊंनी काम केले. अत्यंत आस्थेने उद्योगाची वाढ केली. या साऱ्यातून गावाविषयी, देशाविषयी, विदेशाबद्दल मानवी दृष्टिकोन कसा असावा याचा भाऊ म्हणजे चालता बोलता आलेख होते. विशेषत: विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती झाल्यानंतर भाऊंनी जेव्हा आधुनिक जगाचे अवलोकन केले यातून त्यांनी काढलेला निष्कर्ष अर्थपूर्ण ठरला. तो म्हणजे विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने जीवन गतिमान केले परंतु समाजात अपप्रवृत्ती निर्माण झाल्या. परस्परांच्या विश्वासाला तडा गेला. एकटेपणा घालविण्यासाठी क्लब, पार्टी यांचे प्रमाण वाढले, अशांतता पसरली. यातून भ्रष्टाचार, नितीभ्रष्टता वाढत गेली. यासाठी सज्जनशक्तीची वातावरण निर्मिती तयार करणे एवढेच आपल्या हातात आहे हा भाऊंनी दिलेली विचार महत्त्वाचा ठरतो आणि या विचाराभोवती त्यांचे 'आजची समाजरचना: तिचे स्वरूप व पुनर्बांधणी' हे पुस्तक महत्त्वाचे ठरते.

प्रत्येक घटकाला जर आपले काम करण्याची संधी मिळाली तर दांडग्या शक्तीला आळा बसेल. विषमता कमी होईल आणि कुटुंबे






'आजची समाज रचना आणि तिची पुनर्बांधणी' या भाऊंच्या पुस्तकाचे जेष्ठ पत्रकार कुमार केतकर प्रकाशन करताना शेजारी श्री. अच्युतराव अत्रे, श्री. वाय.एस. महाजन, श्री. भवरलाल जैन, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु श्री.एस.एफ. पाटील, श्री. केतकर व श्री. अशोक दातार

संपन्न होतील. सामाजिक हिताचा फायदा यातूनच होतो. परदेशात चांगले वागायचे आणि आपल्या देशात कसेही वागायचे ह्या वृत्तीला तडा बसतो. नागरिकांवर नैतिक वचक राहण्यासाठी आपण स्वच्छ वृत्तीने काम केले पाहिजे नाहीतर स्वार्थांध नेतेमंडळी फोफावत आहेतच आणि मुळातच त्यांचा प्रभाव वाढतो आहे. त्याच्यावर तोडगा एकच सामान्य माणूस सुधारला पाहिजे. व्यक्ति चारित्र्याचे अध:पतन थांबले पाहिजे. प्रत्येकाने असेच ठरविले पाहिजे, मी माझ्या कामात कसलीही लाच मागणार नाही. या साऱ्यातून निर्माण झालेल्या सामाजिक संस्था निर्दोष व सबळ झाल्या पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांच्या वचनाचा भाऊंनी आपल्या विवेचनात नेमकेपणाने उपयोग करून घेतला आहे. विनोबाजींनी म्हटले आहे, ''राजकीय सत्तेत समाजाला पुढे नेण्याची फारशी शक्ती नसते. ती शक्ती आणि वृत्ती सर्व बंधनापासून मुक्त, सर्व स्थानांपासून अलिप्त, सेवापरायण वृत्तीने समाजसेवा करणाऱ्यांमध्येच (सज्जनशक्तीमध्येच) असू शकते. राज्यसत्तेमार्फत सद्‌विचार किंवा सद्धर्म यांचा प्रसार होऊ शकत नाही. परंतु सज्जनशक्तीने त्यांच्या अंगी असलेली मरगळ, तटस्थता आणि निष्क्रियता झटकली पाहिजे.'' मॉंटेस्क्यू यांनी म्हटल्याप्रमाणे "The tyranny of prince in an oligaechy of citizen in a democracy." सज्जनशक्तीची खामोशी आत्मघातकी ठरू शकेल.

सज्जनशक्ती जर शून्य बनली तर समाजही भ्रष्ट होतो. सज्जनशक्तीने नेहमीच समाजप्रबोधनाचे काम केले पाहिजे. भाऊंचा दृष्टिकोन असा होता. निस्वार्थपणे त्याग करणारी मंडळी भली ती थोडी असोत पण ती समाजाचा कणा असतात. निर्व्यसनीपणा हा समाजाचा अलंकार असतो. अपरिग्रह, अहिंसा, शांती, सेवा आणि अध्यात्म यांची सतत शिकवण देणारा साधुसंताचा वारसा आपल्या समाजात प्रबळ आहे. त्याचा उपयोग करून परिवर्तन प्रक्रियेत सहजपणा येऊ शकेल. त्यासाठी सज्जन क्षेत्रातील बुद्धिमान आणि कार्यकुशल व्यक्तींनी आपसातले मतभेद विसरून समाजासाठी प्रयत्नपूर्वक एकत्र आले पाहिजे. अशा सज्जनांनी मने मोठी करून वैचारिक, सहृदयता बाळगली पाहिजे. यातून समविचारी व्यक्तिंना, संस्थाना वेगळे बळ मिळेल. लोकांना बरोबर घेऊन समाज विकासासाठी पुढे जाणे हे खरे सज्जनशक्तीचे काम आहे. वास्तवाचे भान ठेऊन आदर्शाचा दृष्टिकोन रूजविला पाहिजे. त्यासाठी सज्जनांना बरोबर घेऊन जाण्याची ताकद नक्कीच सज्जनशक्तीत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. सज्जनशक्ती आपले निरनिराळे गट करून त्याच्या बाहेर कधी येत नाही. ही उदासिनता त्यांना टाकून दिली पाहिजे. नितीमत्तेच्या जोरावर त्यांनी समाजाला योग्य ते सल्ले दिले पाहिजेत.




लोकांना योग्य सल्ला पटवून दिला पाहिजे. लोकांना समजून घेतले पाहिजे. कदाचित सुरूवातीला त्यांची उपेक्षा होईल परंतु सामान्यजनांच्या लक्षात आल्यावर ते त्यांना मोठेपणा देऊन नक्कीच त्यांच्या विचारांचा पुरस्कार करतील. यामुळे भावी पिढीची सुकर पायाभरणी केल्याचे व्यक्तिगत समाधान त्यांना मिळेल. भाऊंचे हे सामाजिकीकरणाचे विचार आजही देशाला नक्कीच उपकारक आहेत, म्हणून त्यांचे पुण्यस्मरण अशा चिंतनाच्या रूपाने करण्यात मनाला समाधान वाटते.

■ ■ ■



# अंतरीचे धावे


**अण्णा हजारे**
राळेगणसिद्धी, ता. पारनेर,
जि. अ.नगर


आपण आपल्या आवडीच्या माणसांवर प्रेम करतो. प्रेम निस्वार्थी असेल तरच चिरकाल टिकते. अन्यथा पाण्यावरच्या बुडबुड्यासारखे केव्हांच विरुन, संपून जाते. आपण ज्या माणसांवर प्रेम करतो ती सगळी माणसे आपल्याला रोज भेटणारी, परिचयाची किंवा घनिष्ट संबंध असलेली असतातच असे नाही. काही माणसे फारशी न भेटता मनात प्रेमाचे, आदराचे घर करुन राहतात. जीवाभावाची होतात. त्यातले एक नाव म्हणजे जळगावच्या जैन उद्योगसमुहाचे संस्थापक अध्यक्ष श्री. भवरलाल जैन. श्री. जैन यांना ४ फेब्रुवारी १९८८ रोजी मी भेटलो. ती आमची पहिली आणि शेवटची प्रत्यक्ष भेट त्यानंतर ते हयात असेपर्यंत त्यांची कधीही समक्ष भेट झाली नाही. त्यांचे पुतणे श्री. अभय जैन हे कायम माझ्याकडे येतात. त्यांनी अनेकदा गांधीतीर्थ, जैन हिल्सवरील पाणलोट विकासाचे काम व प्रक्रिया उद्योग आणि फळबागा पाहण्यासाठी बोलाविले. पण समक्ष जाऊन बघण्याचा योग निदान हा लेख लिहीपर्यंत तरी आलेला नाही. मात्र भवरलाल भाऊंच्या बरोबर चार-पाच वेळा फोनवरुन बोलण्याचे प्रसंग आले. त्या फोनवरचे बोलणे हाच आमच्या मैत्रीचा, प्रेमाचा धागा आहे आणि ज्या फोनवरुन आम्ही एकमेकांशी बोललो ते फोन हेच संवादाचे साक्षीदार आहेत.

पाणलोट क्षेत्र विकास आणि जलसंधारण हे आमच्या दोघांच्या आवडीचे विषय. या कामासाठी मी देशभर हिंडत राहिलो. लोकसहभाग मिळवून सामुदायिकपणे काम करण्याचे जे एक सामर्थ्य असते त्याचे मूर्तिमंत प्रारुप म्हणून पाणलोट विकासाची कामे देशभर उभी करीत राहिलो. राळेगणसिद्धी येथे सर्वप्रथम जे काम लोकांच्या सहकार्य व श्रमदानाने उभे केले ते पाहण्यासाठी देश-विदेशातून लोक येत राहिले, आजही येतात.



राळेगणसिद्धी येथील शेततळे आणि सौर ऊर्जेची निर्मिती करणारे तंत्रज्ञान याची उभारणी जैन इरिगेशन मार्फत झाली.

असेच भव्यदिव्य काम भाऊंनी जळगावच्या जैनहिल्सवर स्वत:च्या कल्पनेतून व कष्टातून उभे केले आहे. किंबहुना शास्त्रशुद्ध पद्धतीने माथा ते पायथा या तत्वावर जे थोडे पाणलोट राज्य व देशात विकसीत झालेले आहेत त्यात जैनहिल्सच्या पाणलोटाचा समावेश आहे. १५०० एकराचा हा पाणलोट भाऊंनी ज्या कल्पकतेने व मेहनतीने विकसित केला त्याला तोड नाही. शेतकऱ्यांना चारमाही, आठमाही पाणी सिंचनासाठी उपलब्ध करुन द्यायचे असेल तर पाणलोट विकासाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे असे माझे आणि भाऊंचे दोघांचेही विचार आहेत. या विचारांची नाळ जुळल्यामुळेच आम्ही प्रत्यक्ष कधी न भेटताही वैचारिक मैत्री होऊ शकली. हा मैत्रीचा धागा समाजाच्या आणि राष्ट्राच्या उन्नतीचा असल्यामुळे आम्हां दोघांनाही कायम एकमेकांबद्दल आकर्षण राहिले.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली १९९६ मध्ये दुसरा जल व सिंचन आयोग नेमण्यात आला. त्यात डॉ. भवरलाल जैन यांना पाणी प्रश्नाचे गाढे अभ्यासक, ठिबक सिंचनाचे देशातील प्रवर्तक आणि उद्योजकांचे प्रतिनिधी म्हणून सदस्य करण्यात आले होते. या आयोगाच्या बैठकांमधून त्यांनी पाणलोट क्षेत्र विकास आणि पाण्याच्या उपलब्धतेवरुन पीक पद्धती ठरवावी व ठिबक-तुषार सिंचनाचा वापर अनिवार्य करावा यांसारखे विषय नेटाने व अभ्यासपूर्ण रितीने मांडले. पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम हा नेहमीच उपेक्षित राहिला आहे. सरकार या कामाला प्राधान्य देण्याची भाषा करते पण त्यासाठी लागणारी पाहिजे तेवढी आर्थिक तरतूद करीत नाही ही आमची दोघांचीही खंत होती आणि आजही आहे. भाऊंनी हा विषय आयोगाच्या चव्हाट्यावर नेऊन जोरदार व आग्रहीपणे पेटविला. त्यामुळे चितळे आयोगाला पाणलोट विकासाच्या कार्यक्रमाबद्दल सरकारने प्राधान्याने लक्ष देऊन आर्थिक तरतूद करावी असे लिहावे लागले. भाऊंनी जैन हिल्सवर एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकासाचे जे 'मॉडेल' उभे केले आहे ते अनेकांना प्रेरणा व दिशा देणारे आहे. ज्या ठिकाणी कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करणे आणि स्थानिक मनुष्य तिथल्या तिथे रोजगारात सामावून घेणे हे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे जे अंतिम ध्येय आहे ते साध्य करणे केवळ भवरलालजींनाच शक्य झाले आहे. जैन हिल्सच्या हजारो एकर क्षेत्रावर आंब्याची व कांद्याची लागवड करून उत्पादीत मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी त्यांनी तिथेच उभी करुन दाखविली. कांदा पिकात कराराची शेती यशस्वी केली. शेतकऱ्यांना हमी भावाची खात्री देऊन माल खरेदी



जैन इरिगेशन कंपनीने बनविलेल्या मायक्रो स्प्रिंकलरचे प्रात्यक्षिक श्री. अण्णा हजारे पाहताना शेजारी श्री. अशोक जैन, श्री. भवरलाल जैन, श्री. चंदनशेठ राठी, श्री. आर.बी. जैन, श्री. व्ही.बी. पाटील.




होईल अशी विश्वासार्हता निर्माण केली. शेतकरी आणि उद्योजक यांच्यातला विश्वास दृढ व वृद्धिंगत करण्याचे काम भवरलालजींनी केले. त्यामुळे जळगाव व भोवतालचा परिसर सुखसमृद्ध झाला आहे. खानदेशच्या विकासातील भाऊंचे हे योगदान कधीच कुणीही विसरु शकणार नाही. जळगावचे नाव त्यांनी जगाच्या नकाशावर नेले. येथल्या शेतकऱ्याच्या मालाला जगाची उत्कृष्ट बाजारपेठ दाखविली. या बाजारपेठेतील शेतीमाल निर्यातीचे युद्ध सक्षमपणे लढून जिंकण्यासाठी ज्ञान, विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान पुरवून समर्थपणे स्वत:च्या पायावर उभे केले. भाऊंचे हे योगदान कायम अनेकांना प्रेरणा देत राहील.

महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर त्यांची गाढ श्रद्धा असल्यामुळे ते आयुष्यभर गांधी विचारांची कास धरुन त्याच मार्गावर वाटचाल करीत राहिले. कोट्यवधी रुपये खर्च करुन त्यांनी जळगावात गांधीतीर्थ उभे केले. गांधीजींचे जगातले अत्यंत उत्कृष्ट स्मारक असे अनेक लोकांनी मला खूप वेळा सांगितले. हे गांधीतीर्थ पाहण्याचा मोहही आता मला झालेला आहे. बघूया केव्हां प्रत्यक्ष भेट देण्याचा योग येतो ते! या गांधी तीर्थच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी आवर्जून येण्याचे निमंत्रण भाऊंनी मला दिले होते. पण त्याच सुमारास आमचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन चालू असल्यामुळे त्या समारंभाला मला उपस्थित राहता आले नाही. मात्र या तीर्थामध्ये भाऊंनी जगभरातून गांधी व त्यांच्यासंबंधीच्या साहित्याचे संकलन करुन ते लोकांना व अभ्यासकांना उपलब्ध करुन दिले आहे ही मोठी आनंददायी व गांधी विचारांचा पुरस्कार करणारी गोष्ट भाऊंच्या हातून जी घडली आहे त्याचे वर्णन करण्याला माझ्याकडे समर्थ शब्द नाहीत. हे फार मोठे काम भाऊंनी करुन गांधी विचारांचा नंदादीप सतत तेवत ठेवला आहे असेच मी मानतो.

राळेगणसिद्धी येथे आम्ही शेतीचे निरनिराळे प्रयोग करीत असतो. पाणलोटातून विकसीत केलेले पाणी हे अतिशय मोलेमहागडे संसाधन आहे. त्याचा काटकसरीने व जपून वापर

## भाऊ उद्योजकातले संत

सत्य बोलणे आणि त्याप्रमाणे वागणे हा खरा मानवधर्म आहे. या सत्याचे भाऊंनी आयुष्यभर कठोरपणे आचरण केल्यामुळे आमच्या दोघांच्या आंतरिक संवादाला सत्यत्वाची धार प्राप्त झाली होती. सत्यासाठी तप लागते, मन स्वच्छ लागते नि सारे काही सोसायची तयारी लागते. आयुष्यभर केलेल्या परोपकाराच्या सत्यार्थ दधीची ऋषीला आपली हाडे द्यावी लागली. केवळ सत्यासाठी याज्ञवल्क्यांना वेद ओकून नवा वेद सांगावा लागला. 'सत्यमेव जयते' च्या पाट्या लावून सत्याच्या नावाखाली काय काय चालले आहे ते आपण सारे जाण रोज उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. संत तुकाराम महाराजांची शिकवण भवरलालजींनी ध्यानात ठेवून ती कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला. संत तुकाराम महाराज म्हणतात

**पुण्य परउपकार पाप ते परपीडा।**
**आणिक नाही जोडा दुजा यासी ।।**
**सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म।**
**आणिक हे वर्म नाही दुजे।**

या सत्याचा प्रसंगी भवरलालजींनाही त्रास झाला. तरी देखील त्यांनी सत्याची कास सोडली नाही. आजच्या आधुनिक काळात एका वेगळ्या अर्थाने भाऊ हे उद्योजकांमधले संत होते. मुळात लक्षात घ्यावे! संत ही पदवी नाही. मानपत्र देऊन संत होता येत नाही. 'मला तुम्ही संत म्हणा' असा धोशा लावून संतत्व मिळत नाही. संत तुकाराम म्हणतात, **''नाही संतपण मिळत ते हाटी। हिंडता कपाटी रानीवनी''**।। संत हा श्वासोच्छवासाइतका सहज होण्याचा असलेपणा आहे. कबीर म्हणतात, **''रमता साधू। बहता पानी''** असे संतत्व प्रवाही आणि सहज आहे. भाऊ नेमके तसे होते.





झाला पाहिजे. म्हणून सगळ्या जमिनीला पाणी न देता थेट पिकांच्या मुळाशी ठिबक व तुषार सिंचनाद्वारे पाणी पुरवठा करणारे तंत्रज्ञान आम्ही वापरण्याचा निर्णय केला. जैन इरिगेशन कंपनीने या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक दाखविणारे मॉडेल आमच्या शेतावर उभे केले. भवरलालजींनी भारतात ठिबक १९८७ साली आणले. त्यावेळेपासून आम्ही हे तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न करुन लोकशिक्षणाचे काम करीत आहोत. जगाच्या बाजारपेठेतील शेतीमाल निर्यातीचे युद्ध सक्षमपणे लढून जिंकायचे असेल तर उघड्या रानात मालाचे उत्पादन करुन उपयोग होणार नाही. त्यासाठी ग्रीन हाऊस, पॉलिहाऊसमध्येच उत्पादन करुन ग्राहकांना पाहिजे त्या दर्जाचा, रंगाचा, रुपाचा, चवीचा, वासाचा व डोळ्यांनी बघता क्षणीच नजरेत भरणारा माल आपण कमी किमतीत उपलब्ध करुन दिला पाहिजे ही खूणगाठ मनाशी बांधून पॉलिहाऊस उभे करण्याचा निर्णय केला. या कामातही जैन इरिगेशनने आम्हांला सर्व प्रकारची मदत दिली. नुसते साहित्य दिले नाही तर त्यासाठी लागणारे मार्गदर्शन, तंत्रज्ञान व मनुष्यबळही उपलब्ध करुन दिले. पाणी वर्षभर साठवून ठेवून वापरण्यासाठी शेततळेही करुन दिले. जैन इरिगेशनने ही जी मदत केली ती आम्ही कधीच विसरु शकणार नाही.

भवरलालजींनी कायम सत्याचा पाठपुरावा केला. भ्रष्टाचाराचे त्यांनी कधीही समर्थन केले नाही. श्री. सुरेशदादा



४ फेब्रुवारी १९८८ रोजी श्री. अण्णा हजारे यांनी जळगाव येथील जैन इरिगेशनच्या पाईप फॅक्टरीला भेट दिली. त्यावेळी त्यांना माहिती देताना श्री. भवरलाल जैन शेजारी श्री. चंदनशेठ राठी, व आर.बी. जैन

जैन व माझ्यात बराच काळ संघर्ष झाला. पण या संघर्षाची कटुता भवरलालजींनी कधीच मनांत बाळगली नाही. माणसाची जाणीव उच्च अवस्थेत व उच्च लोकांत गेली म्हणजे तिच्यांत एक प्रकारचा विशालपणा येतो असा अनुभव आहे. असा हृदयाचा मनमोकळा विशालपणा भाऊंमध्ये होता. त्यामुळे आमचा आंतरिक संवाद चालत असे. या संवादाला हृदयाची भाषा कळते. हा संवाद ही आत्मविश्वासाची श्रेष्ठ मानसपूजा आहे. मी काय काय केले आणि मला आजही काय करायचेय हे ठरविणे अवघड आहे. मन चंचल आहे. ते माणसाला कुठेही नेते. त्याला काहीही करायला लावते. मन प्रपंचात कधीही आणीबाणी आणते, किंवा ताणाबाणा निर्माण करते. अशा मनाशी संवाद करणे नाजूक काम आहे. तो संवाद मी आणि भाऊ यांच्यात घडला हा विलक्षण योगायोग आहे. त्यांच्या हयातीत त्यांची भेट घेण्याचे राहून गेले. ती रुखरुख मनात निश्चित राहील. टेलीफोनवरचा संवाद सतत मनांत गुंजत राहील. भाऊंच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

# प्रकल्प हीच भाऊंची जिवंत स्मारके



सौरऊर्जेचे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर विकसीत करुन जैन इरिगेशन कंपनीने देशाची मोठी सेवा केली आहे. या सौरऊर्जेची निर्मिती करणारी काही पॅनेल्स कंपनीने आमच्या राळेगण सिद्धी येथील शाळेजवळ बसविली आहेत. या पॅनेलद्वारे निर्माण होणारी वीज आम्ही शेततळ्यातील पाणी उचलून वाहून नेण्यासाठी आणि मुलांना पिण्यासाठी जे पाणी लागते त्याच्या टाक्या भरण्यासाठी वापरतो. जैन इरिगेशनचा सौर कृषी पंप हे तर शेतकऱ्यांना मिळालेले मोठे वरदान आहे. वास्तविक हा पंप कमी किंमतीत व जास्तीत जास्त सवलतीत शेतकऱ्याला कसा उपलब्ध करुन देता येईल याचा सरकारने विचार केला पाहिजे. या सौर कृषी पंपासाठी येणारा भांडवली खर्च थोडा अधिक आहे. बऱ्याच शेतकऱ्यांना त्यामुळे इच्छा असून व महत्त्व पटूनही हा सौरपंप बसविता येत नाही. यासाठी सरकारने मदतीचे धोरण आखण्याची आवश्यकता आहे.सौर ऊर्जा ही पर्यावरणाशी मैत्री राखणारी इको फ्रेन्डली आहे. ती दररोज सहजपणे उपलब्ध होणारी मुबलक नैसर्गिक संपत्ती आहे. तिचा पुरेपूर वापर करण्याचे धोरण देशाने आखणे हीच खरी भवरलालजींना श्रद्धांजली ठरेल. कारण नैसर्गिक संसाधनांचा पुरेपूर व अचूक आणि काटकसरीने वापर करण्याकडे त्यांनी आयुष्यभर लक्ष देवून त्याचाच निदिध्यास घेतला होता. त्यातूनच कचरा व टाकाऊ पदार्थांपासून वीज निर्मिती, खत निर्मिती यांसारखे अनेक प्रकल्प भाऊंनी उभे केले. हे विविध शेती पूरक प्रकल्प हीच भाऊंची जिवंत स्मारके आहेत.





# परोपकारी भाऊ

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांचे २५ फेब्रुवारी २०१६ रोजी निधन झाले. त्यांच्या दुसऱ्या पुण्यतिथी निमित्त आमदार दिलीप वळसे पाटील यांनी भाऊंच्या कार्याचा धावता आढावा घेऊन त्यांच्या संबंधीच्या आठवणी या लेखातून जाग्या केल्या आहेत. भाऊंचे संपूर्ण जीवन ही कार्यकर्तृत्वाची प्रचंड मोठी गाथा आहे. त्यांच्या या कर्तृत्वाची पुण्यस्मरणाच्या निमित्ताने आठवण केल्यानंतर त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना कामाचे स्फुरण चढल्याशिवाय राहणार नाही असा मला विश्वास वाटतो.



**श्री. दिलीप वळसे पाटील**
आमदार



शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे आपण म्हणतो. परंतु तिच्या विकासाकडे, तिच्यातील गुंतवणुकीकडे, तिच्या आधुनिकीकरणाकडे व जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कृषी शिक्षण, विस्तार व संशोधनाकडे जेवढे पाहिजे तेवढे लक्ष देत नाही. शेतीला प्राधान्य देत नाही. त्यासाठी मोठी आर्थिक तरतूद करीत नाही. कृषि विद्यापीठांचा संशोधनाचा प्राधान्यक्रम तर निराळाच असतो आणि त्याचे संशोधनही शेवटच्या गरजू माणसापर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती आहे. या सर्व परिस्थितीचे नेमके आकलन श्री. भवरलालजी जैन यांना फार लहान वयातच झाले. घरची थोडी शेती होतीच. घरची आर्थिक परिस्थितीही जेमतेमच होती. अशाही स्थितीत चांगले शिक्षण घेऊन श्री भवरलालजी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झाले. उपजिल्हाधिकारी झाले. आता सरकारी नोकरीत रुजू व्हायचे होते. तेवढ्यात आई–वडील म्हणाले, आपल्या मारवाड्याच्या घरात आजपर्यंत कुणी नोकरी केली नाही. तू पण करु नकोस. घरात सात हजार रुपये आहेत हे घे आणि एखादा व्यवसाय सुरु कर व दोन–चार लोकांना रोजगार दे. आई–वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानून हातगाडीवरुन रॉकेल विकण्याचा धंदा भवरलालजींनी सुरु केला. पुढे हळूहळू वेगवेगळ्या एजन्सी घेऊन निरनिराळ्या व्यवसायात जम बसवित गेले. काही धंदे यशस्वी झाले. काही अयशस्वी झाले. अपयश आले म्हणून ते कधीही खचले नाहीत. उद्योगपती अनेक असतात. शेती सोडून अन्य अनेक धंद्यांचा ते विचार करतात. ज्यात जास्तीत जास्त नफा मिळेल व धोका कमी असेल अशाच व्यवसायाकडे बहुतेक उद्योजकांचा कल असतो. परंतु भवरलालजी हे एक अजबच रसायन होते. अनेकदा मला त्यांना भेटण्याचा, त्यांच्याशी बोलण्याचा योग आला. शेती हाच आपल्या व्यवसायाचा पाया असला पाहिजे हा निर्धार करुन ते धैर्याने उभे राहिले व शेतीशी निगडीत असलेले पाईप निर्मिती, ठिबक व तुषार सिंचन साहित्याची निर्मिती, शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी, गांडुळ खत निर्मिती, जैविक खते निर्मिती, द्रवरुप खतांची निर्मिती, कचऱ्यापासून वीजनिर्मिती, टिश्यूकल्चर तंत्राद्वारे उत्कृष्ट दर्जेदार रोपांची निर्मिती, बियाणे तयार करण्याचा कार्यक्रम, शेतीला लागणारी विविध अवजारे तयार करणे यांसारखे व्यवसाय करीत राहिले. नुसता व्यवसाय करुन ते थांबले नाहीत. त्यांनी सगळे तंत्रज्ञान, साहित्य व संशोधन खाली तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून गावोगावी जाऊन विविध शेती संस्थांच्या मदतीने शेतकऱ्यांसाठी चर्चासत्रे, मेळावे, शिबीरे, वर्ग यांचे आपल्या पैशाने आयोजन केले. आमच्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यावर ऊस उत्पादकांसाठी जैन इरिगेशन कंपनीने अनेकदा शेतकरी मेळाव्यांचे आयोजन केले होते. या साऱ्या कृतींमागे भाऊंची एक विशिष्ट विचारधारा व प्रेरणा होती. आपल्या नफ्यातला जास्तीत जास्त वाटा आपण समाजाला व विशेषत: शेतकऱ्यांना दिला पाहिजे म्हणून अनेक शेतकरी सहलींचे आयोजन केले. जळगावला जैन हिल्स व येथील शेतीचे अद्ययावत प्रयोग पहायला जग व देशभरातून माणसे येतात. त्या सर्वांची मोफत राहण्याची, भोजनाची व मार्गदर्शनाची व्यवस्था कंपनी अत्यंत आवडीने व सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून करते. हा भाऊंच्या उदात्त दृष्टिकोनाचा परिणाम आहे.

शेतकऱ्याची आर्थिक उन्नती झालीच पाहिजे. त्याने कधीही दारिद्र्यात राहता कामा नये. एवढेच नव्हे तर शेतीला व शेती करणाऱ्याला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. त्याचा मानसन्मान झाला पाहिजे. त्याला उत्कृष्ट उत्पादनाबद्दल पुरस्कार मिळाले पाहिजेत. शेतकऱ्याला शेतीत टिकून राहावेसे वाटले पाहिजे. यासाठी त्याच्या मालाला रास्त किंमत मिळावी पाहिजे अशा विचारांनी भवरलालजी भारावलेले होते. त्यामुळे त्यांनी सगळे व्यवसाय व सगळे निर्णय या विचारांशी सुसंगत राहूनच केले. शेतीमध्ये अहोरात्र खूप कष्ट आहेत. पुन्हा ती बेभरवशाची आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, टोळधाड, बोलवर्म सारखी कपाशीवर आलेली अळी वगैरे वगैरे. घटना घडल्यास सर्व उध्वस्त होणार. अशा स्थितीत



जैन हिल्सवर ना. दिलीप वळसे पाटील आणि श्री. भवरलाल जैन चर्चा करताना

शेतकऱ्याला पुन्हा उभे करणे हे खूप आव्हान आहे. ते ओळखून भाऊंनी नवनवीन तंत्रज्ञाने व कराराच्या शेतीसारखे उपाय शोधून काढले. कमी पाण्यातही शेतकऱ्याला अधिकाधिक उत्पादन मिळाले पाहिजे. त्याची उत्पादकता वाढली पाहिजे. उत्पादन खर्च कमी झाला पाहिजे. यासाठी १९८७ मध्ये भारतात सर्वप्रथम भवरलालजींनी ठिबकचे तंत्रज्ञान आणले. केळीची ग्रॅन्ड नैन ही व्हरायटी, डाळिंबाची टिश्यूकल्चर रोपे, पांढऱ्या कांद्याचे व्ही-१२ जातीचे बियाणे, ऊसाची टिश्यूकल्चरची रोपे तयार करून त्यांनी भारतीय शेती क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली आहे. शेतकऱ्याच्या घरात आर्थिक समृद्धी नांदते आहे. यामागे भाऊंचे मोठे कष्ट व कल्पकता आहे. जगात जिथे नवीन काही उपयुक्त व चांगले दिसेल ते भारतात आणून येथल्या शेतकऱ्यांसाठी ते आपल्या वातावरणाला अनुकूल होईल अशा पद्धतीने विकसीत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भाऊंची चारही मुले शेतीच्याच व्यवसायात असून त्यांच्याच पाऊलावर पाऊल टाकून पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने मोठी भाग्याची गोष्ट आहे. शेतीच्या क्षेत्रात भाऊंनी आयुष्यभर खूप काम केले. त्या कामाबद्दल त्यांना पद्मश्री सारखे मानाचे अनेक पुरस्कार मिळाले. हे सर्व पुरस्कार त्यांनी आपल्याला मदत व सहकार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना अर्पण केले. शेतकऱ्याच्या चेहेऱ्यावरचे हसू हाच माझ्या आयुष्यातला मोठा मानसन्मान आहे व पुरस्कार आहे असेच ते मानीत. त्यामुळे जळगावच्या जैनहिल्सला भेट देणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना ते भेटत व त्यांच्याशी बोलून विचारपूस करीत. त्यामुळे भाऊंची शेती संशोधनाची दिशा ही शेतकऱ्यांच्या समस्यांशी निगडीत अशीच होती. साध्या साध्या व कमी खर्चाच्या गोष्टीतून ते समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करीत. परिणामी अगदी छोट्यातल्या छोट्या शेतकऱ्यालाही ते तंत्रज्ञान व साहित्य आपण वापरु शकतो या बद्दलचा विश्वास वाटे. शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करुन तर त्यांनी कांदा, आंबा, कळी,



स्ट्रॉबेरी, डाळिंब, मिरची व मसाल्याचे पदार्थ उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात चैतन्याची पहाट फुलविली. जगाच्या बाजारपेठेत मोठी स्पर्धा करुन त्यांनी आपला स्वत:चा नावलौकिक व ब्रॅण्ड प्रस्थापित केला. शेतकऱ्याच्या मालाला जागतिक बाजारपेठ दाखविली. कंपनीत विविध पिकांचे सखोल ज्ञान असणारे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ नेमून त्यांना गावोगावी शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी पाठविले. मोठे प्रशिक्षित व शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेले कर्मचारी नेमून विक्रीयोत्तर सेवा उपलब्ध करुन दिली व शेतकऱ्यांच्या सर्व समस्या तातडीने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या ३५-४० वर्षात कंपनीचा नावलौकिक व विश्वासार्हता प्रचंड वाढीला लागून कंपनीचा विस्तारही अचंबित व्हावा इतका मोठा झाला आहे. इतक्या कमी कालावधीत कष्टाने व प्रामाणिकपणाने काम करुन खूप थोड्या कंपन्या मोठ्या झालेल्या दिसतील. त्यात या जैन इरिगेशनचा समावेश आहे ही अत्यंत उल्लेखनीय व भाग्याची गोष्ट आहे. अर्थात त्यामागे भाऊंचे अपार कष्ट, मेहनत, कल्पकता व ध्येयवादी तत्वज्ञान आहे. ध्येयाशिवाय माणूस अंतिम लक्ष्यापर्यंत पोहचू शकत नाही याचा आदर्श म्हणजे भाऊंनी उभी केलेली ही कंपनी आहे.



ग्रीनहाऊस मधील ढोबळी मिरचीची श्री. भवरलाल जैन पाहणी करताना शेजारी अजित जैन

वैयक्तिक माझ्याबद्दलही भाऊंना खूप आपुलकी व प्रेम होते. त्यामुळेच आम्ही मंचरला दरवर्षी जे भव्य कृषी प्रदर्शन भरवितो त्यासाठी भाऊ भरघोस आर्थिक मदत करायचे. कंपनीचा मोठा स्टॉलही लावायचे. आमच्या मदतीला भाऊ नेहमीच धावून आले. अशीच एक मदत मला करायची त्यांच्या खूप मनात होते. त्यासंबंधी ते आमचे नेते मा. शरदरावजी पवार साहेब यांच्याशी बोललेही होते. मध्यंतरी मला प्रकृतीचा त्रास झाल्यानंतर माझा पेसमेकर बदलावा लागणार होता. हा विषय पवार साहेबांनी जळगावला गेल्यानंतर जेवणाच्या टेबलावर भाऊंना सहजपणे सांगितला. अर्थात बोलता बोलता भाऊ म्हणाले, मी आता १५ दिवसांनंतर पेसमेकर बदलण्यासाठी अमेरिकेला जाणार आहे. तेव्हां पवार साहेब म्हणाले, अहो आमच्या दिलीप वळसेंचाही पेसमेकर बदलायचा आहे. तेव्हां भाऊ तात्काळ म्हणाले, मग मी त्यांनाही माझ्याबरोबर घेऊन जातो. अमेरिकेत माझे जे या विषयाचे हॉस्पिटल आहे व जे डॉक्टर आहेत ते खूप निष्णात आहेत. दिलीपराव माझ्याबरोबरच राहतील. दोघांचाही पेसमेकर बदलून घेऊ. बोलणे संपले, समारंभ संपला. पवार साहेब संध्याकाळी मुंबईला निघून गेले. ते मुंबईला घरी पोहोचण्याआधी मला भवरलालजींचा फोन आला. तुमचा पेसमेकर बदलायचा आहे. तर तुम्हांला मी बरोबर घेऊन जातो. तयारी करा. मी मुंबईला आलो की एकदा समक्ष भेटू. त्याप्रमाणे ते जेव्हां मुंबईला आले तेव्हां मी जाऊन भेटलो. त्यानंतर लगेचच त्यांची प्रकृती बिघडली. ती थोडी बरी झाल्यानंतर त्यांना घरी सोडले. तेव्हांही मी त्यांना वाळकेश्वरच्या घरी जाऊन भेटलो. खुप गप्पा झाल्या. आठ-पंधरा दिवसांनंतर त्यांची प्रकृती खूपच बिघडली आणि त्या दुखण्यातून ते काही बाहेर आले नाहीत. मला उपचारासाठी अमेरिकेला घेऊन जाण्याआधीच ते अनंतात विलीन झाले. मग मी ही अमेरिकेला जाण्याचा विचार सोडून दिला आणि येथेच उपचार करुन घेतले. आपले प्रत्यक्ष कोणतेही नाते नसताना केवळ पवार साहेबांचा एक सहकारी म्हणून भाऊंनी माझ्यावर जे प्रेम केले व मला मदत करण्याची जी तयारी दर्शविली त्यासंबंधीच्या भावना व्यक्त करायला माझ्याकडे शब्द नाहीत. भाऊ किती प्रेमळ, किती सहृदयी, किती परोपकारी व दुसऱ्याला मदत करण्यासाठी धडपडणारे होते हेच यातून आपल्या दृष्टीस येते. अशा थोर मानवतावादी उद्योजकाला दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त मी अंत:करणापासून अभिवादन करतो.




आंब्यावर प्रक्रिया करणारा जैन इरिगेशनचा जळगावातील प्रकल्प. आंब्याचा पल्प या बॅरेलमध्ये भरून जगभर निर्यात केला जातो.





# जैन हिल्स तीर्थ तर भाऊ तीर्थरुप

डॉ. राजेंद्र फडके
जळगांव

भवरलाल जैन यांनी अथक परिश्रमातून विकसीत केलेले जैनहिल्स हे आजचे शेती, पाणी या क्षेत्रातले आधुनिक तीर्थ बनले आहे. भारतीय संस्कृतीत तीर्थांना महत्त्व आहे. तीर्थयात्रा हा भारतीय मनाचा श्रेष्ठ संस्कार मानतात. तीर्थांच्या निमित्ताने भारत तीर्थरुप होतो. संस्कृतीतली विविधता मनाला सुख देते. संस्कृतीची देवाणघेवाण होते म्हणून लोक तीर्थाटनाला जातात. आता शेतकरी जगातले शेतीचे सगळे नवनवीन प्रयोग व तंत्रज्ञान पाहण्याच्या उद्देशाने जळगावच्या जैन हिल्सला येतात. एका अर्थाने जैन हिल ही शेतकऱ्यांची पंढरी बनली आहे आणि भवरलाल जैन हे शेतकरी समाजाच्या दृष्टीने पांडुरंग झाले आहेत. मुळात तीर्थयात्रेला जायचे ते स्वात्मचिंतनासाठी. एका जागी स्थिरपणे केलेल्या अभ्यासाला चौकसपणा आणण्यासाठी तीर्थयात्रा करतात. जैनहिल्सची वारी शेतकरी नवीन पीक समजून घेऊन स्वत:च्या शेतात लावण्यासाठी करतात. ही नावीन्याची आवड हाच त्याचा आता तीर्थाटनाचा हेतू बनला आहे.

तीर्थक्षेत्री देव बघण्यापेक्षा तो सज्जनात पाहावा. चांगल्या कामात पाहावा. भवरलाल भाऊ हे सज्जनातले मेरुमणी तर होतेच पण त्यांची मानवतावादी दृष्टी व शेतकऱ्यांवरचे प्रेम वर्णन करायला शब्दकोषातले शब्दही अपुरे पडतील. आयुष्यभर त्यांनी शेतकऱ्यांच्याच कल्याणाची चिंता वाहिली. सज्जनाची उत्तम व्याख्या तुकाराम महाराजांनी केली आहे. ज्याच्यात सत्य गुण उपजत आहे तो सज्जन. काहीही न करता जगणारे लव्हाळेही सज्जन असते आणि विराट सावली देणारा वटवृक्षही सज्जन असतो. भाऊंनी शेतकऱ्यांना कायम मायेची सावली दिली. वटवृक्षाच्या सावलीसारखे सर्वांच्या उपयोगी पडले. सावली जशी कोणालाही नाकारीत नाही तसे भाऊंनी त्यांच्याजवळ आलेल्या कोणालाही कधीही दूर लोटले नाही. कुणाचाही द्वेष केला नाही. पण स्पष्ट व खरे बोलण्यासही कधी कचरले नाहीत. भाटगिरी करणे हे त्यांच्या रक्तातच नव्हते आणि स्वभावातही नव्हते. सज्जनपणामुळे भाऊंचा सहवास हा वटवृक्षाच्या सावलीसारखाच होता. त्यांचा सत्संग लाभताच देहभावात चैतन्य स्फुरे. त्यांच्या दिव्य सहवासात वृत्ती पालटत. संत ज्ञानदेवांनी पसायदानात सज्जनांना सोयरे म्हटलंय. सज्जन हे तीर्थच असते. भाऊ हे या अर्थाने तीर्थरुप होते. ते विशाल हृदयी होते. म्हणूनच त्यांनी निर्माण केलेल्या जैनहिल्सने सर्वांना निसर्ग आणि सौंदर्य यातून ईश्वरत्व म्हणज़े चांगले काम करण्याची प्रेरणा दिली आहे. जैन हिल्सची विशालता आपल्या अंत:करणाला मोकळी करते आणि नकळतपणे भवरलालजींच्या स्मृतींपुढे आपले हात जोडले जातात.

भाऊ हे चंदनाचा वटवृक्ष होते. चंदनाची शेती केली की सुवास आपोआप दरवळतो. तसा भाऊंच्या कर्तृत्वाचा सुवास जगभर दरवळला. वटवृक्ष अनेक गुणांनी युक्त असतो. इतकेच नव्हे तर त्याच्या शाखा सर्वत्र खूप खोलवर पसरलेल्या असतात. तसे जैन इरिगेशनचे स्वरूप आज झाले आहे. त्याला कारण भाऊंची अशोक, अनिल, अजित, अतुल ही चार मुलेही आहेत. या सगळ्यांना एकत्र बांधून ठेवण्याचे जे कसब व कौशल्य भाऊंनी दाखविले ते अवर्णनीय व अचंबित करणारे आहे. भाऊ केवळ वाकोद व जळगावचे न राहता सगळ्या सीमा पार करून संपूर्ण राष्ट्राचे व जगाचे झाले. ठिबक सिंचनामधून त्यांनी जी क्रांती केली आणि पाण्याचा एक-एक थेंब टाकला त्यातून प्रेम व माणुसकीचा समुद्र तयार झाला. परदेशातही कंपनीचा नावलौकिक झाला. या सर्वांमागे भाऊंचे कर्तृत्व आणि पुण्याई आहे. त्याचे स्मरण या पुण्यतिथीच्या निमित्ताने आपण करूया आणि कंपनीचा विस्तार आणखीन वेगाने जगभर व्हावा अशी ईश्वराकडे प्रार्थना करूया.

■■■

# अभ्यासदौरा व प्रशिक्षण

आमच्या जैन कृषी संशोधन, विकास आणि प्रात्यक्षिक केंद्र व जैन उच्च कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेस जग व देशातील विविध शेतकरी, शास्त्रज्ञ, कृषी अधिकारी, बँक अधिकारी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, संशोधन संस्था यांनी केलेला अभ्यासदौरा व झालेल्या प्रशिक्षणाची छायाचित्रे




जलव्यवस्थापन संस्था, जालना येथील शेतकरी वर्ग



कृषि तांत्रिक व्यवस्थापन संस्था जिल्हा भरूच, गुजरात येथील महिला शेतकरी वर्ग



पाणी व जमीन व्यवस्थापन व संशोधन संस्थांतर्गत हैद्राबाद, तेलंगणा राज्यातील शेतकरी वर्ग

शेतकऱ्याला सिंचनासाठी लागणाऱ्या साहित्याची उत्कृष्टपणे निर्मिती करणारी जैन इरिगेशन ही जगातली सर्वोत्तम कंपनी आहे. त्यांचे ठिबक व तुषार संच, पीव्हीसी पाईप हे आमचे गुजरात मधील शेतकरी खूप वर्षांपासून वापरत आहेत. कंपनीच्या मालाचा दर्जा खूपच उत्तम आहे.

– सुची पटेल
भावनगर, गुजरात



मानगे ट्रेनिंग इन्स्टिट्यूट प्रायोजित जि.हावेरी, कर्नाटक येथील वितरक

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून नवीन ठिबक सिंचन प्रणाली जैन इरिगेशन कंपनीने तयार केली आहे. त्यांचे फळ पिकांबाबतचे संशोधनही उत्कृष्ठ आहे. त्यांच्या नवीन तंत्रज्ञानाचा व संशोधनाचा शेतकऱ्यांनी वापर केल्यास त्यांना निश्चित फायदा होईल.

– निलेश सुपारे
कृषि अधिकारी वर्धा



महाराणा प्रताप कृषि व तांत्रिक विद्यालय, उदयपूर, राजस्थान येथील विद्यार्थी



शेतकरी प्रशिक्षण केंद्र मेहसाना, गुजरात येथील शेतकरी



जालना जिल्ह्यातील जलसंधारण संस्थेतील सदस्य



सितामढी, बिहार येथील प्रशिक्षणार्थी

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

'**कृषिजल**' हे मासिक प्रकाशन, मुद्रक, मालक **श्री. अतुल जैन** यांनी जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेडसाठी, प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि., जी-१२ एम.आय.डी.सी., चिकलठाणा, औरंगाबाद -४३१००६ (महाराष्ट्र) येथे छापून जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेड, जैन प्लास्टिक पार्क, पो. बॉ. नं. ७२, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक:** डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे **मुखपृष्ठ:** विकास मल्हारा **कला:** योगेश पाटील, मनोज देशपांडे, इकबाल मन्सुरी **अक्षर जुळवणी:** नामदेव बडगुजर, गिरीश बोरगांवकर **छायाचित्रे:** योगेश सोनार, ईश्वर राणा, राजेंद्र माळी, राजू हरिमकर **दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११/२२ **फॅक्स:** ०२५७-२२५८१११/२२ **ई-मेल** : krushijal@jains.com **संकेतस्थळ** : www. jains.com, वर्ष: २ अंक: ०२ (फेब्रुवारी २०१८/ फक्त खासगी वितरणासाठी)



**भवरलालजी हिरालालजी जैन**
१९३७–२०१६

# शब्दाशब्दात प्रकाशते... तव कर्तृत्वाचे आकाश!

''भवरलालजी जैन यांचा कल्पक निर्माता म्हणून मी गौरव करतो. गांधी रिसर्च फाउंडेशनद्वारा गांधीजींच्या जीवनकार्याला व विचाराला पुढे नेण्याचे भवरलालजींनी हाती घेतलेले कार्य मानवतेच्या दृष्टीने मोलाचे आहे.''

*– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, माजी राष्ट्रपती, भारत सरकार*

''तुमच्यापुढे अनेक आदर्श आहेत. फार दूर गेले नाही तरी आज व्यासपीठावर ज्यांचा 'डी.लिट.' ही सन्मानाची पदवी देऊन गौरव करण्यात आला, त्यांचे जीवनही आदर्श आहे. या भूमिपुत्राने ज्या परिस्थितीला सामोरे जाऊन यश मिळविले ते स्पृहणीय आहे. कृषी क्षेत्रासाठी आणि समाजासाठी त्यांनी केलेले कार्य अलौकिक आहे. ज्याप्रमाणे सारी माणसे थोडे यश मिळाले की, महानगरात किंवा परदेशात वास्तव्यास जातात, तसे भवरलालजींनी केले नाही. त्यांनी या खानदेशच्या मातीशी असलेले नाते कायम ठेवले आहे. ज्या प्रदेशाने, समाजाने मोठे केले त्या प्रदेशाची आणि समाजाची सेवा करण्याला त्यांनी प्राधान्य दिले हेच त्यांचे सर्वात मोठे मोठेपण आहे, असे मला वाटते...''

*– डॉ. प्रतिभाताई देविसिंह पाटील, माजी राष्ट्रपती, भारत सरकार*

''जैन इरिगेशनच्या माध्यमातून भवरलालजी जैन यांनी फक्त खानदेशच नव्हे; तर देश आणि विदेशात १०० हून अधिक देशात जलव्यवस्थापनाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार केला आहे. ठिबक सिंचनामुळे अमूल्य अशा पाण्याची बचत करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.''

*– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य*

''आयुष्यभर ध्यास घेवून आपण सिंचनक्षेत्रात जी मौलिक कामगिरी केली त्याची दखल जागतिक पातळीवरील 'इरिगेशन असोसिएशन' या संस्थेने घेतली व 'क्रॉफर्ड रिड स्मृती पुरस्कार' प्रदान करून आपला गौरव करण्यात आल्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन!
पाण्याचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करणे ही काळाजी गरज आहे. त्यादृष्टीने आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपण ठिबक सिंचन साधनसामग्रीच्या निर्मितीद्वारे केलेले व करीत असलेले कार्य शेती व शेतकऱ्यांच्या विकासाच्या वाटचालीत अनन्यसाधारण असे आहे.''

*– पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार, बारामती*

''जैन समूहाने शेतीच्या क्षेत्रातील तंत्र लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जी काळजी घेतलेली आहे, ती काळजी ही शेवटी आपल्या सगळ्यांच्या शिवारात दिसते ती अधिक प्रमाणात कशी दिसेल, त्यात महाराष्ट्राचा आणि देशाचा बदललेला चेहरा आपल्याला पाहायला मिळेल आणि ते पाहायला मिळो अशाच प्रकारची अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो.''

*– शरद पवार, माजी केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार*

''भारताचे भवितव्य अशा प्रकारच्या उत्पादक प्रकल्पावरच अवलंबून आहे. अशा प्रकारची उत्पादक कामे हीच राष्ट्राची खरी सेवा आणि देशभक्ती आहे. भारतात जैन बंधूंच्या सारखे शंभर उद्योजक शोधून त्यांच्या पाठीशी केंद्र व राज्य शासनाने सर्व शक्ती उभी केली तर आपल्या मातृभूमीचे उद्योगीकरण वेगाने होण्यास वेळ लागणार नाही. मी त्यांचे काम बघून भारावून गेलो आहे... जैन बंधूंकडून पाण्याचे नियोजन व शेती उत्पादनाच्या क्षेत्रात खूपच महत्त्वाचे राष्ट्रीय काम होणार आहे. असा मला विश्वास वाटतो.''

*– अण्णासाहेब शिंदे, माजी केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार*

''आज जैन पाईप कंपनीला भेट देण्याचा योग आला. आजचा दिवस आयुष्यातील अविस्मरणीय दिवस ठरला. बलशाही भारत उभा करावयाचा असेल तर माणसांचे दारिद्र्य दूर झाल्याशिवाय ते होणार नाही व माणसांचे दारिद्र्य दूर करावयाचे असेल तर जमिनीचे दारिद्र्य दूर केल्याशिवाय होणार नाही. तसे महत्त्वाचे कार्य जैन पाईप कंपनीने हाती घेतले हे देशाचे सौभाग्यच मानावे लागेल. जमिनीचे दारिद्र्य दूर करण्यासाठी पाण्याचा वापर ही महत्त्वाची बाब आहे, पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे तिथं असं होणं काळाची गरज आहे हे ओळखून जैन कंपनीने ठिबक योजना हे एक पाऊल आणखी पुढे टाकले आहे. कमी पाण्यात राष्ट्रीय उत्पादनात निश्चित वाढ होऊ शकेल, त्याचप्रमाणे पाण्यामुळे वाढत असलेली आर्थिक विषमता कमी करता येईल असे एक मोलाचे कार्य पाहून खूप समाधान वाटले. जैन पाईप कंपनीच्या परिवारास शुभेच्छा व्यक्त करतो व त्यांना दीर्घायुष्य लाभावे ही शुभ प्रार्थना.''

*– अण्णा हजारे, ज्येष्ठ समाज सेवक, राळेगणसिद्धी*

''...भाऊंकडे दूरदृष्टी होती, जेथे आपले विचार संपतात, तेथून त्यांचे विचार सुरू व्हायचे. कोणतीही निर्मिती करताना त्याचा सखोल अभ्यास, त्याचे वेगवेगळे कंगोरे, परिणाम, फायदे अशा सर्वांगाने ते विचार करायचे.एक प्राथमिक आराखडा ते मनात तयार करत असत. आपले अंतिम ध्येय लक्षात ठेवून ते कामाला सुरवात करायचे. एक उद्योजक, विचारवंत, शेतकरी, चालते-बोलते विद्यापीठ, साहित्यिक, सामाजिक बांधिलकी जोपासून माणुसकीचे पदोपदी दर्शन देणारा द्रष्टा अशी नानाविध रूपे भाऊंमध्ये आम्ही बघितली अन् अनुभवलीही. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' या भावनेतून भूमिपुत्रांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उच्च प्रगत तंत्रज्ञान शेताच्या बांधावर त्यांनी पोहोचवले. शेतीला व्यवसायाचे रूप त्यांनी बहाल केले. या तंत्रज्ञानामुळे शेतकरीदेखील सजग झाला असून, अभ्यासपूर्ण शेतीवर ते आता अधिक भर देताना दिसून येतात. भाऊ म्हणजे किती व्हीजनरी होते, याचा प्रत्यय मला यांची फिल्म करताना आला. शेती, शेतकरी, पाणी, निसर्ग यावर निस्सीम प्रेम करणारा हा अवलिया मानवी मनावर आपल्या अफाट कार्यकर्तृत्वातून एक वेगळाच ठसा उमटवून गेला. भाऊ म्हणजे साक्षात एक चिरंतन सत्य...!''

*– डॉ. जब्बार पटेल, सुप्रसिद्ध दिग्दर्शक*



# हेच खरे गमक... सार्थक आयुष्याचे!

## भाऊंच्या आयुष्याची जीवनमूल्ये

सर्वोत्तम गुणवत्तेसह कामाचे ठेवावे भान,
मोल जाणून परस्परांचे मन राखावे छान ।।

पैसा कमवावा पण मैत्री जपावी हाच सदाचार,
जिद्दीने ध्येयमार्गी चालतो, तोच खरा कर्तबगार ।।

प्रश्न नाना पडती, ज्ञान-विज्ञान जिज्ञासा अंतरी,
'विश्वाचे व्हावे कल्याण', हाच ध्यास मनी धरी ।।

स्वप्ने मोजकीच बरी, कामात रमावे सदोदित,
भोवताली सवंगडी माझे, जाणून घ्यावी जीवनरीत ।।

उदात्त-अभिजात मूल्यांचा सदैव जीवनाधार,
गीत गतीचे गाताना, सर्वांगीण विकासाचा संस्कार ।।

आव्हानांशी झुंजता झुंजता करू प्रखर धाडस,
शौर्य दोन्ही करात, दाटतो हृदयी हर्षोल्लास ।।

यश-अपयश-संघर्षाने अडखळली जरी वाट,
हृदयी सदैव उमलू द्या मानवतेची पहाट ।।

नीती जलासारखी निर्मळ-नितळ, वृत्ती असे खेळकर,
संकटे सहज करूनी पार, मनी प्रकाशला दीप-विचार ।।

विश्वाचा करता विचार, बिंदुमात्र असलो जरी,
कामात प्रेम-सद्भाव अर्पिणे, हीच कमाई खरी ।।

अखंड वादळे असो आयुष्यात, होऊ द्या संकटांची बरसात,
चालताना पडलो तरी पुन्हा पेटवू विझलेली ज्योत ।।

सुखादुःखाचे होऊनी साथी, हातात हात गुंफुनि काम करीत जाऊ,
'सार्थक करू या जन्माचे रूप पालटू वसुंधरेचे!' हीच प्रतिज्ञा घेऊ ।।

सेवा आणते जगण्या सुगंध, प्रयत्नांती तणावही होतो संथ,
करितो विश्वकल्याण, तोचि खरा थोर-गुणी-भाग्यवंत!

*(मूळ बर्टन ब्रेली यांच्या कवितेचा मुक्त भावानुवाद - ज्ञानेश्वर शेंडे)*

द्वितीय श्रद्धावंदन दिवस

**भवरलालजी हिरालालजी जैन**

१९३७-२०१६

भवरलालजी आणि कांताई जैन परिवार
www.bhavarlaljain.in


जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®
www.jains.com

भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन
करुणा.. कल्पना.. कष्ट!
www.bkjfoundation.org

गौराई कृषी-तंत्र निकेतन

गांधी रिसर्च फाऊंडेशन
www.gandhifoundation.net

अनुभूति स्कूल
www.anubhutischool.in

बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट

जैन स्पोर्ट्स् अकॅडमी
आरोग्य. आत्मनिर्धार. अभेद्यता.

कांताई नेत्रालय
आय केयर फॉर यू

भाईसाहेब सुंदरलाल मल्हारा पोटेन्शियल डेव्हलपमेन्ट अकॅडमी

जैन फार्म फ्रेश फुड्स् लि.
मस्त चवीमागचं तुमचं पाककौशल्य.
www.jainfarmfresh.com